21-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SKK/ 10:00

21-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे.... 10:00

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी. : शिक्षण क्षेत्रात प्राथमिक ते पदवीपर्यंत चालू असलेला भेदभाव.

मु.शी. : शिक्षण क्षेत्रात प्राथमिक ते पदवीपर्यंत चालू असलेला भेदभाव याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार,दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत सवश्री विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण,श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, श्रीकांत जोशी, वि.प. यांचा प्रस्ताव.

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अंतिम आठवडा प्रस्ताव मांडतो :-

"राज्यात शिक्षण क्षेत्रात प्राथमिक पासून पदवीपर्यंत चालू असलेला अभूतपूर्व भेदभाव, यापुढे शाळा, महाविद्यालये व खाजगी तुकड्या यांना नियम विना अनुदानावर मान्यता देणे, गुणवत्तेनुसार तुकड्या न पाडण्याचा शासनाचा निर्णय त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच शाळांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटणे मुलांमध्ये आणि शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण करणारी परिस्थिती, त्यातून शिक्षण अभ्यासक्रमात मूलभूत फरक करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केलेली मते, गुणवत्ता विकास चाचण्यामुळे जिल्हापरिषदा, नगरपालिका व महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांवर निर्माण झालेला मानसिक तणाव, त्यातून सर्व शिक्षा अभियानातर्फे दिलेल्या निर्देशांची विसंगती.....

. डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, काल संध्याकाळी जो प्रकार झाला तो शिवसेना भाजप आणि इतर मित्र पक्षांना रुचलेला नाही. याबाबत विरोधी पक्षाने ठरविलेले आहे की, आजच्या कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारचा सहभाग घ्यायचा नाही. आम्ही फक्त सभागृहामध्ये मौनव्रत पाळून बसणार आहोत. आमच्याकडून कोणत्याही प्रकारे कामकाजामध्ये भाग घेतला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

श्री.दिलीप वळसे-पाटील : काल संध्याकाळी विधेयकावर चर्चा करत असताना सन्माननीय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर मतदान मागितले. त्यानंतर आपण सभागृहाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

□म□ज तह□ब □ले, तरी दे□ील विरोधी प□च्या स□मा□□ीय सदस्यांच्या भाव□ अ□वर होत्या. ही बाब □री आहे □, अ□□ वेळेला सभा□हामध्ये □रम असता□, □सता□ आप□ विधेय□ मंजूर

21-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

SKK/ MHM/ SBT/

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

□ले, असे अ□□ प्र□रचे □म□ज सभा□हामध्ये पू□ □लेले आहे. समज, □रसमजातू□ जी घट□ घडली, त्याबाबत आप□ □द दे□ील व्यक्त □लेला आहे. विरोधी प□च्या सर्व स□मा□□ीय सदस्यां□ वि□ती राहील □, आज अधिवेश□चा शेवटचा दिवस आहे. शेवटच्या दिवशी हे □म□ज सुरळीतप□ पार पाड□यासाठी □पया आप□ सह□र्य □रावे. □ त्याही परिस्थितीमध्ये स□मा□□ीय सदस्यां□, स□मा□ीय सभापतींचा □ा पीठासी□ अधि□ाऱ्यांचा, सर□रचा दे□ील परस्परां□डू□ मा□ठेवला □ला पाहिजे. □ल जे □ही घडले त्यावर पडदा टा□ू□ आजच्या □म□जामध्ये सहभा□ी व्हावी, अशाप्र□रची वि□ती मी सर□रच्या वती□ □रीत आहे.

या□र श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब.....

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते काहीही बोलत नाहीत असे पाहून .....)

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आपण 10 मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी आणि सर्व गटनेत्यांना आपण चर्चेसाठी बोलवावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

उपसभापती : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे. मी सर्व गटनेत्यांना विनंती करतो की, त्यांनी या आसनाच्या मागे असलेल्या दालनामध्ये चर्चा करण्यासाठी यावे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.05 ते 10.15 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी हे नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडत होते.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी प्रस्ताव अर्धवट मांडलेला आहे..

उपसभापती : आपणाला या प्रस्तावावर बोलायचे आहे काय ?

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मला या प्रस्तावावर बोलायचे नाही.

उपसभापती : मी सभागृहाची बैठक 10.45 वाजेपर्यन्त स्थगित करीत आहे.

(10.16 ते 10.45 बैठक स्थगित झाली.)

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

उपसभापती : अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु करावयाची आहे काय ?

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय सभापती, माननीय उपसभापती जेव्हा सभागृहामध्ये प्रवेश करुन आपल्या जागेवर आसनस्थ होतात तेव्हा सर्व माननीय सदस्य उभे राहतात. या सभागृहाची परंपरा आहे, हे सभागृह बहुप्रतिष्ठित आणि सार्वभौम आहे. सभागृहाचा त्याचप्रमाणे माननीय सभापती आणि माननीय उपसभापती यांचा एक सन्मान आहे. कितीही मतभेद आणि वादविवाद असले तरी माननीय सभापती किंवा माननीय उपसभापती सभागृहात प्रवेश करतात त्यावेळी सर्व माननीय सदस्यांनी त्यांच्या सन्मानार्थ उठून उभे राहणे ही आपली परंपरा आहे.आता आपण सभागृहात प्रवेश केल्यावर काही सदस्य उठून उभे राहिले नाहीत. ते त्यांच्या नाराजीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे उठून उभे राहिले नाहीत. नाराजी व्यक्त करण्याचे इतरही अनेक प्रकार आहेत. परंतु माननीय सभापतींचा सन्मान राखला जावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

उपसभापती : मी माननीय सदस्यांना पुन्हा एकदा विचारु इच्छितो की, अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु करावयाची आहे काय ?

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव विरोधी पक्षातर्फे दिला जातो. त्यांना जर ही चर्चा उपस्थित करावयाची नसेल तर आम्हांला चर्चा सुरु करण्याची परवानगी द्यावी.

उपसभापती : 11.15 पर्यंत वाट पाहू आणि निर्णय घेऊ. सभागृहाची बैठक मी 11.15 पर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 10.45 पासून 11.15 पर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय उपसभापती)

उपसभापती : आपण मघाशी अंतिम आठवडा प्रस्तावर चर्चा सुरू केली होती. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव अर्धवट मांडलेला आहे. मी पुन्हा सन्माननीय विरोधी पक्षाला विनंती करतो की, अर्धवट मांडलेला प्रस्ताव पूर्णपणे मांडावा. अंतिम आठवडा प्रस्ताव अर्धवट मांडल्यानंतर मी असे म्हणालो की, आपली बोलण्याची इच्छा असेल तर आपण बोलू शकता. तेव्हा या विषयावर बोलण्याची इच्छा नाही असे सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी म्हणाले. येथे अर्धवट प्रस्ताव मांडला की, प्रस्ताव मांडला नाही या वादामध्ये मी जाऊ इच्छित नाही. आताही आपण पूर्ण प्रस्ताव मांडू शकता.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी प्रस्ताव मांडलेला नाही. आम्ही वक्तव्य करावयाचे नाही असा निर्णय घेतलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अत्यंत दु:खीत मनाने आम्हाला निर्णय घ्यावा लागला आहे. आम्ही लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरामध्ये बसलो आहोत. लोकशाहीची बहुमूल्य मूल्ये पाळण्याचा आम्ही कसोशिने प्रयत्न करतो. पण त्यावेळी कधी तरी चूकही होत असेल. कारण शेवटी आम्ही सुध्दा माणसे आहोत. आमची चूक निदर्शानास आली तर ती जरूर दुरुस्त करावी. विरोधी पक्ष म्हणून आमची काही जबाबदारी आहे. कालचा एंकदरीत प्रकार बधितल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, माननीय सभापती असो किंवा माननीय उपसभापती असोत त्यांनी विरोधी पक्षाला विश्वासात न घेण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. पीठासीन अधिकऱ्यांना कामकाज घ्यावयाचे असेल तर आम्ही प्रेक्षकाची भूमिका घेऊन शांतपणे सभागृहामध्ये बसतो. आमचा कुठलाही आग्रह असणार नाही. आपण जे काही निर्णय घेत आहात, कामकाज चालवित आहात, त्याचे कौतुकही करू. पण जेव्हा संधी मिळेल तेव्हा टीकाही करू. शेवटी हा आमचा हक्क आहे. काल रात्री जो प्रकार झाला आहे, त्याने आम्ही दु:खी झालो आहोत. असा प्रकार हा केवळ कालच घडलेला नाही, तर यापूर्वीही घडलेला आहे. त्यासंबंधी राग व्यक्त करण्यासाठी, नाराजी व्यक्त करण्यासाठी ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

आम्ही विविध आयुध वापरली आहेत. मागच्या वेळी आम्ही निदर्शने केली होती. त्याची दखल माननीय सभापती आणि ससंदीय कार्यमंत्र्यांनी घेतली होती.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु शेवटी हे प्रकरण आम्ही मिटविले. आम्ही म्हणतो त्या प्रमाणे माननीय सभापतींनी कामकाज घ्यावे, अशी आमची मागणी नाही. आम्हाला न्याय मिळाला पाहिजे असे आमचे मत आहे. महोदय, काल पीठासीन कर्मचाऱ्यांनी सुध्दा आम्हाला साथ दिली नाही. शेवटी लोकशाही ही प्रगल्भ यंत्रणा आहे. त्यामुळे येथील प्रत्येक व्यक्ती त्यामध्ये सहभागी झाली आहे. "Every individuals has to contribute into this democratic process." अशी परिस्थिती आहे. काल जी घटना घडली ती दु:खद आहे. त्यामुळे आम्ही सभागृहात येऊन केवळ शांतपणे कामकाज पाहणार आहोत. वास्तविक पाहता आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. परंतु विरोधी पक्षाने दिलेला प्रस्ताव, सुचना, चर्चा शासनाकडून विचारात घेतल्या जात नाहीत. ती आयुधे वापरण्याची आम्हाला संधी दिली जात नाही अशी परिस्थती निर्माण झाली आहे. म्हणून अतिशय नाईलाजाने आणि खेदाने, सभागृहाच्या कामकाजात भाग न घेता, शांतपणे बसण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. त्यामुळे आपल्याला ज्या पध्दतीने कामकाज करावयाचे असेल त्या पध्दतीने आपण कामकाज करु शकता. त्या संदर्भात आमची कोणतीही तक्रार राहणार नाही. आम्ही शांतपणे कामकाज पाहत राहू एवढेच निवेदन मला करावयाचे आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला आहे. सन्माननीय संसदीय कार्यमंत्री म्हणून सरकारच्या वतीने मी विरोधी पक्षाला विनंती करतो की, त्यांनी सभागृहाच्या कामकाजात भाग घ्यावा. काही घटना घडल्या असतील हे मान्य आहे. परंतु मागे घडलेल्या घटनांची चर्चा करुन, सदनाचा वेळ घेऊ नये असे मला वाटते. मागे जे काही घडले असेल ते विसरावे. हे सभागृह सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहाची उज्वल परंपरा आहे. माझी विनंती आहे की, त्यांनी कामकाजामध्ये भाग घ्यावा. आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे, शिवाय विरोधी पक्षाकडून अंतिम आठवडा प्रस्ताव सुध्दा चर्चेला आलेला आहे. म्हणून संसदीय कार्यमंत्री या नात्याने मी सन्माननीय विरोधी पक्षाला विनंती करतो की, त्यांनी या कामकाजामध्ये भाग घ्यावा. शेवटी सभागृहात विरोधी बाजू आणि सत्ताधारी बाजू या दोन्हीही बाजू महत्वाच्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी कोणाचा अवमान करणे किंवा ऐकूण न घेणे अशातला भाग नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

सभापती महोदय, काल घडलेल्या घटनेबाबत जर कोणाची काही मते असतील तर माननीय सभापती महोदयांसमवेत आपण बैठक बोलवावी. त्या बैठकीला सर्व गटनेते आणि प्रमुखांना बोलवावे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री महोदयांच्या सोबत बसून व चर्चा करुन, हा प्रश्न सोडवावा लागेल. वारंवार या घटनेची चर्चा करु लागलो तर ते योग्य होणार नाही. लोकशाहीमध्ये काम करीत असताना, उदार अंत:करणाने काही गोष्टी स्वीकारण्याची आवश्यकता आहे. म्हणून मी पुन्हा एकदा विरोधी पक्षाला विनंती करतो की, त्यांनी कामकाजामध्ये भाग घ्यावा. त्यामुळे माननीय सभापती महोदयांनी या संदर्भात एक बैठक बोलवावी. त्यात चर्चा करुन, जी घटना घडली आहे त्यातून मार्ग काढता येईल.

उपसभापती : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या. मी कालच सभागृह स्थगित करण्यापूर्वी, खुल्या अंत:करणाने झालेल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त केला होता. माणूस असल्यानंतर चुका घडत असतात. कारण ज्याच्याकडून चुका घडत नाही, तो माणूस नाही या मताचा मी आहे. परंतु जर वारंवार चुका केल्या जात असतील तर त्या पर्पजली केल्या जात असाव्यात असे मला वाटते. झालेल्या प्रकाराबद्दल मी व्यक्त केलेला खेद रेकॉर्डवर आलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी विनंती केली आहे की, ...

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

मी देखील आपल्याला विनंती करतो की, आजच्या कामकाजामध्ये आपण निश्चितपणे सहभागी व्हावे. इतकेच नव्हेतर, झालेल्या गोष्टीवर चर्चा करावयाची असेल तर, माननीय सभापती, माननीय मुख्यमंत्री व मी, आपण सर्वांनी बसून चर्चा करु. मी आपल्याला असे सागू इच्छितो की, येथे काल कोणाचा अवमान करण्याचा माझा हेतू नव्हता आणि असण्याची शक्यताही नाही, हे आपल्या सर्वांना ज्ञात आहे. पुन्हा एकदा मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना व सन्मानीय सदस्यांना विनंती करतो की, आपण आजच्या कामकाजामध्ये सहभागी व्हावे. आपण माझ्या विनंतीचा मान राखाल अशी खात्री बाळगतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी आपण व माननीय संसदीय कामकाजमंत्री जे काही बोललात ते मी काळजीपूर्वक ऐकले आहे. आमचे नेतृत्व करणारे माननीय विरोधी पक्षनेते येथे उपस्थित नाहीत, त्यांची आम्ही वाट पहात आहोत. ते आल्यानंतर आम्ही त्यांच्याशी चर्चा करुन पुढील निर्णय घेणार आहोत. या संदर्भातील निर्णय त्यांच्या अनुपस्थितीत घेणे योग्य होणार नाही. सभापती महोदय, आज बसचा संप असल्यामुळे ट्रॅफिक जॅम झाले आहे. सर्व खाजगी गाड्या रस्त्यांवर आल्या आहेत. मी सकाळी 9 वाजता निघून देखील येथे येण्यासाठी मला साडे दहा वाजले आहेत, अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, कितीही इच्छा असली तरी, मुंबईमध्ये वेळेवर पोहोचणे कधी कधी अशक्य होते. घटना घडत असतात, परंतु त्या घटना भविष्यात घडू नयेत म्हणून काळजी घेतली पाहिजे. कोणावर टीका करु नये, कोणाबद्दल राग आणू नये किंवा कोणाला अडचणीचे वाटू नये म्हणून आम्ही लोकशाहीतील सर्वोच्च भूमिका म्हणजे मौन पाळले आहे. माननीय विरोधी पक्षनेते आल्यानंतर आम्ही या संदर्भातील निर्णय घेऊन आपल्याला सांगू.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी मांडलेल्या भूमिकेशी मी सहमत आहे. काल घडलेल्या घटनेसंदर्भात माननीय उपसभापतींनी देखील खेद व्यक्त केला आहे आणि आजही तीच भावना व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे माननीय संसदीय संसदीय कार्यमंत्री यांनी देखील शासनाची भूमिका मांडली. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी काल घडलेल्या प्रकारासंबंधी सर्व माहिती दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी

अंतिम आठवडा प्रस्ताव माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांच्यावर नावावर आहे. परंतु आता माननीय विरोधी पक्षनेते उपस्थित नाहीत. त्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेते जोपर्यंत येत नाहीत, त्यापर्यंत यावर कार्यवाही होऊ नये, या सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांच्या मताशी मी सहमत आहे. तरी, माननीय विरोधी पक्षनेते येईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी त्यांनी भूमिका मांडली आहे. आज बजेट सेशनचा शेवटचा दिवस आहे. काल घडलेल्या प्रकारासंबंधी माननीय उपसभापतींनी देखील खेद व्यक्त केला आहे आणि आजही त्यावर भाष्य केले आहे. मौन बाळगण्याचे आयुध आपण वापरले आहे, हे मी समजू शकतो. सभापती महोदय, मी राग समजू शकतो, परंतु त्या रागाचे रुपांतर द्वेषात होता कामा नये, अशी विनंती आहे. सभापती महोदय, सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष मिळून शासन आहोत. शासनाचा एक महत्वपूर्ण घटक म्हणून विरोधी पक्ष काम करत असतो. विरोधी पक्षाशिवाय कोणत्याही संसदीय कामकाजाला अर्थ राहत नाही, सर्व निरर्थक वाटते. जेवणात मीठ नसल्यामुळे जेवण अळणी वाटते, त्याप्रमाणे विरोधी पक्षाकडून कामकाजात सहभाग घेतला गेला नाही तर सभागृहाचे कामकाज बेचव झाल्यासारखे होईल.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आज अर्थसंकल्पिय अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे, आणि अंतिम आठवडा प्रस्ताव हा अत्यंत महत्वाचा आहे. त्या प्रस्तावावर गांभीर्याने चर्चा होण्याची नितांत गरज आहे. या प्रस्तावावर जवळपास दोन ते अडीच तास चर्चा होणे अपेक्षित आहे. म्हणून माझी आपणाला विनंती आहे की, अर्थसंकल्पिय अधिवेशनाचा शेवटचा दिवस असतांना "याजसाठी केला होता अट्टाहास शेवटचा दिस गोड व्हावा " यादृष्टीने आपण विचार करावा, याबाबत आपण विचार केला तर सभागृहाची प्रतिष्ठा उंचावेल, विरोधी पक्षाने अशा प्रकारचे सहकार्य करावे व याबाबत विचार व्हावा अशी माझी विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, सभागृहाचे विरोधी पक्ष नेते उपस्थित नाहीत, ते थोडयाच वेळात पोचतील. विरोधी पक्ष नेते येतील तोपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करावे अशी मी आपणास विनंती करतो.

उपसभापती : संसदीय कामकाज मंत्री यांनी केलेल्या विनंतीनुसार मी सभागृहाची बैठक दुपारी 12.00 पर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 31 मिनिटांनी दुपारी 12.00 वाजेपर्यंत तहकूब झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्रीमती सुधा जोशी)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक दुपारी 12.30 वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 12.00 ते 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सभागृहाची बैठक दुपारी 1-45 वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12-30 वाजता, दुपारी 1-45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सभगृहाची बैठक 1.15 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दु. 12.46 ते 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय सभापती

सभागृहाच्या कामकाजाबाबत

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल या सभागृहाचे कामकाज बराच वेळ चालत असताना रात्री 11.00 वाजता महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (सुधारणा) विधेयकावर चर्चा झाल्यानंतर विरोधी पक्षाकडून त्यावर पोल मागण्यात आला आणि हा पोल न देता अत्यंत घाईगर्दीने रेटून हे विधेयक मंजूर करण्याचा प्रकार या ठिकाणी घडला. हे योग्य झालेले नाही. त्यामधून घटनाक्रम पुढे वाढत गेला. काल मी या सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो. सभापती महोदय, आपले हे सभागृह सार्वभौम सभागृह आहे. लोकशाहीमध्ये विधिमंडळ हे कायदा बनविणारे मंडळ आहे. या कायदा बनविणा-या विधिमंडळामध्ये कायदा बनवित असताना जशी सत्ताधारी पक्षाची भूमिका ही महत्वाची असते तशीच विरोधी पक्षाची भूमिका देखील महत्वाची असते. या सभागृहाचे कामकाज कसे चालावे यासंबंधी नियम केलेले आहेत. संकेत असे आहेत की, या नियमानुसारच कामकाज झाले पाहिजे. सभापती महोदय, मी 1978 मध्ये आणि 1980 मध्ये विधिमंडळाच्या विधानसभेच्या कामकाजामध्ये भाग घेतला. मध्यंतरीच्या काळामध्ये मी पार्लमेंटमध्ये गेलो आणि आता गेली 4 वर्षे मी या सभागृहामध्ये आहे. काल बरेच पाणी वाहून गेले. गेली 3 वर्षे आम्ही असे पहात आहोत की, या सभागृहाचे कामकाज जे नियमाने झाले पाहिजे ते तसे न होता ते नियम बाजूला सारुन, रेटून नेण्याचा प्रघात झालेला आहे, हे योग्य नाही. सभापती महोदय, गेली 3 वर्षे मी पाहात आहे की, आपणावरही दिलगिरी व्यक्त करण्याची पाळी आलेली आहे. सत्ताधारी पक्षाची काम रेटून नेण्याची जी पध्दत आहे त्यामुळे, सभापती महोदय, आपणही अडचणीमध्ये येता. आपण अडचणीमध्ये येऊ नये अशी आमची भूमिका आहे. एकदा कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. पुन्हा दुस-यांदा कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. दोन वेळा कामकाज सल्लागार समितीच्या बैठका झाल्या. त्यामध्ये असे ठरले की, रोज दोन विधेयके घ्यायची. परंतु ते पाळले गेले नाही. रोज तीन, चार, विधेयके आणि कधी कधी तर पाच-पाच विधेयके कामकाजपत्रिकेवर दाखविली जातात आणि परिणामी त्या विधेयकांना न्याय मिळत नाही. सभापती महोदय, विधेयकाचे कायद्यामध्ये रुपांतर होत असते. या राज्याच्या 10 कोटी जनतेसाठी जो कायदा बनविला जातो तो कायदा नीट झाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

पाहिजे, त्या कायद्याला कोर्टात कोणी आव्हान द्यायला नको, अशी विरोधी पक्षाची भूमिका असते. या कायद्याच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाचे हित साधले गेले पाहिजे... सभपती महोदय, मला थोडे बोलू द्यावे. हा गुंता सोडवायचा असेल तर याबाबतीत मोकळेपणाने चर्चा झाली पाहिजे. विधेयकावर कितीही तास चर्चा होऊ शकते अशी तरतूद आपल्या नियमामध्ये आहे. परंतु असे आपल्या सभागृहामध्ये घडत नाही. आपल्या या सभागृहामध्ये विरोधी पक्षाची भूमिका ही सहकार्याचीच राहिलेली आहे. त्यामुळे कोणत्याही विधेयकाच्या बाबतीत अडचण येऊ नये म्हणून विधेयक मंजूर करण्याच्या बाबतीत आमची नेहमी सहकार्याची भूमिका असते. तरी देखील विधेयकावर आम्ही आमचे विचार मांडायचे नाहीत काय ? जनतेच्या हितासाठी होणा-या कायद्याच्या संदर्भात आम्ही आमचे विचार मांडायचे नाहीत काय ? आम्ही जर आमचे विचार मांडले नाहीत, आम्ही मांडलेल्या सूचना सत्ताधारी पक्षाने विचारात घेतल्या नाहीत तर डान्सबार विधेयकाच्या बाबतीत जी फजिती झाली तशी फजिती सरकारची होऊ शकते आणि मग त्यामध्ये विरोधी पक्षही येतो.

...नंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, ज्या पध्दतीने सभागृहाचे कामकाज चालले आहे त्यामुळे सदस्यांमध्ये नाराजीची भावना आहे. खरे म्हणजे नियमानुसार जर सभागृहाचे कामकाज चालले तर सभासदांची नाराजी असण्याचे काही कारण नाही. आम्ही लक्षवेधी सूचना देतो त्या नीट लागत नाहीत. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्न विचारताना सभासदांमध्ये भेदभाव केला जातो. एखाद्या प्रशला 30-35 मिनिटे दिली जातात तर एखादा प्रश्न 5 मिनिटात संपविला जातो. या सदनाचे ज्येष्ठ सदस्य माननीय प्रा.बी.टी. देशमुख यांनी काल म्हटले की ज्यावेळी बिल विधानसभेतून मंजूर होऊन विधानपरिषदेमध्ये आले त्यावेळी त्यांच्या जेव्हा हातात बिल पडले तेव्हा त्यांनी बिलाला एक अमेंडमेंड दिली. त्यावेळी असे सांगितले की, अमेंडमेंड एक दिवस अगोदर दिली पाहिजे. तसे असेल तर बिल एक दिवस अगोदर मिळावयास पाहिजे होते. बिल मंजूर करावयाचे होते तर एखाद्या सदस्याची अमेंडमेंड बिलावर चर्चा सुरु असताना सुध्दा ती मांडावयाची किंवा नाही यासाठी परवानगी देण्याचा आपल्याला अधिकार आहे . पण तोही नाकारला गेला. नियम ठरविले पाहिजेत. खरे म्हणजे प्रश्न असा उपस्थित झाला आहे की नियमानुसार कामकाज चालणार आहे काय ? अन्यथा विरोधी पक्षाची भूमिका काय आहे ? विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात येऊन शांत बसावे काय ? त्यांनी आपले मत व्यक्त करावयाचे किंवा नाही हे सुध्दा स्पष्ट झाले पाहिजे. आजची कामकाजपत्रिका पाहिली तर आजच्या जवळपास 5 बिले दाखविण्यात आली आहेत. शेवटचा दिवस हा सदस्यांच्या अशासकीय कामकाजासाठी असतो. आजच्या कामकाज पत्रिकेवर जवळपास 5 बिले आहेत,10 लक्षवेधी सूचना दाखविल्या आहेत तसेच विरोधी पक्षांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडावयाचा असतो तोही आज दाखविला आहे. अशासकीय कामकाज त्यानंतर आहे. हे कामकाज एका आठवडयाला पुरेल इतके आहे. हे आज कामकाज घेतले तर कसे चालणार कारण आजचा शेवटचा दिवस आहे. प्रश्नाला न्याय मिळणार नाही,सदस्यांना न्याय मिळणार नाही आणि राज्यातील अत्यंत महत्वाचे प्रश्न असे घाईगर्दीने मंजूर करुन घेतले तर जनतेला सुध्दा न्याय मिळणार नाही. आमचे एकच म्हणणे आहे की, कामकाजाची जी पध्दत आहे त्या पध्दतीमध्ये आपण बदल करणार आहात किंवा नाही ? मागील वेळी असा प्रकार झाल्यानंतर दिलगीरी व्यक्त करण्यात आली होती. परंतु एकदा दिलगीरी व्यक्त करावयाची आणि मग वाटेल त्या पध्दतीने कामकाज रेटून न्यायचे अशी शासनाची भूमिका असेल तर कामकाज करणे कठीण होणार आहे. हा गुंता सोडवायचा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

असेल तर यातून मार्ग काढला पाहिजे आणि कामकाज असेच चालू द्यायचे असेल तर विरोधी पक्षांना असेच शांत बसून राहण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. अनेक अधिवेशनात असे पाहतो आहोत. अशाच पध्दतीने कामकाज रेटून नेण्याचा प्रयत्न होत असेल आणि प्रश्न निर्माण करुन अडचण होणार असेल तर ही पध्दत आहे ती योग्य नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये ज्याप्रमाणे कामकाज ठरविले जाते त्याप्रमाणे ते पाळले जात नाही. मग कामकाज सल्लागार समिती हवी कशाला ? सरकारलाच कामकाज ठरवू द्या. आम्ही कामकाजामध्ये भाग घेणार नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये एखादी गोष्ट ठरल्याप्रमाणे होत नसेल तर कामकाज सल्लागार समितीमध्ये आम्हांला स्वारस्य राहणार नाही आणि कामकाजामध्ये भाग घेण्याचे देखील स्वारस्य राहणार नाही. म्हणून जे चालले आहे ते योग्य नाही आणि बरोबरही नाही. विरोधी पक्षाला न्याय देण्याची कोणत्याही प्रकारची भूमिका नाही आणि विरोधी पक्षाला दादागिरी करुन दाबण्याचा जो प्रकार चालला आहे तो योग्य नाही असे माझे मत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, काल 20 एप्रिल, 2006 हा आपल्या सदनाचा रौप्यमहोत्सवी दिवस होता. या नेमक्या रौप्यमहोत्सवी वर्षामध्ये काल जवळजवळ लोकशाहीचा खून व्हावा अशी वर्तणूक सर्वांना अनुभवावयास मिळाली. असे का घडते ? आमच्याकडूनही काही चुका होत असतील. पण सकाळी म्हटल्याप्रमाणे "To err is human "

नंतर भारवि.

अशुधारित प्रत/ग्रंथसंग्रहासाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..

चूक ही कुठल्याही बाजूने झाली तरी ती समजावून घेऊन त्यातून मार्ग काढावयाचा असतो. चूक ही कोणी जाणूनबुजून करीत नाही. पण आम्हाला गेल्या 2-3 वर्षापासून वेगळा अनुभव येत आहे. विधेयक सभागृहापुढे आल्यानंतर नियमाप्रमाणे कामकाज झाले पाहिजे अशी आम्ही मागणी नेहमी करीत असतो. कामकाज सल्लागार समितीमध्ये 2 विधेयके घेण्याचे ठरविल्यानंतर देखील शेवटच्या दिवसात 10-10 विधेयके येतात. त्यामुळे त्याचा ताण हा कामकाजावर पडतो. वास्तवित सभागृहाचे कामकाज हे दररोज पाच तास चालले पाहिजे असा नियम आहे. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने 12 तास सभागृहाचे कामकाज चालत आहे. एवढे तास बसूनसुध्दा सदस्यांना बोलण्याची संधी मिळत नाही. 5 मिनिटांमध्ये बोला, 2 मिनिटांमध्ये बोला असे सांगितले जाते. मी जेव्हा विधानसभेत होतो, तेव्हा एक मिनिटात बोलावे असे मला माननीय अध्यक्षांनी सांगितले होते. त्यावेळी मी एका मिनिटात कसे बोलावयाचे यासंबंधीचे प्रशिक्षण द्यावे व त्याप्रमाणे मग बोलतो असे सांगितले. (अडथळा)

सभापती महोदय, कालचा प्रकार हा घृणास्पद आहे. संसदीय कार्यमंत्री आता सभागृहात उपस्थित आहे. शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या विधेयकावर मला व काही अन्य सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलावयाचे होते. मला आठवते, काल सन्माननीय संसदीय मंत्री मला म्हणाले की, आता फार उशीर झाला आहे. तुम्ही आता बोलू नका. म्हणून मी त्या विधेयकावर बोललो नाही. हे बिल संमत होत असतानाचा काल शेतकऱ्यांच्या हिताचे बिल नसल्यामुळे आम्हाला विरोधाची भूमिका मांडायची होती म्हणून पोल मागितला. यात शासनाला अडचणीत आणण्याचा आमचा उद्देश नव्हता. पण त्यावेळी जे वळण लागले ते योग्य नव्हते. पीठासीन अधिकारी तसेच त्यांना कामकाजासंबंधी मार्गदर्शन करणारे जे सचिव आहेत त्यांनी हे प्रकरण निभावून नेले. खरे तर वस्तुस्थिती समोर ठेवून वस्तुनिष्ठ निर्णय त्यावेळी होणे आवश्यक होते. सत्ताधारी व विरोधी पक्ष येथे कामकाज होण्यासाठी येत असतो. उद्या आम्हाला कोणी विचारले की, एवढे दिवस अधिवेशन चालले तेव्हा तुम्ही काय काम केले, तर त्याचे उत्तर आम्हाला देता आले पाहिजे. जे विविध प्रश्न असतात, त्याकडे आम्ही महत्त्वाच्या विषयाच्या दृष्टीकोनातून पाहत असतो. कालची घटना घडल्यानंतर आमच्याकडून चूक झाली नाही असे मी म्हणत नाही. आमचीही चूक झाली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..

झाली असेल. कोणी बाकावर उभे राहिले असतील. घोषणा दिल्या असतील. आम्ही शांतपणे बसलो तर दडपण वाढत जाते अशी भावना सदस्यांमध्ये निर्माण झाली आहे. काल रात्री 12.00वाजता आम्ही बाहेर पडलो. या गडबडीमध्ये देखील पुढचे बिल पुकारले. कोणत्याही परिस्थितीमध्ये गडबड करून चर्चेविना, विचारविनिमयाशिवाय विधेयक मंजूर करणे भयानक असते. आमची नम्रपणे विनंती आहे. आम्ही सदनामध्ये सकाळी 10.00, 11.00, दुपारी 1.00 वाजता येतो ते रात्री 12.00 वाजेपर्यंत बसलेलो असतो. त्याबद्दल कोणाचीही तक्रार नसते. पण आता किती तास सभागृहाचे कामकाज चालवावयाचे यासंबंधी विचार करण्याची वेळ आलेली आहे. काल मला एका गोष्टीचे दु:ख झाले. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सुधारणा दिली. ती सादर केल्यानंतर तिचा विचार व्हावयास पाहिजे होता. सदर सुधारणा स्वीकारावी असा आम्ही आग्रह धरला नव्हता.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

ते या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी काल विधेयकाला ज्यावेळी सुधारणा दिली त्यावेळी आपल्याकडे सांगितले गेले की, ती सुधारणा एक दिवस अगोदर द्यावयास हवी होती. आम्हाला कायदा दाखविला गेला. हे विधेयक विधानसभा सभागृहातून मंजूर होऊन आले असे सांगितले गेले. परंतु अशा परिस्थिती आम्हाला सांगितले जाते की, विधेयकाला एक दिवस अगोदर सुधारणा द्यावयावस पाहिजे होती. महोदय, आम्हाला विधेयकच एक दिवस अगोदर मिळत नाही, मग सुधारणा तरी कशी देता येईल ? आताच मन साफ झाले तर पुढील वातावरण योग्य होईल या उद्देशाने मी बोलत आहे.

महोदय, आपण सभागृहाच्या पहिल्या दिवशी तालिका सभापतींची नावे जाहीर केली. त्यावर आमच्या पक्षाचे दोन सदस्य श्री.अरविंद सावंत आणि श्रीमती कांता नलावडे यांची निवड केली. परंतु आपण आतापर्यंतचे रेकॉर्ड तपासून पहा. किती दिवस त्यांना तालिका सभापती म्हणून बसण्यास संधी मिळाली? याचा अर्थ आपला आमच्या पक्षाच्या सदस्यांवर विश्वास नाही. सदस्यांना अनुभव मिळावा म्हणून आमच्याकडून नवीन सदस्यांना संधी दिली जाते. मग अशा परिस्थिती त्यांना न्याय मिळाला पाहिजे. सत्ताधारी पक्षाच्या तालिका सभापतींना चार-पाच तास जर संधी मिळत असेल तर, तशी संधी आमच्या पक्षाच्याही सदस्यांना मिळावी. कारण एखादा सदस्य तालिकेवर बसल्यानंतर तो कोणत्याच पक्षाचा राहत नाही. त्यावेळी त्याला निप:क्षपातीपणे काम करावे लागते. त्याच्या मनात नसले तरी त्याला तसे वागावे लागते. आमच्या पक्षातील सदस्यावर आपण अन्याय केला, अशा प्रकारची आमची भावना निर्माण झाली आहे. आपण ज्या स्थानावर बसला आहात, त्यावर सदनातील कोणतीही व्यक्ती जाऊ बसू शकते. त्या खुर्चीला चांगला न्याय देणाऱ्याची त्या ठिकाणी नियुक्ती होते. आपली सभापती पदी निवड झाल्यामुळे आम्हाला आनंद झाला होता. आपल्याकडून न्याय मिळावा अशा प्रकारची आमची अपेक्षा असते. परंतु एक गोष्ट खेदाने नमूद करावीशी वाटते की, दुसऱ्या सभागृहात आमच्या पक्षावर तीव्र टीका केली गेली. त्याला उत्तर देता यावे, म्हणून मी सदनामध्ये नियम 35 ची नोटीस सोमवारी दिली होती. हा विषय मांडण्यास परवानगी मिळेल अशी आमची अपेक्षा होती. परंतु परवानगी मिळाली नाही. याबाबत खरोखरच दु:ख होते. आमच्यावर दगड मारले जातात, आम्हास तक्रार मांडण्याची संधी दिली जात नाही आणि भूमिका मांडण्याचीही संधी दिली जात नाही. वास्तविक पाहता आमची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

आमच्या पक्षाशी बांधिलकी आणि निष्ठा आहे. आम्ही बेईमान होऊन दुसऱ्या पक्षात गेलो नाही. परंतु त्याचे फलीत जर असे मिळत असेल तर ते योग्य होणार नाही. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी आपापल्या तक्रारी मांडल्या. आम्हीही थोडक्यात आमची भूमिका मांडली.

काल माजी सभापती माननीय श्री.बाळासाहेब भारदे यांच्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा पार पडला. खरोखरच त्यांच्याबद्दल नितांत आदर आपल्या सर्वांना आहे. त्या समारंभात आपण सर्वच उपस्थित होतो. त्यांनी स्वत:च्या काही भावनाही मांडल्या. परंतु त्या नीट कळाल्या नाहीत. परंतु वर्तमानपत्रामध्ये एक बातमी छापून आली. त्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, "संसदीय लोकशाही प्रभावी झाली तर जनतेचे प्रश्न चांगल्या प्रकारे सुटू शकतील, असे मत 6 वर्षांपूर्वी व्यक्त केले होते. काही प्रमाणात तरी परिस्थिती सुधारेल असे आपल्याला वाटत होते. मात्र परिस्थितीत सुधारणा झाली नाही, उलटपक्षी वैधानिक कामकाजाचे भवितव्य हा चिंतेचा विषय झाला आहे". महोदय, अशा प्रकारची खंत गांधीवादी नेते आणि विचारवंत सन्माननीय बाळासाहेब भारदे यांनी व्यक्त केली. मला सुध्दा संसदीय लोकशाहीची चिंता आहे. कारण असेच प्रकार जर घडत राहीले तर या लोकशाहीचे भवितव्य काय आहे ? आमचा लोकशाहीवर नितांत विश्वास आहे, आदर आहे. सदस्यांकडून चुका होत असतील हे मान्य आहे. परंतु आम्ही लोकशाहीचे कोणतेही मूल्ये पायदळी तुडविली जाणार नाहीत याबाबत काळजी घेतो. सन्माननीय सदस्य नियमाप्रमाणे आणि शिस्तीने वागावेत अशा प्रकारचे संस्कार त्यांच्यावर करतो.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, मी आपणास आजचेच उदाहरण देतो. आज सकाळी मला सभागृहात यायला 20-25 मिनिटे वेळ झाला. मी आल्यानंतर मला कळले की, आमचे एक सन्माननीय सदस्य पीठासीन अधिकारी आले असताना उठले नाहीत. तेव्हा मी सर्वांना सूचना केली की, पीठासीन अधिकारी मग ते सभापती असोत, उपसभापती असोत किंवा तालिका सभापती असोत ते सर्वोच्च अधिकारी आहेत आणि त्यांचा मान ठेवणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. सभापती महोदय, अशाप्रकारे आम्ही सर्व गोष्टी करतो. काल श्री. बाळासाहेब भारदे म्हटले की, लोकशाहीला केवळ आपण सत्ताधारी निवडण्याचे यंत्र मानता की जीवनमूल्य मानता, हा यक्षप्रश्न आहे. लोकशाही यंत्रणा खऱ्या अर्थाने जनतेचे प्रश्न सोडवू शकली नाही आणि जनतेची आत्मियता मिळवू शकली नाही तर लोकशाही सार्थ होईल, असे आपल्याला वाटत नाही. काल त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन होते आणि त्याच दिवशी सभागृहात असे घडले. आज सकाळी आम्ही निर्णय घेतला की, सभागृहात यावयाचे आणि शांतपणे बसायचे, काहीही बोलायचे नाही. या संदर्भात आता आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे. त्या अगोदर मी आपणाला एक विनंती करु इच्छितो की, या विषयासंदर्भात आपण आमच्या 1-2 सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी द्यावी.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, काल झालेल्या प्रकाराबद्दल आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. काल झालेल्या गोष्टीमुळे मला अतिशय दु:ख होत आहे. ते दु:ख मी काल लपवून ठेवले नाही व लपवूही इच्छित नाही. एखाद्या प्रश्नाची तड सन्माननीय सदस्य लावत असताना पीठासीन अधिकाऱ्यांनी त्यांना एवढ्याच वेळात बोला असे म्हणणे बरोबर नाही. आजपर्यंत आम्हाला प्रश्न मांडल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पहायला मिळाला. त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळाले. पीठासीन अधिकाऱ्यांकडून मदत मिळाली. सभापती महोदय, 1993 पासूनचा एक अनुशेषाचा प्रश्न होता. त्याचप्रमाणे बिडी प्रकल्पाचा देखील प्रश्न होता. दीड वर्ष होऊन दिले आहे. सन्माननीय सदस्य प्रश्न विचारणार असेल आणि त्याला थांबविले तर ते बरोबर होत नाही. डायव्हर्शन प्रकल्पासंदर्भात माझी दोन प्रश्ने होती. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांचे आदेश देखील होते

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

की, डायव्हर्शनसाठी 4 महिन्यांच्या आत निर्णय घेऊन निधी द्यावा. माझ्याकडे डेप्युटी सेक्रेटरींचे त्या संदर्भातील एक पत्र आहे, ज्यामध्ये त्यांनी सर्व्हेसाठी सुध्दा पैसे द्यायचे नाहीत असे सांगितले होते. मला त्या संदर्भात दोन तीन प्रश्न मांडावयाचे होते. प्रश्न विचारता न आल्यामुळे मला फार दु:ख झाले. सभापती महोदय, पोलिटीकल विषय असल्यावर पोलिटीकल ट्रिटमेंट मिळाली तर त्या संदर्भात आमचे काही म्हणणे नाही. परंतु जर एखादा प्रश्न माहितीसाठी मांडला जात असेल तर सन्माननीय सदस्यांना तो प्रश्न विचारु दिला पाहिजे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

या सभागृहाच्या माध्यमातून प्रश्न सुटू शकतात, याचा आनंद पीठासीन अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यांवर दिसावयास पाहिजे. कारण नाचतांना किती प्रॅक्टीस करावी लागते हे सर्वांना माहिती आहे. मी गेल्या 7 ते 8 वर्षापासून या प्रकल्पांचा प्रश्न मांडीत आहे परंतु मला न्याय मिळालेला नाही, याचे मला खूप दु:ख होते. दुसरी गोष्ट अशी की काल सभागृहामध्ये जे विधेयक आणले होते त्यामध्ये मी एक दोन ओळीची सुधारणा दिली होती. त्यावेळी मला चेअरवरुन असे सांगण्यात आले की, आपली सुधारणा एक दिवस अगोदर द्यावयास पाहिजे होती, ती एक दिवस आधी न दिल्यामुळे नाकारण्यात आली आहे. त्यानंतर मी लगेच पत्र दिले, की आपण बील आज आणले आहे. And it has been stated that " As passed by the Legislative Assembly." एक दिवस अगोदर बील आणलेले असतांना, Mr. Chairman, Sir, the Bill or a matter which I have received one hour earlier, I can not give an amendment to that Bill a day before. मी हे पत्र लिहून पाठविले, नंतर मला पीठासीन अधिकाऱ्यांनी असा निर्णय दिला की, आपली सुधारणा ही विधेयकाच्या दृष्टीने नकारात्मक असल्यामुळे ती फेटाळली आहे. सुधारणा फेटाळणे, स्वीकारणे तो आपला अधिकार आहे, त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. परंतु येथे ज्या पध्दतीने भावना व्यक्त करण्यात आल्या त्यामुळे मला निश्चित दु:ख झालेले आहे. एका तासामध्ये हे दोन प्रकार मला पाहावयास मिळालेले आहे. त्यानंतर संध्याकाळी विधेकाच्याबाबत डिव्हीजन मागण्यात आले. लोकशाहीमध्ये या गोष्टी चालणार नाहीत काय ? कायद्याने व नियमाने सदनाचे कामकाज चालावे व त्याप्रमाणे ते हाताळले जावे. सत्ताधारी आहेत म्हणून बेपवाई नको, व अल्पमतात आहे, म्हणून दांडगाई नको, आणि बेपवाई केल्यामुळे दांडगाई निर्माण होते याचाही विचार करण्याची गरज आहे. एखादा सदस्य सभागृहामध्ये एखाद्या विषयावर अभ्यासपूर्ण बोलत असतांना त्यांची वाहवा व्हावयास पाहिजे व त्याचा आनंद व उत्साह पीठासीन अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसावयास पाहिजे. मला या सर्व गोष्टीचे फार दु:ख होत आहे, माझ्या या दोन्ही प्रश्नांचा चोथा झालेला आहे, अप्पर वर्धा धरणाचे डायव्हर्शन करण्यात आलेले आहे. यामध्ये करेक्शन करण्याची गरज आहे एक गोष्ट मी आपणास सांगू इच्छितो की, एका प्रश्नासाठी अनेक

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिवसापासून सदस्यांनी प्रॅक्टीस केलेली आहे, एक एक पाऊल कसे टाकावे, याबाबत त्यांनी अभ्यास केलेला आहे त्याला बोलण्याची संधी दिली जात नाही व ज्याने काहीही अभ्यास केलेला नाही त्याला तुम्ही बोला, तुम्ही बोला असे करणे योग्य नाही. या तीन्ही गोष्टींचे मला फार दु:ख झालेले आहे, यातून आपण मला वाचवावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये दुर्देवी चर्चा सुरु आहे, कामकाज सल्लागार समितीच्या बाबतीत कामकाज घेण्याबाबत निर्णय घेण्यात येतात. मी कामकाज सल्लागार समितीचा सदस्य नाही. काल सभागृहामध्ये दोन वेळी मी यासंदर्भात हरकत घेतली. सकाळी 9 वाजता या सभागृहामध्ये कामाला सुरुवात करावयाची व रात्री 12 वाजेपर्यंत काम थांबत नाही. तरी आम्ही तेवढा वेळ थांबतो. काला रात्री यासंदर्भात चर्चा झाली. विरोधी पक्ष नेत्यांनी जे विचार आता व्यक्त केले, ते अपूर्व विचार त्यांनी व्यक्त केलेले आहे. त्यांच्याकडून आमची अपेक्षा अशी होती की, कामकाज सल्लागार समितीमध्ये आपण कामकाज ठरवित असतात त्याप्रमाणे कामकाज होत नसल्यामुळे त्यांनी ते थांबवायला पाहिजे. त्यावेळी हरकत घ्यावयास पाहिजे. मी या अधिवेशन काळामध्ये दोन वेळा हरकत घेतलेली आहे. या ठिकाणी प्रामुख्याने सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, स्पष्टपणे बोलले आहेत की, या ठिकाणी प्रश्न, लक्षवेधी मांडतांना आम्ही 45 दिवस आधी प्रश्न व लक्षवेधी देतो.

यानंतर श्री. सरफरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

आणि आमच्या दृष्टीने महत्वाचे असलेले प्रश्न या ठिकाणी खऱ्या अर्थाने चर्चेला येत नाहीत, ते अस्वीकृत होतात. लक्षवेधी सूचनांचे विषय अभ्यास करुन मांडण्याचा आम्ही प्रयत्न करतो, परंतु त्या सूचना मांडल्या जात नाहीत, किंवा त्या स्वीकारल्या जात नाहीत, त्या चर्चेला घेतल्या जात नाहीत. अशाप्रकारची भावना या सभागृहातील सर्व माननीय सदस्यांची झालेली आहे. आणि म्हणून या संदर्भात या सभागृहामध्ये अशाप्रकारची चर्चा होणे शोभादायक आहे असे मला वाटत नाही. परंतु दुर्दैवाची बाब अशी की, मी कामकाज सल्लागार समितीचा सदस्य नसल्यामुळे यासंबंधीच्या माझ्या भावना मी कुणाकडे व्यक्त करावयाच्या हा माझ्यासमोर प्रश्न उपस्थित होतो. काल रात्री सभागृहाचे काम थांबल्यानंतर माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना माझी याबाबत असलेली भावना व्यक्त केली. त्यांना मी सांगितले की, आम्ही या सभागृहामध्ये जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी, आणि त्याबाबत आमचे विचार मांडण्यासाठी अभ्यास करुन येतो. त्यावेळी आमच्या प्रश्नांना न्याय मिळून आमचे प्रश्न सुटले तर समाधान मिळते. परंतु ते समाधान आम्हाला मिळेल असे वाटत नाही. त्यादृष्टीने कामकाज सल्लागार समिती व्यतिरिक्त सर्व पक्षाच्या गट नेत्यांनी एकत्र येऊन आणि प्रदीर्घ चर्चा करुन या सभागृहाचे वातावरण कसे निवळेल यासाठी प्रयत्न करावेत. या सभागृहाचे ज्येष्ठ माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ते कधीही अशाप्रकारे बोलत नाहीत. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे अनेक वेळा चिडतात. परंतु आपले कुठे चुकले असेल तर ते आपली चूक कबूल करतात. आणि माघार घेऊन सभागृहाची माफी देखील मागतात, तशी यापूर्वी त्यांनी मागितलेली आहे. तेव्हा सभागृहाचे हे वातावरण निवळले पाहिजे. आज सभागृहाचे 11 माननीय सदस्य निवृत्त होत असल्यामुळे त्यांना आपण निरोप दिला पाहिजे असे मला वाटते. त्यादृष्टीने सभागृहाचे वातावरण मनमोकळे, प्रसन्न राहिल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे मला वाटते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय,....

सभापती : आपण कृपया खाली बसावे, मी आपल्याला बोलायला परवानगी दिलेली नाही...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय सदस्यांना त्यांची व्यथा, दु:ख मांडू दिले पाहिजे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी आपल्याला बोलावयास परवानगी दिली, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना परवानगी दिली, माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांना परवानगी दिली व माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना परवानगी दिली...

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सदस्यांना जर आपल्या व्यथा मांडावयाच्या असतील तर त्यांनी त्या कोठे मांडाव्यात?

सभापती : त्यांनी माझ्या दालनामध्ये येऊन मला सांगावे...

श्री. मधुकर सरपोतदार : दालनामध्ये येऊन उपयोग होत नाही...

सभापती : नक्की उपयोग होतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रत्येक माननीय सदस्यांना आपण दोन-दोन मिनिटे बोलू द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मला अर्धा मिनिट तरी बोलू द्यावे...

सभापती : अर्धा मिनिट सुध्दा नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तीन माननीय सदस्यांना एकेक मिनिट बोलू द्या.

श्री. मधुकर सरपोतदार : अशाप्रकारे आपल्याला पुढे दडपून न्यावयाचे आहे कां?

सभापती : माननीय विरोधी पक्षनेते म्हणून मी आपले म्हणणे ऐकले आहे, शिवसेनेचे गट नेते म्हणून माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचे म्हणणे ऐकले आहे. याचा अर्थ आपल्या पक्षाच्या सर्व माननीय सदस्यांचे म्हणणे आपणामार्फत मी ऐकले आहे. माननीय विरोधी पक्षनेते हे भारतीय जनता पक्षाचे नेते यादृष्टीने मी त्यांचे म्हणणे ऐकले. त्याचप्रमाणे ज्येष्ठ माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांचे म्हणणे ऐकले व माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे म्हणणे ऐकले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमच्या वैयक्तिक व्यथा आपल्याला कळणार कशा?

सभापती : आपण माझ्या दालनामध्ये येऊन मला सांगा.

श्री. मधुकर सरपोतदार : काही उपयोग होत नाही....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दोन माननीय सदस्यांना दोन-दोन मिनिटे तरी बोलू द्या. याचे कारण आपल्या दालनामध्ये अनेकदा येऊन सुध्दा त्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत.

सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या संदर्भात सविस्तर निवेदन केले आहे, तसेच माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनीही निवेदन केले आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी व माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनीही निवेदन केले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अ□□ स□□□□य सदस्य बोल□यासाठी परवा□ मा□□त)

सभापती : □ही. आता संसदीय □र्य मंत्री बोलतील.

श्री.पांडुरं□ फुंड□र : सभापती महोदय, स□□□□य सदस्यां□ दो□ मि□□ बोलू द्यावे.

सभापती : □ही.

...(अडथळा)....

श्री.हर्षवर्ध□ पाटील : स□□□□य विरोधी प□ □ते, स□□□□य सदस्य श्री.सरपोतदार साहेब यां□ दे□ील □ही मुद्दे उपस्थित □लेले आहेत. त्याच मुद्याच्या संबंधात मी बोल□र आहे. या ठि□□ असे सां□□यात आले □, विधेय□वर बोलू दिले जात □ही. □लच्या प्रसं□ घडला त्याचा सा□दार मी आहे. □ल स्वयंसहाय्यित विद्यापीठ विधेय□वर चार-साडे चार तास चर्चा □ली. त्यावर अ□□ स□□□□य सदस्यां□ आपली मते व्यक्त □ली. त्या□र □ी, प□□ विभा□ाचे बील चर्चेला आले. त्यावर अ□□ स□□□□य सदस्यां□ विशेषत: स□□□□य सदस्य श्री.रावते साहेब हे त्यावर ए□ सव्वा तास बोलले. सर्व स□□□□य सदस्यांची भाष□ झाल्या□र प□□ राज्यमंत्री भाष□ □र□यासाठी उभे राहिले. ही □ष्ट □री आहे □, स□□□□य सदस्य श्री.सरपोतदार साहेबां□ बोलू □दे अशी मी वि□ती □ली. परंतु सत्ताधारी प□□ डू□ विधेय□वर बोलू दिले जात □ही असे □ही. दुसरे असे □, स□□□य विरोधी प□ □ते श्री.फुंड□र साहेब, आपण □म□ज सल्ला□र समितीमध्ये ज्या □ष्टी ठरवितो,ज्याच पध्दती□ सभा□ृहात कामकाज करत असतो. विधा□सभे□डू□ दो□ विधेय□ मंजूर होऊ□ आली होती....

श्री.पांडुरं□ फुंड□र : तोच □ोधळ □लेला आहे. वारंवार सभा□ृहात विधेय□ आ□त असतां□ □म□ज सल्ला□र समितीमध्ये ठरल्याप्रमा□ या ठि□□ विधेय□ यायला पाहिजे. मा□्या अधिवेश□□मध्ये दे□ील अशाचप्रमा□ आम्हाला विधेय□वर बालू दिले □ही. □पया तुम्ही चु□ची माहिती देऊ □दे.

श्री.हर्षवर्ध□ पाटील : □म□ज सल्ला□र समितीमध्ये हे बील घ्यायचे ठरले होते, ही □ष्ट □री आहे की, सीमा प्रश□ाच्या संबंधात आप□ ए□ दिवस सभा□ृह तहू□ब □ले. त्यामुळे त्या दिवशीची दो□ विधेय□ दुसऱ्या दिवशी दा□वावी ला□ली. माझी सद□ला एवढीच वि□ती आहे □, □ल जो □ही प्र□र घडला, तो □दर्श□स आ□लेला आहे. शेवटी आप□ □ठे तरी विचार □र□ त्याबाबत □□□य घे□याची आवश्य□ता आहे. आज स□ळपासू□ अ□□ वेळा सभा□ृहाचे □म□ज तहू□ब □र□यात आले. आप□ सर्व प□ाच्या □ट □□यांची बैठ□ बोलाविली आहे, त्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरु....

आपल्यासमोरील अधि□चे □म□ज ..म□ती विधेय□ असतील. त्याबाबत त्या बैठ□त □□□य घेऊ□ मा□□□ढू. परंतु माझी सद□□ला वि□□ी आहे □, आप□ आता सभा□□हाचे □म□ज सुरु □रावे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, □ल सभा□□हामध्ये जी □ही घट□□ घडली, त्यावेळी मी सा□□दार □□हतो. परंतु आज स□ळी 10-00 ते 12-30 वाजेपर्य□त सभा□□हाचे पहिल्या सत्राचे □म□ज हो□र होते त्यांतर दुपारी 1.45 वाजता प्रश□□तराचा तास सुरु होऊ□ रे□युलर □म□ज पुढे सुरु हो□र होते. परंतु □ल जी घट□□ घडली, त्या संदर्भात विरोधी प□□□ते, मा□□□य श्री.सरपोतदार साहेब या मा□□वरां बरोबर चर्चा □रावी असे ठरले. विरोधी प□□□ते मा□□□य श्री.फुंड□र साहेबां□ येथे यायला थोडा उशीर ला□□ला आ□□ स□मा□□□य सदस्य श्री. सरपोतदार साहेब यांना ट्राफि□च्या अडच□□मुळे यायला उशीर झाला. आल्या□□र त्यां□□ सां□□□ले □, अ□□दर आमच्या सह□□्यांशी आम्ही चर्चा □रतो आ□□ यातू□ व्यवहारी मा□□□ढ□याचा प्रयत□ □रतो. प्रश□□तराचा तास सुरु झाल्या□□र विरोधी प□□□ते श्री.फुंड□र साहेब, स□मा□□□य सदस्य श्री.मधु□र सरपोतदार साहेब, सि□□□र स□मा□□□य सदस्य प्रा.बी.टी.देशमु□ साहेब, शेत□री □म□र प□□चे □□ □□ते, श्री.जयंत पाटील, यां□□ आपले म्ह□□□ मांडले. त्या□□र संसदीय □र्यमंत्री आपले म्ह□□□ माड□याासाठी उभे राहिल्या□□र □ही स□मा□□□य सदस्यां□ म्ह□□□ मांडायचे आहे,त्यां□ बोलू द्यावे अशी वि□□ी □र□यात आली.

या□□र श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

परंतु आता सगळ्या सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडावयाचे म्हटले तर पुढचे कामकाज उरकणार नाही. माझी विरोधी पक्षाच्या सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. आपल्या वतीने माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि गटनेत्यांनी आपापले जे काही दुखणे असेल ते मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे सगळे म्हणणे ऐकल्यानंतर सभापती महोदय, आपण निर्णय द्यावयाचा आणि त्यानंतर सभागृहाचे नियमित कामकाज सुरु करावयाचे असे ठरलेले आहे. त्या पध्दतीने कामकाज व्हावे अशी माझी सर्वांना विनंती आहे. तशा पध्दतीने आपण कामकाज सुरु करावे.

श्री. मधुकर चव्हाण : आम्हाला पोल का मिळाला नाही ते सांगावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल या ठिकाणी ज्या विषयासाठी हे सर्व घडले ती गोष्ट कोणीही मानावयास तयार नाही. आपल्या विधान परिषदेच्या नियमानुसार बिल मंजूर करीत असताना एका सन्माननीय सदस्याने जरी पोल मागितला तरी पोल द्यावयास पाहिजे. एखाद्या गटाने अशा पध्दतीचा पोल मागितला तरच पोल द्यावयास पाहिजे असे नाही तर एका सन्माननीय सदस्याने जरी पोल मागितला तरीही पोल द्यावयास पाहिजे. या नियमाला बाजूला सारुन या ठिकाणी पोलची मागणी होत असतानाही पोल देण्यात आला नाही आणि आवाजी मतदानाने किंवा दादागिरीने ते बिल मंजूर करण्यात आले. याबाबतीत तडजोड होऊ शकत नाही. जे घडले त्यामध्ये चूक झालेली आहे हे कोणी तरी मान्य करावयास पाहिजे परंतु कोणीही चूक मान्य करीत नाहीत. आपण अशा पध्दतीने कामकाज पुढे नेणार असाल तर आपण कामकाज चालवावे. आम्ही या ठिकाणी बसतो.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी एकूण सभागृहाच्या कामकाजाच्या अनुषंगाने आणि विशेषत: विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये असणारी जी भावना आहे ती मांडण्याचा प्रयत्न केला. त्या भावना मांडत असताना गटनेते सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या. संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील तसेच माननीय मंत्रिमहोदय श्री. अजित पवार यांनीही आपल्या माध्यमातून विरोधी पक्षाला आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

विरोधी पक्षाच्या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती केली. एकूण कामकाजाच्या अनुषंगाने आपण या ठिकाणी ज्या पध्दतीचा अवलंब करतो ते करीत असताना या कामकाजाच्या संदर्भात जी विविध संसदीय आयुधे दिलेली आहेत ती आयुधे वापरत असताना कोणत्याही सन्माननीय सदस्यांवर अन्याय होऊ नये याबाबतीत सगळ्यांची प्रखर भावना होती असे मला वाटते. कालच्या घटनेच्या अनुषंगाने आपली जी भावना आहे त्याबाबत मी सर्वांत शेवटी सांगणार आहे. परंतु त्याच्या अगोदर सदनामध्ये येणारे जे तारांकित प्रश्न असतील, अतारांकित प्रश्न असतील, अशा पध्दतीचे जे प्रश्न आहेत त्याबाबतीत साधारणत: 30 दिवसांच्या मुदतीने हे प्रश्न या ठिकाणी मागवले जातात. त्यांची छाननी करुन जे प्रश्न या ठिकाणी ॲडमिट होतात तेच प्रश्न या सभागृहामध्ये क्रमाक्रमाने दाखवत असतो. याबाबतीत मी असे म्हणेन की, जे प्रश्न क्रमवारीने दाखवतो किंवा जी प्रायोरिटी असते त्या अनुषंगाने काही शंका असेल तर मी सन्माननीय विरोधी पक्षनेते, सगळे गटनेते, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील या सगळ्या सन्माननीय सदस्यांना माझ्या दालनामध्ये बोलवण्याचे ठरविले आहे. यापूर्वीही 20 तारखेला यासंदर्भातील चर्चेसाठी बोलवले आहे असे मी सांगितले होते. परंतु काल सन्माननीय विरोधी पक्षनेते अत्यंत महत्वाच्या कामासाठी नागपूरला गेल्यामुळे काल अशी चर्चा झाली नाही. ती चर्चा जर आज करावयाची असेल तर दरम्यानच्या काळामध्ये वेळ मिळाला तर ती चर्चा करण्यास मी तयार आहे. माझ्याही याबाबतीत काही अपेक्षा आहेत. आपल्या मनामध्ये एखादी अंधुकशीही शंका आली तर त्याबाबतीत निश्चितपणे खात्री झाली पाहिजे की, यामुळे कोणत्याही सन्माननीय सदस्यांवर यत्किंचितही अन्याय होता कामा नये. त्यादृष्टीने हे कामकाज आहे त्यापेक्षा काटेकोर कसे होईल याची काळजी सभापती या नात्याने मी निश्चित घेईन.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**माननीय सभापती**...)

लक्षवेधीच्या अनुषंगाने बघितले तर माझ्या अंदाजाने 300 ते 400 लक्षवेधी येतात. नियमाप्रमाणे दररोज दोन किंवा तीन लक्षवेधी घ्याव्यात अशी तरतूद आहे. एका लक्षवेधीवर 15 मिनिटे चर्चा व्हावी आणि अगदी काटेकोरपणे पाहिले तर दोन-तीन प्रश्न विचारुन लक्षवेधी वरील चर्चा संपली पाहिजे. असे असतानाही अनेक सन्माननीय सदस्यांना संधी मिळावी म्हणून काही वेळा चार तर काही वेळा पाच अशा पध्दतीने लक्षवेधीची संख्या वाढविण्याचा मी प्रयत्न करीत असतो. या पुढच्या काळामध्ये तीनच्यावर लक्षवेधी घ्यावयाच्या नाहीत अशा पध्दतीचा निर्णय घेतला तर नंतरच्या काळात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांवर तो अन्याय होईल अशी माझी भावना आहे. आपण एकूण कामकाजाच्यादृष्टीने जेव्हा विचार करतो त्यावेळी नियमाप्रमाणे 3 लक्षवेधीचे कामकाज 45 मिनिटांमध्ये पूर्ण व्हावे अशी अपेक्षा आहे. परंतु प्रत्यक्षात बघितले तर यदाकदाचित दोन-अडीच तासापेक्षाही जास्त वेळ चर्चा एखादी अत्यंत महत्वाची लक्षवेधी असेल तर त्यावर होते. याबाबतीत काय केले पाहिजे हे ठरविण्यासाठी मी नियम समितीची बैठक लवकरात लवकर घेण्याचे ठरविलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्या प्रमाणे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये आठवड्यातून तीन दिवस दररोज दोन किंवा तीन विधेयके घेण्याचे निश्चित झाले होते. अशा प्रकारे आठवड्यातून दररोज दोन किंवा तीन विधेयके चर्चेसाठी घेतली तर त्या कामाचा बोजा पडणार नाही, चर्चा चांगली होईल आणि विधेयकाला न्याय मिळेल असे शासकीय कामकाजाच्यादृष्टीने आपण बोलत होतो. दरम्यानच्या काळामध्ये अनेक कारणामुळे दोन-तीन दिवस सभागृहाचे कामकाज होऊ शकले नाही. त्यामुळे त्या दिवसाची विधेयके थबकली. याबाबतीत मला असे वाटते की, कामकाज सल्लागार समितीची बैठक येत्या 15 दिवसामध्ये कशी घेता येईल हे मी पाहीन. याबाबतीत आपण सर्व चर्चा करु. याबाबतीत काही दोष असतील तर ते काढले पाहिजेत. तेव्हा दर आठवड्यातून तीन दिवस विधेयके चर्चेला घेतली गेली तर अधिवेशनाच्या शेवटच्या दोन-तीन दिवसामध्ये निर्माण होणारा डेड लॉक काढणे शक्य होईल.

या विधेयकाच्या अनुषंगाने चर्चा होत असताना खरे म्हटले तर विधानसभेचे किंवा विधानपरिषदेचे महत्वाचे काम म्हणजे विधेयके मंजूर करणे, विधेयकावर चर्चा करणे, हे आहे. त्यामुळे त्या कामाला प्राधान्य देण्याची गरज आहे असे मला वाटते. सन्माननीय विरोधी पक्षनेते

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय सभापती...)

श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की, विधेयकावर जास्तीत जास्त विचार मांडले गेले पाहिजेत, विधेयकातील उणिवा दाखवून दिल्या पाहिजेत. त्यांच्या या मताशी मी देखील सहमत आहे. मग हे कसे करता येईल ? आपण आठवड्यातून तीन दिवस विधेयके चर्चेसाठी घेऊ शकलो तर हे करणे शक्य होईल असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी तीन प्रश्न मांडले. 93च्या निवेदनाच्या बाबतीत फक्त निवेदन दिले जाते. त्या निवेदनावर प्रश्न किंवा उपप्रश्न विचारण्याची संधी देणे याबाबतीत देखील दुमत आहे. यादृष्टीने काय केले पाहिजे हे ठरविण्याच्या दृष्टीने नियम समिती आणि अन्य माध्यमातून विचार करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांचा वर्धा अप्पर-वर्धा यासंबंधीचा प्रश्न अन्य कोणत्याही मार्गाने विचारणे शक्य आहे. तेव्हा त्याबाबतीत पुन्हा विचार करणे शक्य होईल असे वाटत नाही. याबाबतीत सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, संबंधित मंत्री आणि मी, आपण माझ्या दालनामध्ये बसून काही मार्ग काढता आला तर तो काढू.

सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी काल जी सुधारणा दिलेली होती ती तांत्रिक कारणावरुन रिजेक्ट केलेली नसून ती मेरिटवर डिसअलाव्ह केलेली आहे. सन्माननीय उपसभापतींनी त्याबाबतीत जो निकाल वाचून दाखविला तो तो माझा निकाल होता.

..नंतरश्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

मला असे वाटते की, काल बिलाच्या निमित्ताने एका अत्यंत चांगल्या वातावरणात चर्चा सुरु होती आणि सभागृहामध्ये एका अत्यंत चांगल्या वातावरणात चर्चा सुरु असताना ज्यावेळी " होय चे बहुमत" "होय चे बहुमत " असा प्रस्ताव मांडण्यात आला तत्पूर्वी अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे आणि प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे असे पीठासीन अधिकाऱ्यांनी बोलल्यावर पोल घेण्याची मागणी करण्यात आली. पोलची आवश्यकता आहे ही मानसिकता आहे. त्याचबरोबर याठिकाणी बसलेले जे पीठासीन अधिकारी आहेत त्यांना 41 नियमाखाली कळत-नकळत काही अधिकार आहेत ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. मी त्या गोष्टीला संरक्षण देणार आहे असे मी म्हणणार नाही. वस्तुस्थिती आहे ती मी याठिकाणी सांगितली आहे. त्यानंतर पुन्हा ज्यावेळी सदनाचे कामकाज सुरु झाले त्यावेळी याठिकाणी जे पीठासीन अधिकारी होते त्यांनी म्हणजे उपसभापतींनी सांगितले की याबाबतीत जी काही तांत्रिक चूक राहून गेली असेल त्याबाबतीत मी दिलगीरी व्यक्त करतो. मला असे वाटते की, कालच्या या घटनेसंबंधी सविस्तर खुलासा करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने विचार केला तर ज्यावेळी 300 लक्षवेधी सूचना ॲडमिट होतात अशा वेळी 18-20 दिवसांचे कामकाज झाले तर रोज दोन लक्षवेधीच्या हिशोबाने विचार केला तर 36 लक्षवेधी सूचना होतील आणि रोज तीन लक्षवेधीच्या हिशोबाने विचार केला तर 18 दिवसांच्या कामकाजामध्ये 54 लक्षवेधी सूचना होतील. या व्यतिरिक्त ज्या सदस्यांच्या लक्षवेधी सूचना आलेल्या असतील त्यांना आपली लक्षवेधी सूचना चर्चेला आली नाही याची हुरहूर त्यांच्या मनामध्ये असण्याची शक्यता आहे. याबाबतीत माननीय विरोधी पक्षनेते , माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांच्यासह ते मला माझ्या कार्यालयात भेटले तर मी त्यांच्याशी चर्चा करीन. दरम्यानच्या काळामध्ये येत्या पंधरा दिवसात मी नियम समितीची बैठक बोलाविणार आहे. तसेच मी याबाबतीत कामकाज सल्लागार समितीची बैठक तातडीने घेण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यामुळे दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य आणि विशेषत: विरोधी पक्षाचे जे सदस्य आहेत त्यांना विविध आयुधे वापरण्याच्या दृष्टीने योग्य पध्दतीचा न्याय मिळावा हे पाहिले जाईल. यादृष्टीकोनातून सगळयात महत्वाचे आणि नाजूक काम पीठासीन अधिकाऱ्याचे आहे याची याठिकाणी पूर्ण जाणीव असणारा मी आहे. सर्वांच्या सगळयाच अपेक्षा पूर्ण करणे काही वेळेला वेळेच्या अभावामुळे शक्य होत नाही. यापुढील काळात 93 च्या सूचनांवरील निवेदनावर किती प्रश्न

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

याला सुध्दा काही कालमर्यादा आहेत. लोकसभेचे असणारे कामकाज आणि त्याठिकाणची पध्दत आणि याठिकाणी असणारे कामकाज आणि याठिकाणची पध्दत हे पाहिले पाहिजे. माननीय विरोधी पक्षाच्या नेत्यांनी याठिकाणी सांगितले की, एखाद्या प्रश्नाला 35 मिनिटे दिली जातात तर एखादा प्रश्न 5 मिनिटात होण्याची शक्यता आहे. प्रश्नोत्तराच्या तासाचा विचार केला तर यादीमधील प्रश्नांची संख्या लक्षात घेता आजकाल आपण जवळजवळ 10-12 प्रश्नांपर्यंत पोहोचलो आहोत. याबाबतीत माझी मानसिकता आणि लोकसभेचा दाखला द्यावयाचा झाला तर तेथे एखाद्या माननीय सदस्याचा प्रश्न आल्यानंतर त्याबाबतीत त्या सदस्याला दोन उपप्रश्न विचारण्याची परवानगी आहे. याबाबतीत आपल्या येथे कशी पध्दत असावी या अनुषंगाने मी आपणा सर्वांशी विचार-विनिमय करुन याबाबतीत काटेकोरपणाने नियम पाळले जावेत यादृष्टीने आपण प्रयत्न करु. दोन उपप्रश्न विचारले जावेत असे मी म्हणणार नाही. पण कमीत कमी वेळात यापुढे आताची प्रश्नांची संख्या आहे ती 12-13 पर्यंत होईल. मी सुध्दा अनेक वर्षे दोन्ही सदनात काम करणारा सदस्य आहे. गेली 28 वर्षे विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये मी काम करीत आहे. प्रश्नांच्या बाबतीत विचार केला तर माझा नववा प्रश्न असेल आणि आठवा प्रश्न झाल्यानंतर जर प्रश्नोत्तराचा तास संपला तर माझ्या मनामध्ये हुरहूर लागते अशी अवस्था होते. यापुढे प्रश्नोत्तराच्या तासामध्ये जास्तीत जास्त प्रश्न चर्चेला यावेत यादृष्टीने प्रयत्न केले जातील. यापुढील काळात कोणताही प्रश्न असला तरी दहा मिनिटांपेक्षा जास्त वेळ चालणार नाही असा कठोर आणि कणखर निर्णय घेतला तर जास्तीत जास्त माननीय सदस्यांना न्याय मिळेल.

नंतर भारवि

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती..

लक्षवेधी सूचनेला किती वेळ द्यायचा याचा देखील विचार करावा लागेल. एका लक्षवेधी सूचनेला 15 मिनिटे दिलीत तर एका तासामध्ये 5 लक्षवेधी सूचना घेता येतील. तेव्हा यासंबंधी देखील नियम समिती आणि कामकाज समितीच्या माध्यमातून निर्णय घ्यावा लागेल. मी पीठासीन अधिकारी या नात्याने एवढे सांगेन की, सभागृहाचे कामकाज समतोल पध्दतीने आणि चांगल्या पध्दतीने झाले पाहिजे. काल रात्री कळतनकळत चूक राहून गेली. त्यासंबंधी पीठासीन अधिकाऱ्यांनी दिलगिरी देखील व्यक्त केली. संपूर्ण सभागृहाचे कामकाज काटेकोरपणे चालविणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. कालच्या प्रकारात माझा अप्रत्यक्ष सहभाग आहे असे समजून मी त्याबाबत दिलगिरी व्यक्त करतो. आता आपण पुढचे कामकाज सुरू करू या.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठवेणे.

सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 31 मार्च 2006 व दिनांक 7 मार्च 2006 ची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : दिनांक 31 मार्च 2006 व दिनांक 7 एप्रिल 2006 ची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधीचे उत्तर सभागृहासमोर ठेवणे.

श्री.रणजित कांबळे : महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबई मलनि:सारण प्रकल्प (दोन) पूर्ण करण्यासाठी जागतिक बँकेकडून मिळणारे कर्ज" या विषयावरील श्री.मधुकर चव्हाण व श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचा दिनांक 16 डिसेंबर 2005 रोजी सभाृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 21 डिसेंबर 2005 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 9987 ला दिलेले उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : ता.प्र.क्र.9987 चे उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

(प्रेस : येथे सोबतचे लेखी पत्र छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील विशेषत: पडित जमिनीवर रोहयो फलोत्पादन विकास कार्यक्रमांतर्गत जट्रोफा आणि करंज लागवड करण्याबाबत" या विषयावरील श्री.संजय दत्त, श्री.गोविंदराव आदिक, श्री.रमेश निकोसे, श्री.धनाजी साठे, वि.प.स.यांच्या दिनांक 24 मार्च 2006 रोजी उत्तरित झालेल्या तारांकितय प्रश्न क्रमांक 13235 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिकची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिकची माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने "उसगाव ग्रामपंचायतीमध्ये झालेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार" या विषयावरील डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विलास अवचट, ॲड.अनिल परब, वि.प.स.यांच्या दिनांक 21 मार्च 2006 रोजी उत्तरित इ ालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 13201 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिकची माहिती छापावी.)

.....

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

प्रा.जोगेंद्र कवाडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

महोदय, भारतीय संविधानात कलम 335, अनुच्छेद 16(4) यातील तरतुदीचा एकत्रित विचार करता, राज्य सरकारच्या शासकीय-निमशासकीय अनुदानित संस्था इ. सेवांमध्ये मागासवर्गीयांसाठी जागा राखून ठेवण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. महोदय, हा अहवाल सादर करीत असताना समितीने ज्या सर्वसमावेशक शिफारशी केल्या आहेत त्याचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीने महाराष्ट्रातील कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, नाशिक, नागपूर, अमरावती व मुंबई अशा 7 विभागांतील अनुदानित आणि विना अनुदानित खाजगी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील भरती, बढती, आरक्षण, पदोन्नती व अनुशेषाबाबत तपासणी केली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, अनुशेष भरण्याची प्रक्रिया चांगल्या पध्दतीने वेग धरत आहे. त्यामुळे समितीला असे वाटते की, खाजगी अनुदानित आणि विना अनुदानित शिक्षण संस्थांच्या संचालकांनी एक सामाजिक जाणीव म्हणून आरक्षण भरण्यास सुरुवात केली आहे. ही एक चांगली बाब आहे. अशा पध्दतीने सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन महाराष्ट्रातील सर्व खाजगी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळेतील संचालक यांनी सामाजिक जाणिवेतून अनुसूचित जातीचा अनुशेष भरला आहे. हे पाहता जर खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांमध्ये सुध्दा अनुसूचित जातीच्या प्रवर्गासाठी केंद्र सरकारमार्फत जो नवीन आरक्षण कायदा येत आहे, त्याची सुध्दा चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी केली जाईल असे समितीला वाटते. या संदर्भात राज्य शासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस 3 महिन्यात पाठविण्यात यावा.

त्याच बरोबर विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मिळणारे गणवेश, त्यांना मिळणारी स्टेशनरी, उपस्थिती भत्ता योग्य प्रकारे मिळतो की, नाही याची तपासणी सदर समितीने करावी. सदर समितीने या सर्व बाबींबाबत दर तीन महिन्याने आढावा घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस 3 महिन्यात कळविण्यात यावा. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

महोदय, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेषाबाबत माहिती घेत असताना, काही ठिकाणी असे सांगितले गेले की, आम्हाला मागासवर्गीयांची भरती करण्याचे आदेश नाहीत. सामान्य प्रशासन विभागाने अशा प्रकारचे आदेश दिले आहेत की, मागासवर्गीयांच्या अनुशेष भरतीवर कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नाही. परंतु अनेक ठिकाणावरुन, आम्हाला दूरध्वनीद्वारे सांगितले जाते की, आम्ही भरती करु शकत नाही. त्यामुळे भरती प्रक्रियेसंदर्भात सुध्दा समितीने गंभीर दखल घेतली आहे आणि या समितीने हा अहवाल तयार करुन शासनाला सादर केला आहे.

असे असले तरी अहवालातील शिफारशी काटेकोरपणे अंमलात आणण्याची काळजी शासनाने घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो व माझे दोन शब्द पुरे करतो.

सभापती : अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

डॉ. वसंत पवार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आश्वासन समितीचा 143 वा अहवाल सभागृहास सादर करतो.

या अहवालामध्ये एकूण चार परिशिष्टे दिली आहेत. सन 2000 च्या दुसऱ्या अधिवेशन शासनातर्फे आश्वासन क्र.80, 81, 82, व 83 वर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्राच्या तसेच महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम 1962 यात आणखी सुधारणा करण्यासाठी सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक-79 महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) विधेयक, 2005 या विधेयकावर झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची समितीने केलेल्या छाननीमधील अभिप्रायही या अहवालामध्ये नमूद केलेले आहे. परिच्छेद क्र.4 मध्ये शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काहींच्या पूर्तीसाठी संबंधित विभागाने काढलेले शासन आदेश, शासन निर्णय, परिपत्रके आणि परिशिष्ट पाचमध्ये प्रलंबित आश्वासनांची अधिवेशने व विभागनिहाय यादी समाविष्ट करण्यात आली आहे.

सभापती : आश्वासन समितीचा 143 वा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित करण्याबाबत माननीय सभापतींची घोषणा</u>

सभापती : मी घोषणा करीत आहे. या अधिवेशनाच्या दिनांक 24 एप्रिल, 2006 ते दिनांक 28 एप्रिल, 2006 या कालावधीसाठी मी जे तारांकित प्रश्न स्वीकृत केले होते ते प्रश्न महाराष्ट्र विधानपरिषद नियम 20 प्रमाणे व्यपगत न करता सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार सदर याद्या सभागृहाच्या पटलावर अतारांकित म्हणून ठेवण्यात आल्याचे मी घोषित करीत आहे.

सोमवार, दिनांक 24 एप्रिल, 2006 रोजीची यादी मुद्रीत स्वरुपात प्राप्त झाली असल्याने सदर यादीच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आजच टपालखणाद्वारे वितरित करण्यात येत आहेत. उर्वरित दिनांक 25 एप्रिल, 2006 ते दिनांक 28 एप्रिल, 2006 रोजीच्या याद्यांत समाविष्ट असलेल्या प्रश्नांची उत्तरे शासनाकडून त्वरित मागवून मुद्रीत याद्या यथावकाश सन्माननीय सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात येतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप

सभापती : सन्माननीय सदस्यांना याची कल्पना आहे की, या सभागृहाचे सहा सन्माननीय सदस्य अनुक्रमे येत्या 21 जून, 2006 पूर्वी निवृत्त होणार आहेत. नेहमीच्या प्रथेप्रमाणे निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना भावपूर्ण निरोप देण्याच्या दृष्टीने आज विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम व त्यानंतर विधानपरिषद सभागृहाच्या बाह्य लॉबीत चहापानाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सबब, खालील सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासंबंधीची बाब आता घेण्यात येत आहे.

1) श्री. अनंत तरे, वि.प.स.
2) श्री. जगदीश गुप्ता, वि.प.स.
3) श्री. रामदास तडस, वि.प.स.
4) डॉ. वसंत पवार, वि.प.स.
5) श्री. दिलीपराव देशमुख, वि.प.स.
6) श्री. सुरेशदादा देशमुख, वि.प.स.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याची सभागृहाची प्रथा आहे. श्री. अनंत तरे, वि.प.स., श्री. जगदीश गुप्ता, वि.प.स., श्री. रामदास तडस, वि.प.स., डॉ. वसंत पवार, वि.प.स., श्री. दिलीपराव देशमुख, वि.प.स., श्री. सुरेशदादा देशमुख, वि.प.स. हे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. या सहाही सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये स्वत:च्या परिसरातील तसेच अखिल राज्यातील विविध प्रश्न, समस्या अतिशय तळमळीने, पोटतिडकीने मांडले व धसास लावले. त्याबद्दल मी सभागृहातर्फे त्यांचे धन्यवाद मानतो. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे साहेबांनी देखील आपल्या परिसरातील विशेषत: कोकणातील अनेक प्रश्न मांडले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी शिक्षण क्षेत्राविषयीही अनेक प्रश्न मांडले आहेत. विविध प्रश्नांवर चर्चा करुन प्रश्न सोडविणे हा त्यांचा स्वभावच आहे. त्याचप्रमाणे त्यांनी पत्रव्यवहार करुन संबंधित मंत्र्यांकडून वारंवार प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

त्यानंतर विदर्भातील विदर्भ केसरी म्हणून कुस्तीचे फड ज्यांनी प्रचंड मोठया प्रमाणात उभे केले, त्यांनी स्वत:च्या मुलीचा विवाह झाल्यानंतर सुध्दा तिला कुस्ती खेळण्यास प्रोत्साहन दिले. त्यांची मुलगी दिसायला साधारणत: मडीयम पर्सनॅलिटीची असून कुस्ती खेळतांना ती अतिशय चपळाईने खेळते व निश्चितच कुस्ती जिंकल्याशिवाय राहत नाही. सन्माननीय सदस्य श्री. रामदास तडस साहेबांना सुध्दा मी धन्यवाद देईल की, त्यांच्या कार्याचा आवाका प्रचंड मोठा आहे. क्रीडा विभाग माझ्याकडे आहे, त्यात अतिशय उपेक्षित, दुर्लक्षित पण आयुष्यभर त्या खेळासाठी वाहून घेतलेले अनेक मल्ल, कुस्तिगीर या महाराष्ट्रामध्ये आहेत, त्यांना प्रोत्साहन व प्रेरणा देऊन आकर्षक फड उभे करण्याचे काम आपण केलेले आहे. सभागृह निश्चितच आपणाला धन्यवाद देईल. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार हे अत्यंत उच्च विद्याविभूषित आहेत, प्रचंड मोठी शिक्षण संस्था हाताळतांना अतिशय शिस्तबध्द पध्दतीने त्यांनी महाराष्ट्राला शैक्षणिक गती दिलेली आहे. त्यांच्याही प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव देशमुख साहेब, अतिशय कर्तव्य कठोर आणि संघटनात्मक काम करतात, शिस्तबध्द पध्दतीने काम करुन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केलेले आहे. विशेषत: परवाच्या दिवशी मी लातूर येथे गेलो होतो. जसे सन्मानीय सदस्य श्री. रामदास तडस कुस्तीच्या स्पर्धेचे आयोजन करतात, त्याच प्रमाणे या वर्षी नॅशनल कुस्तीचे लातूर येथे सुंदर आयोजन केले होते. अशा प्रकारे समाजातील विविध कला गुणांना वाव देणे आणि त्यांच्यातील मेरीट, टॅलेन्ट, प्रतिभा शोधणे व त्यांना प्रभावित करणे हे लोकप्रतिनिधींचे काम असते. त्यानंतर सन्मानीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख, तब्येती नुसार ते दादा वाटतात, माननीय सभापती महोदयांना मी नम्रपणे सांगेन की, सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये त्यांचा प्रचंड मोठा वाटा आहे. कुस्ती, कबड्डी आणि त्याही पेक्षा त्यांचे वैशिष्ठ म्हणजे त्यांनी राज्यस्तरीय लावण्यांचे सुंदर-सुंदर कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. हे परभणीचे वैशिष्ठ आहे. लावणीसारखे सुंदर कार्यक्रम आयोजित करणे हे देशमुखांचे वैशिष्ठ आहे, जो कला प्रकार संपूर्ण राज्याने अंतर्मनाने स्वीकारलेला आहे, तो राज्याने का स्वीकारु नये. त्यांना राजमान्यता का मिळू नये, त्याला राजाश्रय का मिळू नये.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

गेल्या 15 दिवसापूर्वी राज्यस्तरीय लावणीचा कार्यक्रम सादर झाला, त्याच्या उद्घाटनला व दुसऱ्या दिवशी आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील त्या ठिकाणी होते. त्यांनी हे मान्य केले की, या राज्यातील अनेक मान्यवर नेते आहेत, ते मला अनेक चांगल्या कार्यक्रमाला घेऊन जातात, परंतु लावणी सारख्या कार्यक्रमाला घेऊन जात नाहीत. ही खंत त्यांनी व्यक्त केली. परंतु त्याच वेळेस या राज्यातील सर्व उपेक्षित कलावंताना एक मनोबल मिळेल, त्यांनाही सोशल स्टेटस् मिळेल, अशा प्रकारचा सन्मान बहाल करणारी एक राजकीय विचार सरणी पुढे आलेली आहे, म्हणून माननीय उपमुख्यमंत्री यांनी त्यांचे कौतुक केले. प्रशंशा केली, काल पुरूष वर्गाने सादर केलेला सुंदर लावणीचा कार्यक्रम पार पडला, त्यामध्ये गायन, वादन, नृत्य विविध कला गुणांनाचा समावेश त्या ठिकाणी आढळला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादांना सुध्दा सांगले की, आयुष्यभर अशा प्रकारच्या कला गुणांची जोपासना करणे, हे तुमचे आमचे सर्वांचे कर्तव्य आहे. त्यांना विशेषत: गान प्रकारातला तराना हा गायन प्रकार जास्त आवडतो. म्हणून छोटा ख्याल, मोठा ख्याल, ठुमरी, टप्पा हे सर्व प्रकार आवडतात. म्हणून या सर्व सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देतांना त्यांचे आभार मानतांना मी पुन्हा माझी इच्छा व्यक्त करेन की, अनेक मान्यवर नेत्यांना राजकीय क्षेत्रामध्ये राहण्याची संधी प्राप्त व्हावी, अशाच प्रकारे त्यांना राजकीय व सामाजिक काम करण्याची संधी प्राप्त व्हावी, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या सहाही सदस्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

.....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, या सदनामध्ये ज्यांनी 6 वर्षे प्रतिनिधीत्व केले त्यामध्ये, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे, श्री. जगदीश गुप्ता, श्री. रामदासजी तडस, श्री. दिलीपराव देशमुख हे निवृत्त होत आहेत, त्याच बरोबर डॉ. वसंतराव पवार, आणि श्री. सुरेशदादा देशमुख हे साधारणत: वर्षभराच्या कालावधीतच त्यांचे टेन्युवर संपल्यामुळे ते निवृत्त होत आहेत. कार्यकर्त्याला येथपर्यंत येण्यासाठी अनेक टक्के, टोणपे खावे लागतात. या सदनाचे हे वैशिष्ठ आहे की, हे सगळे सदन कधी बरखास्त होत नाही. पण विधानसभा एकाच वेळी निवृत्त होत असते, या सदनाचे सदस्य भाग्यवान आहेत की, त्यांना निरोप समारंभ होतो, खालच्या सभागृहाचे सदस्य कधी घरी जातात याचा पत्ताही लागत नाही. त्यामुळे समाजाच्यावतीने कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी त्या सदस्याच्या प्रती मिळतच नाही.

यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय व सार्वजनिक कामाबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. या सर्व माननीय सदस्यांचे वय बघितल्यानंतर ते पुन्हा या सभागृहामध्ये येऊ शकतील. तसे बघायला गेले तर आपल्या देशातील लोकशाहीची काही वैशिष्टये आहेत. राजकारणामध्ये माणूस कितीही वयाचा झाला तरी तो निवृत्त होत नाही. जस जसे त्याचे वय होते, तस तसा राजकारणामध्ये तो फुलायला लागतो. तरीसुध्दा सर्वांचे वय आणि कर्तृत्व बघितल्यानंतर या सदनामध्ये पुन्हा त्यांनी आपल्या अनुभवासह यावे अशाप्रकारची शुभेच्छा या निमित्ताने त्यांना देतो. सभापती महोदय, प्रत्येकांची स्वभाव वैशिष्टये आपल्याला सांगता येतील. ती सांगत बसण्यापेक्षा काही बाबतीमध्ये मत व्यक्त करणे याठिकाणी योग्य होईल. राजकारणाच्या धकाधकीमध्ये समाजातील तज्ज्ञ, विविध क्षेत्रात काम करणारे लोक याठिकाणी यायला मागत नाहीत. म्हणून घटनाकारांनी राज्यसभा आणि विधानपरिषदेची रचना केली. घटनेमध्ये या दोन्ही संस्थांना स्थान दिले गेले आहे. देशातील काही राज्यांनी डायरेक्ट लोकशाही असली पाहिजे म्हणून अप्रत्यक्षपणे निवडून आलेले सभागृह कां असावे? अशाप्रकारची टोकाची भूमिका घेतली. आणि या सदनाची आवश्यकता नाही म्हणून ज्या राज्यांनी विधानपरिषद बरखास्त केली त्यांना आता विधानपरिषदेचे महत्व लक्षात यायला लागले आहे. आपल्या देशाची घटना बनवितांना घटनाकारांनी पुढे खोलवर जाऊन बारकाईने विचार केला होता त्याची प्रचिती ज्यांनी विधानपरिषद बरखास्त केली त्या राज्यांना आली आहे.माझ्यासह सर्व मंत्र्यांचा अनुभव आहे की, विधानपरिषदेमध्ये प्रश्न असला की, डिटेलमध्ये जाऊन ब्रिफींग करुन घ्यावे लागते. या सदनातील माननीय सदस्यांची संख्या थोडीशी कमी असल्यामुळे आणि विधानसभेतील माननीय सदस्यांना जितकी राजकीय कामे आहेत त्या तुलनेत राजकीय ऑब्लिगेशन या सदनातील माननीय सदस्यांना कमी असल्यामुळे खऱ्या अर्थाने वैधानिक कामकाजाला या सदनामध्ये निश्चितपणे न्याय दिला जातो. या सदनाची रचना करीत असतांना जे लोक राजकारणाच्या धकाधकीत येऊ इच्छित नाहीत अशा तज्ज्ञ लोकांचा लोकशाहीला, राज्याला फायदा व्हावा म्हणून या सदनाची निर्मिती केली गेली आहे. काही दिवसापूर्वी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचा मी अध्यक्ष होतो. पक्षाच्या अध्यक्षाला अनेक वेळा आश्वासने द्यावी लागतात. निवडणुकीचे तिकिट मागणाऱ्या एका कार्यकर्त्याला मला आपल्याला विधानसभेचे तिकिट देणे शक्य होणार नाही.परंतु विधानपरिषदेवर घेण्याबाबत विचार करता येईल असे आश्वासन दिल्यानंतर त्याने मला विधानपरिषद अजिबात नको, ते मला जमणार नाही असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

सांगितले. त्याला मी सांगितले की, त्या ठिकाणी देखील आमदारांना लोकल फंड मिळतो, वैधानिक कामकाज करता येते. सभापती महोदय, त्यांनी जी भावना व्यक्त केली ती आपणा सर्वांना विचार करावयास लावणारी आहे. त्यानी मला सांगितले की, विधानसभेची निवडणूक लढविणे परवडेल. कारण माझी आर्थिक कुवत नसल्यामुळे विधानपरिषदेची निवडणूक लढविणे मला परवडणार नाही. सभापती महोदय, समाजातील तज्ज्ञ, विद्वानांच्या ज्ञानाची माहिती या सदनाला व्हावी, त्यांनी या सदनामध्ये वैधानिक काम करावे म्हणून या सभागृहाची रचना केली जात असली तरी दिवसें दिवस विधानसभेपेक्षा विधानपरिषदेची निवडणूक महागडी होणार असेल तर हा दोष देश स्तरावर राहिला आहे. म्हणून राज्यसभेचा प्रतिनिधी निवडतांना अलिकडे आमूलाग्र बदल करण्यात आला असून आता लोकप्रतिनिधींना ओपनली मतदान करावे लागते. मागील टर्ममधील काही आमदार खाजगीत बोलायचे की, एक राष्ट्रपतीची निवडणूक सोडली तर सर्व निवडणुका महागडया झाल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकीमधील घोडेंबाजार आपल्याला थांबवावयाचा असेल तर त्यादृष्टीने आपल्याला विचार करावा लागणार आहे. आज ज्याप्रमाणे विधानसभेमधून राज्यसभेमध्ये लोकप्रतिनिधी निवडून देण्यात आले त्याप्रमाणे विधानसभेमधून आणि स्थानिक स्वराज्य संस्थामधून देखील विधानपरिषदेमध्ये आमदार निवडून पाठवितांना त्याच पध्दतीचा अवलंब करण्याकरिता नियमामध्ये तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. त्या संदर्भातील प्रस्ताव कसा आणावयाचा याबाबत आपण पुढाकार घ्यावा.परंतु तशाप्रकारचा प्रस्ताव आपण करु शकलो तर अनेक चांगली माणसे या सदनामध्ये सदस्य म्हणून येऊ शकतील.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु....

संसदीय पध्दती मजबूत □र□याच्यादृष्टी□ सुध्दा या □ष्टीचा उपयो□ होऊ श□ल. □□विवादप□ या सभा□ह्याचे महत्व आतापर्य□त सिध्द झालेले आहे. या सद□चे स□मा□□य सदस्य अभ्यासपू□ प्रश□ विचारत असल्यामुळे समाजातील विविध सेक्टर□ □याय मिळत असतो. सहा वर्षे □म □ल्या□र सदस्य □□वृत्त होत असतात. त्यांच्या □□वृत्तीला शुभेच्छा देत असता□, त्यांच्याबद्दलची □तज्ञता व्यक्त □रत असता□, त्यां□ सद□मध्ये पु□ा यावे, यासाठी म□पासू□ त्यां□ शुभेच्छा देतो. स□मा□□य सदस्य डॉ.वसंतराव पवार साहेब आ□ श्री.सुरेश देशमु□ साहेब यां□ पू□ □लावधी मिळालेला □ही, त्यां□ पार्ट टे□यूअर मिळालेला आहे. त्या□र सन्माननीय सदस्य श्री.दिलीप देशमु□ हे □□वृत्त होत आहेत. या स□मा□□य सदस्यां□ पु□ा सभा□ह्यात यावे म्ह□ू□ मी त्यांना म□पासू□ शुभेच्छा देतो.

स□मा□□य सदस्य सर्वश्री अ□म तरे आ□ ज□दीश □ुप्ता,रामदास तडस, डॉ.वसंत पवार, श्री.सुरेश देशमु□ यां□ संसदीय □म□जामध्ये हिरीरी□ भा□ घेऊ□ □म □लेले आहे. देशातील इतर राज्यातील विधा□सभा आ□ विधा□ परिषदांची तुल□ □ली तर महाराष्ट्रातील विधा□सभा आ□ विधा□परिषदेचे □म□ज □□श्चितच स□ळ्यांचे ल□ वेधू श□ल, इत□ चां□ले आहे. त्यामध्ये या स□मा□□य सदस्यां□ भर टा□ याचे □म □लेले आहे, त्याबद्दल त्यां□ पु□ा ए□दा ध□यवाद देतो. त्यांच्या राज□य जीव□ला शुभेच्छा देत असता□च, त्यांच्या □टुंबि□ व व्यक्ति□म जीव□ सुखाचे जावे अशी शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, सभागृहातील निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्याच्या संदर्भातील चर्चा या ठिकाणी सुरु आहे. सन्माननीय मंत्री श्री.पुरकर साहेबांनी आणि सभागृहाचे नेते, उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी निवृत्त होणाऱ्या सदस्यांबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या, त्या भावनेशी निश्चितपणे मी सहमत आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे, जगदीश गुप्ता, रामदास तडस, वसंतराव पवार, दिलीप देशमुख, सुरेशदादा देशमुख हे सहा सन्माननीय सदस्य ऑगस्टमध्ये निवृत्त होत आहेत आणि बाकीचे काही सदस्य 21 जूनला निवृत्त होत आहेत. या सभागृहाची चांगली परंपरा आहे. सहा वर्षे एकत्र काम करत असताना, ज्यावेळेस मुदत संपते, त्यावेळेला सभागृहाच्या वतीने त्यांना निरोप दिला जातो. ही परंपरा विधानसभेमध्ये नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिली, त्या घटनेमध्ये विधानपरिषदची तरतूद केलेली आहे. विधान परिषदा सर्व राज्यामध्ये नाहीत. थोडया राज्यामध्ये विधानपरिषदा आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये विधानपरिषदेची रचना करत असताना सर्वच क्षेत्रातील माणसे या ठिकाणी आली पाहिजेत.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

या ठिकाणी शिक्षकांसाठी प्रतिनिधित्व दिले गेले, पदवीधरांसाठी प्रतिनिधित्व दिले गेले. विधानसभेच्या सदस्यांव्दारे विधान परिषदेवर निवडून जाण्यासाठी प्रतिनिधित्व दिले गेले. माननीय राज्यपालांव्दारे होणाऱ्या नामनियुक्तीच्या माध्यमातून समाजातील जे चांगले लोक असतील, विचारवंत असतील त्यांना प्रतिनिधित्व दिले गेले आणि अशा पध्दतीने विधान परिषदेची रचना केली गेली. हे करीत असताना यासंदर्भातील जे मतदारसंघ पाडलेले आहेत त्यामध्ये जिल्हा परिषद सदस्यांना आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी आपला प्रतिनिधी पाठविण्याची संधी आहे. नगरपरिषदेच्या सदस्यांना आपला प्रतिनिधी पाठविण्याची संधी आहे. आताच माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे या पध्दतीच्या निवडणुकीचे स्वरुप दिवसेंदिवस बदलत आहे. राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडणुकीच्या संदर्भात आता जशी हात वर करुन मतदान करण्याची पध्दत आणली आहे, त्यासंदर्भात सभागृहाच्या नेत्यांनी जी अपेक्षा व्यक्त केली त्याच्याशी मी शंभर टक्के सहमत आहे. याचे कारण असे की, समाजातील जी चांगली माणसे जनमताच्या माध्यमातून या ठिकाणी निवडून येऊ शकत नाहीत, जी माणसे कोणत्याही राजकीय पक्षाच्या संघटनेचे काम करीत नाहीत परंतु जी चांगली माणसे आहेत ती माणसे या सभागृहामध्ये निवडून यावयास पाहिजे असतील तर त्यासाठी या मतदारसंघांची रचना केलेली आहे. परंतु काळ बदलत चालला आहे. विशेषत: विधान परिषदेमध्ये यावयाचे असेल तर त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत चाललेला आहे. या ठिकाणी अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली की, आम्हाला विधान परिषदेवर जावयाचे नाही. सभागृहाच्या नेत्यांना मी सांगू इच्छितो की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघामध्ये सुध्दा हेच चित्र आहे. आपण एका राजकीय पक्षामध्ये काम करीत आहात तसेच मी सुध्दा एका राजकीय पक्षाचे काम करीत आहे. समाजातील चांगल्या लोकांना उमेदवारी देण्याचा प्रयत्न केला तरी चांगली माणसे यासाठी "नाही" म्हणतात. कारण निवडणुकीचा खर्च प्रचंड वाढत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून या सदनामध्ये निवडून यावयाचे असेल तर दोन दोन कोटी रुपये खर्च करावे लागतात आणि त्यानंतरच ते सदस्य म्हणून या ठिकाणी निवडून येऊ शकतात. पक्षाने जर मदत केली नाही तर या ठिकाणी धनदांडगे लोक, लखोपती लोक, करोडपती लोक या निवडणुकीचे तिकीट मिळवण्याचा प्रयत्न करतात आणि या सभागृहामध्ये येण्याचा प्रयत्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करतात. खरोखरच योग्य माणसांना या सभागृहाचे प्रतिनिधित्व मिळावयाचे असेल तर आता राज्यसभेच्या निवडणुकीच्या संदर्भात जी पध्दत सुरु झालेली आहे ती पध्दत या ठिकाणी आणण्याची गरज आहे. सभागृहाच्या नेत्यांनी जे सुचविले आहे त्याला मी सहमती दर्शविलेली आहे. या ठिकाणी खरोखच चांगली माणसे यावयाची असतील, विधान परिषदेमध्ये त्यांना यावेसे वाटत असेल तर घोडेबाजार बंद केला तर निश्चितपणे चांगली माणसे या सभागृहामध्ये येऊ शकतील.

सभापती महोदय, या ठिकाणी आमच्यासोबत बसणारे सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे साहेब हे 31 मे, 2006 रोजी निवृत्त होत आहेत. खरे म्हणजे या सभागृहाला अतिशय अभिमान वाटावा असे त्यांचे कर्तृत्व आणि नेतृत्व आहे. त्यांनी या ठिकाणी परत यावे अशी मी त्यांना शुभेच्छा देतो. त्यांची या ठिकाणी आवश्यकता आहे. एका बँकेच्या अधिकारी पदापासून आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात करुन विविध क्षेत्रामध्ये काम करीत करीत इथपर्यंत पोहोचलेले सर्वसामान्यातील नेतृत्व त्यांच्या माध्यमातून या ठिकाणी आलेले आहे. मी गेली चार वर्षे पाहात आहे की, श्री. तरे साहेब या ठिकाणी कोळी समाजाचे प्रश्न असतील, मच्छिमारांचे प्रश्न असतील किंवा सर्वसामान्य लोकांचे प्रश्न असतील ते प्रश्न अतिशय तळमळीने या ठिकाणी मांडत असतात आणि ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. हसतमुखपणे, खेळीमेळीने, माननीय मंत्रिमहोदयांशी चांगले संबंधि प्रस्थापित करुन आपल्या प्रश्नाची तड लावण्याचा प्रयत्न करतात. सभापती महोदय, ते आपल्याला सुध्दा भेटण्याचा प्रयत्न करतात. मी सतत पाहतो की, दिवसातून एकदा तरी ते आपल्या कार्यालयामध्ये येऊन आपली भेट घेत असतात. त्यांनी आपली भेट घेण्याचे एकच कारण असते आणि ते म्हणजे माझा प्रश्न लागला पाहिजे. या पध्दतीने काम करीत असताना ते नुसते विधान परिषदेचेच काम करतात असे नाही तर समाजाच्या विविध क्षेत्रामध्येही ते काम करतात. आर्थिक क्षेत्रामध्येही ते काम करीत आहेत. क्रेडीट सोसायटीच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला लाभ मिळाला पाहिजे, सर्वसामान्य माणसाला मदत मिळाली पाहिजे यादृष्टीने त्यांनी कोळीवाडा नागरी सहकारी पतसंस्था निर्माण केली. राजकारणात काम करीत असताना मी अनेक लोकांना बघतो की, ते सर्वच क्षेत्रात काम करु शकत नाहीत. परंतु सन्माननीय सदस्य श्री. तरे यांचे व्यक्तिमत्व असे आहे की, ते आर्थिक क्षेत्रात काम करतात, सामाजिक क्षेत्रात काम करतात.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

कोळी बांधवांची संघटना बांधण्याचे देखील त्यांनी काम केले, धार्मिक क्षेत्रातही ते काम करतात. या सभागृहामध्ये टिळा लावून येणारे ते एकमेव सदस्य आहेत. कार्ल्याच्या प्रसिध्द अशा एकविरा संस्थानाचे ते अध्यक्ष असून अतिशय चांगल्या प्रकारे ते संस्थान चालवित आहेत. या विधापरिषदेमध्ये काम करीत असताना आर्थिक क्षेत्रातील संस्थेचे देखील ते चांगले काम करीत आहेत. क्रीडा क्षेत्रातही ते काम करीत आहेत. खो-खो संघटनेचे ते अध्यक्ष आहेत. अशा प्रकारे काम करणारे हे चतुरस्त्र व्यक्तिमत्व. ते एक दिलदार मित्र आहेत असे त्यांच्या बाबतीत म्हटले तर ते वावगे होणार नाही. ते 31 मे रोजी निवृत्त होत आहेत. त्यांनी पुनश्च या सभागृहामध्ये यावे. मी त्यांना शुभेच्छा देतो.

आमचे दुसरे मित्र सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता हे देखील निवृत्त होत आहेत. श्री.जगदीशभाऊ हे आमच्याच पक्षाचे आहेत. केवळ राजकारणामुळे त्यांचा आणि माझा संबंध आला असे नाही तर विद्यार्थी दशेपासून विद्यार्थी चळवळीमध्ये काम करायला लागल्या पासून त्यांचा आणि माझा संबंध आहे. गेली 20 वर्षे आम्ही दोघे एकाच पक्षामध्ये काम करीत आहोत. भारतीय जनता पक्षाचे काम करीत असताना विविध प्रकारचे सामाजिक आणि रचनात्मक असे काम श्री.जगदीशभाऊंनी अमरावती भागात केलेले आहे. ज्यावेळी त्यांनी सक्रीय राजकारणामध्ये भाग घेतला त्यावेळी भारतीय जनता पक्षाच्या दृष्टीने अमरावती जिल्हा हा उजाड होता. श्री.जगदीशभाऊंनी हा हा म्हणता अमरावती जिल्ह्यामध्ये पक्षाची बांधणी केली. त्यावेळी आमच्या पक्षाच्या संघटन मंत्र्यांनी असे सांगितले की, ज्या दिवशी श्री. जगदीश गुप्ता हे अमरावती मधून विधानसभेवर निवडून जातील त्या दिवशी राज्यामध्ये भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचे राज्य येईल. भारतीय जनता पक्षाचे पहिले आमदार म्हणून श्री. जगदीशभाऊ निवडून आले आणि खरोखरच महाराष्ट्रामध्ये युतीला सत्ता मिळाली. विधानसभेवर निवडून आल्यानंतर त्यांच्यावर महसूल खात्याच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर अमरावतीमध्ये आमच्या पक्षाची चांगली वाटचाल सुरु झाली. ज्या जिल्ह्यामध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये आमच्या पक्षाचा एकही सदस्य निवडून येणार नाही अशी परिस्थिती होती त्याठिकाणी श्री. जगदीशभाऊंनी केलेल्या कार्यामुळे चार-चार आमदार निवडून आले. एक हाडाचा सामाजिक कार्यकर्ता आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

कुशल प्रशासक अशा पध्दतीने त्यांनी काम केलेले आहे. ते विधानसभेवर दोन वेळा निवडून गेले आणि तिस-या वेळी त्यांची विधानपरिषदेवर नियुक्ती करण्यात आली. ते 31 मे रोजी निवृत्त होत आहेत. त्यांनी पुन्हा या सभागृहामध्ये यावे. मी त्यांना शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास तडस हे देखील निवृत्त होत आहेत. आपल्या या विधानपरिषदेमध्ये विविध व्यक्तिमत्त्वाची आणि विविध क्षेत्रामध्ये प्रावीण्य मिळविलेली माणसे येतात.. श्री. रामदास तडस हे देखील असेच एक व्यक्तिमत्त्व. त्यांनी कुस्ती क्षेत्रात प्रावीण्य मिळविलेले आहे. त्यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील देवळी या शहर-वजा गावात झाला. अशा ठिकाणी जन्माला येऊन देखील त्यांना कुस्तीची फार आवड आहे. मला सांगायला अभिमान वाटतो की, 1972, 1976 आणि 1982मध्ये त्यांनी कुस्तीसाठी दिला जाणारा "विदर्भ केसरी" हा किताब मिळविला. एक मल्ल हा सामाजिक क्षेत्रामध्ये प्रभावीपणे काम करु शकतो हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. त्यांनी नागपूर विद्यापीठाचा "कलर होल्डर" हा सन्मान देखील प्राप्त केला होता. तळागाळातील गोरगरीब माणसाच्या हितासाठी, कष्टकरी शेतक-यांसाठी त्यांनी तळमळीने काम केलेले आहे. शेतक-यांच्या विविध प्रश्नावर त्यांनी आंदोलनेही उभी केलेली आहेत. असे हे धाडसी व्यक्तिमत्त्व निवृत्त होत आहे. त्यांनी पुनश्च या सभागृहामध्ये यावे, मी त्यांना शुभेच्छा देतो.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, डॉ. वसंतराव पवार हे एक चांगले विद्याविभूषित असे व्यक्तिमत्व आहे. ते नाशिक जिल्हयातील आहे.डॉ. पवार साहेब आणि माझी व्यक्तीगत मैत्री ही 1991 पासून झाली. लोकसभेमध्ये आम्हांला 5 वर्षे एकत्र काम करण्याची संधी मिळाली. एक चांगले व्यक्तीमत्व आणि आपल्या क्षेत्रामध्ये चांगले काम करणार डॉ. पवार साहेब आहेत. पेशाने ते डॉक्टर आहेत. या क्षेत्रात दिल्ली आर्युविज्ञान परिषद यांचा राष्ट्रीय स्तरावरील बी.सी.रॉय पुरस्कार त्यांना मिळाला आहे. अशा प्रकारचे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. शिक्षण क्षेत्रातही ते काम करीत आहेत. नाशिक मधील एका मोठया शिक्षण संस्थेमध्ये ते काम करतात. ग्रामीण भागामध्ये चांगल्या पध्दतीने शिक्षणाचा प्रसार ते करीत आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकीय क्षेत्राच्या माध्यमातून त्यांचा समाजासाठी चांगला उपयोग झालेला आहे. राष्ट्रीय कार्यामध्ये सहभाग घेत असताना त्यांनी जवळपास 27 हजार कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया मोफत केलेल्या आहेत. एवढे मोठे काम सहसा कोणी करीत नाही. आपले स्वत:चे काम करीत असताना तसेच डॉक्टरी पेशाचे काम करीत असताना आणि समाजामध्ये काम करीत असताना राष्ट्रीय कार्यक्रमांमध्येही त्यांनी फार मोठा सहभाग घेतलेला आहे. माननीय मंत्री श्री. भुजबळ साहेब यांनी याठिकाणी सांगितले की आम्ही त्यांना पुन्हा उमेदवारी देतो. मी माननीय श्री. भुजबळ साहेबांना सांगू इच्छितो की, तुमच्या पक्षामध्ये उमेदवारी मिळेल किंवा नाही हे शेवटपर्यंत ठरत नाही. याठिकाणी दोन देशमुख निवृत्त होत आहेत त्यापैकी एका देशमुखांना परत निवडून आणण्याची जबाबदारी तुमची आहे. जे देशमुख निवडून यावेत असे तुम्हांला वाटत असेल त्यांना शुभेच्छा दिल्या पाहिजेत. श्री. जगदीश गुप्ता यांना शुभेच्छा दिल्या पाहिजेत. डॉ.पवार हे एक चांगले व्यक्तीमत्व आहे ते आज सभागृहातून निवृत्त होत आहेत त्यांना मी सभागृहात परत येण्यासाठी शुभेच्छा देतो. मध्यंतरीच्या काळात ते लोकसभेत गेले होते. पुन्हा त्यांनी लोकसभेत यावे अशा मी शुभेच्छा देतो. येथे येऊ नये असा माझा उद्देश नाही. लोकसभेमध्ये ते गेले तर अधिक चांगले काम करु शकतात याचा अनुभव मी घेतलेला आहे.

सभापती महोदय, दुसरे एक माननीय सदस्य श्री. दिलीप देशमुख हे सुध्दा निवृत्त होत आहेत. त्यांचा आणि माझा जुना परिचय आहे. 1993 मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर ते पहिल्यांदा निवडून आले होते त्यावेळी मी सुध्दा राज्य सहकारी बँकेचा प्रतिनिधी म्हणून निवडून आलो होतो. तेव्हापासून श्री. देशमुख आणि माझी मैत्री आहे. लातूर जिल्हा सहकारी बँकचे अध्यक्ष

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

म्हणून त्यांनी काम केले आहे. मागील वेळेला ते निवडून आले त्यावेळी आम्ही त्यांच्या विरोधात उमेदवार उभा केला नव्हता. सहकारी क्षेत्रामध्येही त्यांनी चांगले कासम केले आहे. मांजरा सहकारी बँकेचे चेअरमन, जिल्हा बँक,इंदिरा सहकारी सूत गिरणी अशा विविध संस्थांवर त्यांनी काम केलेले आहे. या राज्याचे विविध खात्यांचे मंत्री म्हणून सुध्दा त्यांनी मागील काळात काम केले आहे. त्यांनाही मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, श्री. सुरेश देशमुख साहेब सुध्दा सदनातून निवृत्त होत आहेत. मराठवाडयाचे ते भूमिपुत्र आहेत. या सदनामध्ये आल्यानंतरच त्यांची आणि माझी ओळख झाली. गेली चार वर्षे ते सदनामध्ये काम करीत आहेत. श्री. देशमुख यांच्यामधील खास गुण म्हणजे ते ज्याप्रमाणे इतर कार्यक्रमांचे आयोजन करतात त्याचप्रमाणे लोककलेला प्रोत्साहन देण्याचे काम सुध्दा ते करतात. लावणी ही महाराष्ट्रातील फार मोठी लोककला आहे त्याला प्रोत्साहन देण्याच्या माध्यमातून ते लावणी महोत्सवाचे आयोजन करीत असतात. त्यांचा या कार्यक्रमामध्ये फार मोठा सहभाग असतो. परभणी जिल्हा बँक, परभणी कृषी उत्पन्न बाजार समिती,अर्बन बँक या संस्थावरही ते काम करतात. पक्षसंघटनेचे काम सुध्दा ते चांगल्या पध्दतीने करतात. पक्षसंघटनेमध्ये काम करीत असताना ते विविध जबाबदाऱ्या पार पाडीत आहेत. त्यांनाही मी शुभेच्छा देतो. गेली सहा वर्षे या सभागृहामध्ये विविध प्रश्नांवर या सदस्यांनी आपली मते व्यक्त केली.

नंतर भारवि

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सर्वसामान्य माणसांचे प्रश्न मांडलेले आहेत. सभागृहामध्ये कटुता निर्माण झाली तर ती दूर करण्याचे काम या सहा सन्माननीय सदस्यांनी केले आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देत असताना त्यांनी पुन्हा या सभागृहामध्ये कामकाज करण्यास यावे अशी विनंती करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

...

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सदनाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्यासंबंधी प्रस्ताव मांडून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. विधान परिषदेमध्ये एक चांगली गोष्ट आहे. येथे येणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे आणि निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले जाते, त्यांना शुभेच्छा दिल्या जातात. ही संधी विधान सभेतील सदस्यांना मिळत नाही. विधान सभेचे सदस्य लोकेच्छवरून निवडून येत असतात. विधान परिषदेतील बहुतांशी सदस्य हे पक्षांवर अवलंबून असतात. पक्षाने ठरविले तरच त्यांना संधी मिळते. अन्यथा त्यांना या सभागृहाचे दरवाजे बंद होतात. पक्ष विधान परिषदेवर पाठविताना पक्ष हा संबंधित सदस्यांचा कामाचा परफॉर्मन्स बघते. पक्षाला वाटले तरच त्यांना विधान परिषदेचा दरवाजा उघडतो. याचे कारण पक्षाने पाठिंबा दिला तरच सदस्याला निवडून येता येते. काही लोकांनी आयुष्यभर अनुभव घेतला आहे, म्हणून मी हे स्पष्टपणे बोलू शकतो. आज सन्माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे, जगदीश गुप्ता, रामदास तडस, डॉ.वसंत पवार, श्री.दिलीप देशमुख, श्री.सुरेशदादा देशमुख हे सहा जण निरनिराळया तारखेला निवृत्त होत आहेत. त्यांना शुभेच्छा देणे हे माझे प्रथम काम आहे. मी या शुभेच्छा त्यांना केवळ निवृत्त होत आहेत म्हणून देत नाही. मी या सर्वांचे कामकाज गेली चार वर्षे पाहिलेले आहे. त्यामुळेच माझी त्यांच्याशी जवळीक निर्माण झाली. त्यांची कामाबद्दलची कळकळ पाहण्याची संधी मला मिळालेली आहे. चांगले काम करणारे येथे परत यावेत असे मला वाटते. या सदनात कामकाजाची शोभा वाढविण्यासाठी, कामकाजाचा दर्जा वाढविण्यासाठी त्यांनी यावे असे मला वाटते. या सहा जणांमध्ये श्री.अनंत तरे हे लवकर निवृत्त होणार आहेत. सदा आनंदी असणारे व्यक्तिमत्त्व आहे. ते भूमिपूत्र आहेत. मुंबई-ठाण्यातील भूमिपूत्र आहेत. तेव्हा या भूमिपूत्राला पहिला मान दिला पाहिजे. कोळी बांधवसुध्दा भूमिपूत्र आहेत. मुंबई-ठाण्यातील भूमिपूत्र हे समुद्र किनारी, खाडी किनारी किंवा गावठाणामध्ये राहतात. अशा या गावठाण्यांची परिस्थती सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्यांपैकी श्री.तरे हे एक आहेत. श्री.तरे यांनी अनेक प्रकारची कामे केली आहेत. आमच्या शिवसेनेचे ते उपनेते आहेत. त्यांनी ठाण्याचे महापौर पद सलग तीन वेळा भूषविले आहे. त्यांनी विविध अंगी काम केले आहे. आज ते निवृत्त होत आहेत. त्यांचा निवृत्तीचा दिनांक 31 मे आहे. ते तीन जिल्हयांचे प्रतिनिधीत्त्व करतात. त्यांनी सगळया मतदार संघामध्ये चांगल्या प्रकारे काम केले आहे. त्यांना सतत आपल्या मतदार संघामध्ये संपर्क ठेवायला लागत असते. (यानंतर बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्व पक्षाच्या लोकांशी त्यांचा संपर्क आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. ते जर त्या परिसरात निवडणुकीला उभे राहिले तर अन्य लोक सुध्दा त्यांना मदत करतील अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकणी हे सुध्दा त्यांना मदत करतील असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे येथे आल्यामुळे त्यांच्याशी आपल्या सर्वांची जवळीक निर्माण झाली. विचाराची, कामाची आणि निरनिराळया कामाच्या वेळी मदत करीत असताना निर्माण झालेली जवळीक महत्वाची असते. यातून आपुलकीचे संबंध प्रस्थापीत होतात आणि त्यातूनच माणसे स्वेच्छेने मदत करतात. अशा प्रकारे या सदनातील मंडळी सन्माननीय अनंत तरे यांना मदत करतील अशी मला आशा आहे. त्यांना मी माझ्यातर्फे शुभेच्छा देतो. आमच्या पक्षातर्फे त्यांना पुन्हा जागा दिली जाईल अशी सदिच्छा व्यक्त करतो.

वास्तविक पाहता आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 57 वर्षे उलटून गेली आहेत. परंतु अजूनही अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. ते प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र काम करणारी माणसे आपल्याला हवी आहेत. मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. निरनिराळे प्रश्न सोडविण्यासाठी काम करणारे श्री.अनंत तरे हे एक आहेत. त्यांचा कार्य अहवाल मध्यंतरी माझ्याकडे आला होता. त्यावरुन असे दिसते की, सर्व कामांना त्यांनी स्पर्श केलेला आहे. खरे म्हणजे ते खो-खो संघटनेचे अध्यक्ष आहेत. परंतु आयुष्यात त्यांनी कोणाला "खो" घालण्याचा प्रयत्न केला नाही आणि हीच त्यांची जमेची बाजू आहे. यालाच खिलाडुवृत्ती म्हटली जाते. त्यामुळे आपण सर्वांनी अशा प्रकारची खिलाडुवृत्ती घेऊन पुढील प्रवास करावयास पाहिजे. असा प्रवास सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे करीत आहेत. ते दिनांक 31 मे, 2006 रोजी निवृत्त होणार आहेत. ते जरी निवृत्त होणार असले तरी, त्यानंतर पुन्हा त्यांनी सदनामध्ये यावे. पुन्हा एकदा पक्षाची, सदनाची आणि जनतेची सेवा करावी एवढी विनंती करुन, त्यांना उदंड यश लाभो अशा प्रकारची प्रार्थना माता भवानी कडे करतो.

यानंतर दुसरे निवृत्त होणारे सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता हे आहेत. ते विधानसभेतून यापूर्वी दोन वेळा निवडून आले आहेत. युती सरकारच्या काळात ते मंत्री होते. आता ते या सदनामध्ये आहेत. त्यांचा आणि माझा संबंध निरनिराळया माध्यमातून आला आहे. सतत काम करणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. हाती घेतलेल्या कामाला वाहून घेऊन, त्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

कामाला न्याय देण्याची वृत्ती त्यांची आहे. झुंजार अशी वृत्ती त्यांच्यामध्ये आहे. नेहमी ते सकारात्मकच विचार करतात. नकारात्मक विचार त्यांनी कधी केलाच नाही. अशा प्रकारे सर्व दृष्टीने योग्य असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. त्यांनी सहा वर्षे याठिकाणी काम केले आहे. निश्चितच त्यांना त्यांचा पक्ष पुन्हा एकदा उमेदवारी देईल अशी आशा करतो. त्यांनी विधानसभेवर निवडून यावयाचे की, विधानपरिषदेवर निवडून यावयाचे हे त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. काही व्यक्तींची जनतेतून निवडून येण्याची भावना असते. ते ज्या ठिकाणावरुन निवडणूक लढतील त्या ठिकाणावरुन निवडून यावेत अशी माता भवानीकडे प्रार्थना करुन, त्यांनी पुन्हा या ठिकाणी यावे अशा प्रकारची त्यांना सदिच्छा देतो.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास तडस हे निवृत्त होणारे सदस्य आहेत. त्यांच्याबद्दल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माहिती दिली आहे. वास्तविक पाहता ते पहिलवान आहेत. ते जरी पहिलवान असले तरी त्यांनी विधानमंडळाचा कधी आखाडा केला नाही. कारण या ठिकाणी अनेक मंडळी विधानमंडळाचा आखाडा बनवावयास पाहतात. सन्माननीय सदस्य श्री.रामदास तडास यांचा पेशा पहिलवानीचा असल्यामुळे, त्यानी अनेक कुस्त्या जिंकलेल्या आहेत. परंतु सदनामध्ये काम करीत असताना कोणाशी कुस्ती करावी अशा प्रकारचा विचारही त्यांनी कधी व्यक्त केला नाही.

नंतर श्री.कांबळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

हे या माणसाचे वैशिष्ट्य आहे आणि यालाच खिलाडू वृत्ती म्हणतात. जीवनामध्ये मग तो कुस्तीचा खेळ असो किंवा अन्य कोणताही खेळ असो, काही प्राप्त करुन घ्यावयाचे असेल तर त्यासाठी खिलाडू वृत्ती लागते. सभापती महोदय, जीवनात माणसाला जर कोण मदत करत असेल तर ती त्याची खिलाडू वृत्ती. एखादा निर्णय आपल्या मनाच्या विरुध्द गेला तर खिलाडू वृत्तीने सत्य स्वीकारुन परत आपल्या कामाला सुरुवात करणे ही खरी खिलाडू वृत्ती. सभापती महोदय, कधीही कोणाशी सूड बुध्दीने वागू नये. आज अपयश आले तर यशासाठी पुन्हा प्रयत्न करावेत आणि झुंजार व जिगीषु वृत्तीने ते यश पुन्हा मिळवावे. सन्माननीय सदस्यांना ही जिद्द भविष्य काळात झेप घेण्यास निश्चितच उपयोगी पडेल. आत्मविश्वास व महत्वकांक्षा यांचा सुंदर मिलाप होऊन माणसांचे व्यक्तिमत्व विकसित होत असते आणि ते विकसित झालेले व्यक्तिमत्व रामदासजी आपल्यामध्ये आहे. भविष्यकाळात आपल्या पक्षाने आपल्याला पुन्हा जागा द्यावी, आपल्या अनुभवाचा फायदा सर्वसामान्य जनतेला मिळावा, हीच मी माता भवानीच्या चरणी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, सहा निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार हे एक आहेत. सभापती महोदय, हे नाशिकचे व्यकित्मत्व आहे. माझा देखील अनेक वर्षे नाशिकशी संबंध आला. पक्षाची बांधणी करताना नाशिक जिल्ह्यामध्ये माझी खूप वर्षे गेली. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांची शैक्षणिक कारकिर्द नाशिकमध्येच गेली. शिक्षण क्षेत्रामध्ये नवीन दालने उघडून जनतेला त्याचा फायदा कसा होईल या संबंधीचा विचार करणारी व्यक्तिमत्वे मिळणे खूपच कठीण असतात. सभापती महोदय, माझी पूर्ण खात्री आहे की, या क्षेत्रामध्ये पुन्हा येण्याकरिता पक्षातर्फे त्यांना नक्कीच संधी दिली जाईल. यावेळी असलेली त्यांची संधी फार कमी कालावधीसाठी होती. पण भविष्य काळामध्ये मिळणारी संधी नक्कीच मोठी असेल. कदाचित भविष्यामध्ये खासदारकीचा विचार त्यांच्या मनामध्ये येऊ शकतो, त्यासाठीही मी त्यांना शुभेच्छा देईन. सभापती महोदय, ज्यांनी संसदेत खासदार म्हणून काम केले आहे, त्या माणसांना परत विधानसभेमध्ये येताना तेवढा आनंद होत नाही. कारण तेथील खासदारकीचा अनुभव खूप व्यापक असतो. सगळ्या देशाकडे पाहण्याचा माणसांचा दृष्टीकोनच तेथे बदलून जातो. महाराष्ट्राला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

जगामध्ये घेऊन जाण्याची संधी त्याला मिळते. सभापती महोदय, संपूर्ण देशातील 545 खासदार या सदनामध्ये असतात. एवढ्या मोठ्या सभागृहामध्ये आपले विचार मांडण्याची, लोकांना प्रभावित करण्याची संधी त्याला मिळते. त्यातून त्याची क्षमता त्याला कळते व त्याचे व्यक्तिमत्व जास्त विकसित होते आणि त्यामुळे याचा फायदा पक्षाला तसेच व्यक्तीला देखील होतो. शिक्षण क्षेत्रात जाऊन आपले व्यक्तिमत्व आणखी उंच होवो, त्याचप्रमाणे आपले व्यक्तिमत्व हिमालयासारखे होऊन त्याच्या छायेखाली अनेक लोकांचे कल्याण होवो, अशा मी या निमित्ताने आपणास शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, आता निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव देशमुख हे एक आहेत. ते अर्थराज्यमंत्री देखील होते. महाराष्ट्र राज्याचा आर्थिक कारभार कसा आहे, हे त्यांना माहिती आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे बंधु मुख्यमंत्री आहेत. परंतु माझे बंधु मुख्यमंत्री आहेत, या अभिमानाने ते कधीही राहिले नाहीत. सर्वसाधारण कार्यकर्त्याप्रमाणे ते या सदनामध्ये वावरले. कोणाशीही जवळीक साधण्याची त्यांची प्रवृत्ती खूप चांगली आहे. सभापती महोदय, लोकांना जवळ करणारी माणसेच राजकारणात यशस्वी होऊ शकतात. अर्थसंकल्प सादर करताना किंवा अन्य खात्यांमध्ये मंत्रीपद भुषविताना त्यांनी प्रथम आपल्या कामाला न्याय दिला.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

सभापती महोदय, जे मंत्री बनतात त्यांच्याकडून माझी अशी अपेक्षा आहे की, मंत्र्यांनी आपल्या कामाची जबाबदारी स्वत:वर घेतली पाहिजे, आता जे बदल्यांचे विधेयक आणले ते विधेयक आणण्याची तशी गरज नाही, जे कायदे आहेत, यासंदर्भात प्रशासनाला जे अधिकार आहेत, ते अधिकार व सगळे नियम हे अतिशय मजबूत असे आहेत, परंतु ॲडमिनिस्ट्रेशनचा वापर जर प्रभावीपणे केला तर चांगले काम होऊ शकते, अनेक निर्णय होऊ शकतात. आपल्या कार्यकक्षेत राहून निर्णय घेतले पाहिजेत. शासनाने आपआपल्या खात्यातील निर्णय भक्कमपणे घेणे आवश्यक आहे, मी आपणास दोन सचिवांच्या संदर्भातील मतभेद सांगतो. मंत्र्यांनी सांगितल्यानंतर सचिवांनी ते काम केले पाहिजे, सचिव त्याप्रमाणे निर्णय घेत नाहीत, त्यामध्ये काहीतरी अडचण दर्शवून कामे केली जात नाहीत. त्या संदर्भात काय होईल त्यांची जबाबदारी मी घेईन असे ठणकावून मंत्र्यांनी सांगितले पाहिजे, व सचिवांनी त्यांचे पालन केले पाहिजे. परंतु अशी माणसे जगामध्ये आता कमी राहिली आहेत. निर्णय घेऊन त्याच्या परिणामाचे काय होईल या दृष्टीकोनातून कार्य करणारी माणसे कमी होत चाललेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव देशमुख अर्थ राज्यमंत्री होते, त्यांनी चांगले काम केलेले आहे, काँग्रेस पक्षाने त्यांना या क्षेत्रामध्ये परत आणावे व या सदनामध्ये ते येतील अशी अपेक्षा आई भवानी चरणी व्यक्त करतो.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख हे परभणी जिल्हयातून विधान परिषदेवर आलेले आहेत, त्यांनी परभणी जिल्हयामध्ये अनेक कामे केलेली आहेत, मी पक्षाच्या माध्यमातून तेथे काम करीत असतांना खेडयापाडयामध्ये जाण्याची संधी मला मिळालेली आहे, त्यांनी खेडयापाडयातील अनेक समस्या जवळून पाहिलेल्या आहेत व त्या सोडविण्याचा निकराने प्रयत्न केलेला आहे. त्या परिसरामध्ये त्यांनी अनेक चांगली कामे केलेली आहेत. आपणास जर महाराष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर प्रत्येक जिल्हयामध्ये जाऊन तेथील जनतेचे काय प्रश्न आहेत यांचा अभ्यास केला पाहिजे, विकास करतांना त्या परिसरात काय अडचण आहे यांचा अभ्यास केल्याशिवाय आपण येथे प्रभावीपणे तो विषय मांडू शकत नाही. विविध जिल्हयामध्ये जाऊन

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

तेथील समस्या काय आहेत, हे लोकांमध्ये गेल्याशिवाय कळत नाहीत. आमचे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे महाराष्ट्रभर कामानिमित्त फिरत असतात, त्यांना ग्रामीण भागाची भरपूर माहिती आहे, ग्रामीण भागातील अनेक समस्यांची त्यांना जाण आहे, पश्चिम विदर्भामधील, अकोला, अमरावती या कोणत्याही जिल्हयाचा प्रश्न असे ते मोठया पोटतिडकीने मांडतात, कारण त्यांना तेथील समस्याची जाण आहे, त्याप्रमाणे मोठया प्रमाणात ते कार्य करीत आहेत, सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख हे सर्वांना मदत करण्याचा प्रयत्न करतात, एखादे काम असेल तर ते मोठया हिमतीने करतात, ते आमच्या पेक्षा तरुण आहेत, आणि तरुण असल्यामुळे ते उत्साही आहेत, तरुण माणसाने उत्साही असलेच पाहिजे, या दृष्टीकोनातून त्यांनी सदनामध्ये काम केलेले आहे. त्यांचा प्रत्येक कामात सहभाग होता. त्यांनी या सदनामध्ये परत यावे यासाठी त्यांचा पक्ष त्यांना नक्की सहकार्य करीन, हे सर्व सदस्य परत येथे आले तर आम्हांला सर्वांना जास्त आनंद वाटेल, यापुढे त्यांना अधिक कार्यक्षमतेने कामे करता येतील. यासाठी त्यांना उदंड असे यश लाभो अशी मी आई भवानीच्या चरणी प्रार्थना करतो, सर्व सदस्यांचे पुढील आयुष्य आनंदात जावे अशी आशा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

.....3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : आज या सदनामध्ये 6 सदस्य सेवा निवृत्त होत आहेत, 6 वर्षे या सदनामध्ये त्यांनी पूर्ण केलेले आहे. यातील दोन सदस्यांना 1 ते दीड वर्षाचा कालावधी कामकाज करण्यासाठी मिळालेला आहे. त्यांना निरोप देण्यासाठी सदनाचे व सभागृहाचे नेते माननीय श्री. आर.आर.पाटील, उपमुख्यमंत्री यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, यावेळी आपण सहा माननीय सदस्यांना निरोप देत आहोत. पुढील अधिवेशनामध्ये सुध्दा आणखी जवळ जवळ 12 माननीय सदस्यांना निरोप देणार आहोत. आणि त्यापुढील अधिवेशनामध्ये 17 माननीय सदस्य या सभागृहातून निवृत्त होणार आहेत. या सर्व माननीय सदस्यांना चार वर्षाचा अनुभव आहे. त्यामध्ये सर्वश्री जगदीश गुप्ता, अनंत तरे, रामदास तडस, दिलीप देशमुख या व्यतिरिक्त माननीय सदस्य सर्वश्री सुरेश देशमुख व वसंत पवार हे दोन नवीन माननीय सदस्य दीड वर्षे या सभागृहामध्ये आहेत. म्हणून मघाशी सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले की, नव्याने निवडून येणाऱ्या माननीय सदस्यांचे आपण स्वागत करतो. या सदनामध्ये आपल्याला ती एक संधी उपलब्ध होते.त्याचप्रमाणे त्या सदस्यांचा सहा वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम देखील आपण घेतो. माननीय सदस्य श्री. अनंत तरे हे कोकण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून निवडून आले. मागील वेळी ते माझ्या पक्षाच्या उमेदवाराला पराभूत करुन निवडून आले. परंतु एक हुन्नरी व्यक्तिमत्व म्हणून या सभागृहामध्ये आणि सभागृहाबाहेर सुध्दा त्यांच्या संदर्भातील माहिती माझ याकडे उपलब्ध आहे. माननीय सदस्य श्री. अनंत तरे हे राजकारणामध्ये आपली भूमिका स्पष्टपणे मांडतांना ती निश्चित स्वरुपाची असली पाहिजे. त्याचप्रमाणे राजकारणामध्ये प्रामाणिकपणा, एकनिष्ठपणा, कर्तव्यकठोरता असली पाहिजे. या गोष्टी त्यांनी सातत्याने पाळल्या आहेत आणि आजही ते पाळत आहेत, आणि यापुढे देखील ते पाळतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. परंतु एक मित्र म्हणून राजकारणामध्ये किंवा राजकीय पक्ष म्हणून कोणत्याही कामाच्या संदर्भात कधीही ते आडवे येत नाहीत. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय विरोधी पक्षनेते यांच्याबरोबर ते नेहमी चांगले संबंध ठेऊन आहेत. आणि आज पुन्हा ते कोकण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरणार आहेत. त्यांनी पुन्हा या सभागृहामध्ये यावे आणि चांगल्याप्रकारे काम करावे, यापूर्वी देखील त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांनी आपल्या पक्षाचे व सभागृहाचे काम प्रामाणिकपणे केले आहे त्याबद्दल मी व्यक्तिश: त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सदस्य असलेले व दोन टर्म म्हणजे 12 वर्षे या सदनाचे सदस्य राहिलेले असे माननीय सदस्य श्री. रामदास तडस हे देखील या सदनामधून आज निवृत्त होत आहेत. बहुजन समाजाचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी विदर्भामध्ये माझ्या पक्षाचे चांगल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारे काम केले आहे व करीत आहेत. त्यांना पुन्हा या सभागृहामध्ये आणण्याबाबत माझ्या पक्षाच्या वतीने अद्यापपर्यंत काहीही निर्णय झालेला नाही.परंतु आम्हा सर्वांची अपेक्षा आहे की, माननीय सदस्य श्री. रामदास तडस यांनी पुन्हा सभागृहामध्ये यावे. ज्यावेळी उमेदवारी निश्चित करण्याची वेळ येईल त्यावेळी मी आपल्याला खात्रीपूर्वक सांगतो की, मी आपल्या नावाची शिफारस जरुर करीन.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता हे अमरावती स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून आले व ते आज निवृत्त होत असल्यामुळे आपण त्यांना निरोप देत आहोत. त्याचप्रमाणे माननीय सदस्य सर्वश्री दिलीप देशमुख व श्री. सुरेश देशमुख हे कित्येक वर्षे आपले सहकारी आहेत. माननीय सदस्य श्री. सुरेश देशमुख यांनी परभणी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणून काम केले आहे. पक्षाचा एक चांगला कार्यकर्ता म्हणून देखील त्यांनी चांगले काम केले आहे. उमेदवारी देण्याची वेळ येईल त्यावेळी त्यांना पक्षाच्या वतीने उमेदवारी मिळवून देण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची अडचण न आणता त्यांना पूर्णपणे सहकार्य देण्याची भूमिका माझ्याकडून घेतली जाईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु...

मला वाटते, या वेळेस आम्हाला भूमिका घेण्याची वेळ आली तर विचार करता येईल. पुढील त्यांची सभागृहात यावे हीच सदिच्छा

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिलीप देशमुख हे आमचे जुने मित्र आहेत. त्यांनी युवक काँग्रेसमध्ये काम केलेले आहे. माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी सरपंच म्हणून काम केल्यानंतर ते उस्मानाबाद जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यावेळी त्यांची आणि दिलीपराव यांची राम-लक्ष्मणाची जोडी एकत्र काम करत होती. त्यांना दिलीपरावांनी चांगली साथ दिलेली आहे. त्यांची या ठिकाणी सदस्य म्हणून सहा वर्षे पूर्ण झालेली असल्याने त्यांना आपण निरोप देत आहोत. त्यांनी देखील पुढील सभागृहात यावे, अशी त्यांना शुभेच्छा देतो. त्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार हे आमचे सोलापूर जिल्ह्यात जवळचे सहकारी. पक्षाचे महत्वाचे नेते मानले जातात. लोकसभेमध्ये त्यांनी प्रतिनिधित्व केलेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील पहिले कार्यकर्ते म्हणून ते ओळखले जातात. निवृत्त होणाऱ्या सहाही सन्माननीय सदस्यांनी पुढील सभागृहात सदस्य म्हणून यावे, अशी मी शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या अधिक उपाययोजना.

मु.शी. : शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या अधिक उपाययोजना, या संबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये निवेदन करतो.

राज्यातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या हा एक ज्वलंत प्रश्न आहे. याबाबत सर्वसमावेशक उपाययाजना हिवाळी अधिवेशन नागपूर येथे जाहीर करण्यात आली होती. यामध्ये 16 उपाययोजनांचा समावेश असून, त्यासाठी रुपये 1075 कोटीचा खर्च अपेक्षित होता. यामध्ये राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून हेक्टरी रुपये एक हजार, दोन हेक्टर मर्यादेपर्यंत मदत देण्याचा समावेश होता. यासाठी शासनाने रु.200 कोटी उपलब्ध करून दिले असून, त्याचे वाटप पूर्णत्वास येत आहे. या सोबतच कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून भांडवल गुंतवणूक निधीसाठी 3 टक्के प्रमाणे कर्जात करण्यात आलेल्या रकमेची, 12 टक्के व्याजासह परतफेड करण्यासाठी रु. 750 कोटीचा निधी आवश्यक होता. यापैकी रु.350 कोटी चालू आर्थिक वर्षात मुक्त करण्यात आले असून, त्याचे वाटप पूर्ण होत आहे. उर्वरित रु.400 कोटी चालू आर्थिक वर्षात मुक्त करण्यात आले आहे. त्याचे वाटप प्रगतीपथावर आहे.

विदर्भातील 6 जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाची पुनर्बांधणी करताना त्या कर्जावरील व्याज शासन भरील असे जाहीर केले होते. यासाठी रुपये 61 कोटी ह्या आर्थिक वर्षात उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तथापि, यासाठी एकूण रुपये 240 कोटी लागणार असल्याने रु.179 कोटी निधी या आर्थिक वर्षात उपलब्ध करून देण्यात आला असून संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये भरणा चालू आहे. आत्महत्यांसंबंधी इतर सर्व उपाययोजनांचे शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले असून, त्याची अंमलबजावणी चालू आहे. या सर्व उपाययोजना दूरगामी परिणाम करणाऱ्या असल्यामुळे याचे दृश्य परिणाम नजिकच्या भविष्यात दिसतील, अशी अपेक्षा आहे.

या समस्येवर मात करण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजना, त्याची अंमलबजावणी व त्यामध्ये करावयाच्या सुधारणा यासाठी सर्व पक्षांच्या प्रतिनिधींसह विचारविनिमय करण्यात आला. यामध्ये झालेल्या चर्चेअंती, सदर समस्येवर मात करण्यासाठी व शासनाने केलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरु....

उपाययोजनांचा प्रभाव वाढविण्यासाठी वरील अतिरिक्त पाऊल उचलण्याचा शासन विचाराधीन आहे.

1) सर्व शेतकऱ्यांना 7 टक्के व्याज दराने 3 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्र शासनाने जाहीर केले आहे. सदर दर आणखी सुलभ व्हावेत, म्हणून राज्य शासनातर्फे सहकारी, राष्ट्रीयकृत व खासगी बँकांतर्फे होणाऱ्या पीक कर्जावर आवश्यक तेवढे वाढीव व्याज सवलत देऊन, 6 टक्के व्याज दराने पीक कर्ज पुरवठा येत्या खरीप हंगामापासून करण्याचा निर्णय घेतलेला आहे. 7 टक्के व्याजाचा दर आहे, त्यामध्ये आणखी 1 टक्के सवलत देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

2. सदर पीक कर्ज वेळेवर परतफेड केल्यास व्याज दारामध्ये आणखी 2 टक्क्याची सवलत देण्यात येईल.

म्हणजे प्रत्यक्षात त्यांना 4 टक्क्यानेच ते भरावे लागेल. हा निर्णय फक्त या सहा जिल्ह्यांसाठीच नसून पूर्ण राज्यासाठी लागू आहे.

3. सहकारी बँकांनी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिलेले पीक कर्ज थकले तरीही त्यावर दंड व्याजाची आकारणी करु नये, अशा सूचना सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना देण्यात येत आहेत.

हा एक अतिशय महत्वाचा निर्णय आहे.

4. किसान क्रेडिट कार्डाचे वाटप व त्यावर कर्ज वाटपाचे उद्दिष्ट तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात येतील. तसेच, अशा कर्जावर व्याजाची आकारणी करताना ती उचलीप्रमाणेच व परतफेडीच्या कालावधीपर्यंतच करण्यात यावी, अशा सूचना सर्व संबंधित बँकांना देण्यात येतील.

5. राज्यातील ज्या भागामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे, त्या भागातील शेतकऱ्यांच्या मन:स्थितीचा अभ्यास करुन त्यांचे प्रबोधन करण्यासाठी स्थानिक सेवाभावी मंडळ, भजनी मंडळ व प्रख्यात प्रबोधनकार संस्था यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.

गावागावामध्ये जाऊन त्या ठिकाणी वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

6. राज्यातील शेती ही पर्जन्याधारित असल्यामुळे यातून उत्पादन कमी येते मात्र उत्पादन खर्च जास्त होतो. तथापि, केंद्र शासनातर्फे संपूर्ण देशासाठी पीकनिहाय एकच हमी भाव निर्धारित केला जातो. नैसर्गिक अडचणींमुळे कमी उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यास हा भाव परवडत नाही. त्यामुळे देशाचे शेती उत्पादकतेवर आधारित झोन करण्यात यावेत व प्रत्येक झोनसाठी किमान आधारित किंमत असावी, अशी शिफारस Commission on agriculture cost and price यांच्याकडे करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ....

आपण पाहतो की, पंजाबसाठी गव्हाचा जो भाव असेल तोच भाव आपल्याकडे असतो. पंजाबमध्ये पाण्याची उपलब्धता आहे आणि निसर्गाची त्यांना साथ आहे तसेच उत्पादन अधिक आहे. महाराष्ट्रामध्ये उत्पादन कमी होते. कापसाच्या बाबतीत तसेच घडते. साखरेच्या बाबतीत लो रिकव्हरी, मिडियम रिकव्हरी आणि हाय रिकव्हरी असे झोन निर्माण केले आहेत. तसे झोन या देशामध्ये निर्माण करण्यात यावेत. त्याप्रमाणे पिकाची किंमत देता येईल. कापसाची किंमत पंजाबमध्ये 700 रुपये असेल तर महाराष्ट्रामध्ये 800 रुपये असली पाहिजे. दोन्ही राज्यांच्या किंमतीमध्ये किमान 100 रुपयांचा तरी फरक असावा. ही धोरणात्मक बाब असल्यामुळे तो निर्णय केंद्र सरकार घेऊ शकते. या राज्याच्या वतीने शिफारस करुन याचा आग्रह राज्य सरकारच्यावतीने धरण्यात येईल.

7. आत्महत्यांचे प्रमाण जास्त असलेल्या विदर्भातील ज्या जिल्ह्यांसाठी शासनाने पॅकेज जाहीर केलेले आहे त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या थकित वीज बिलासंबंधीचा सर्व्हे करण्यात येईल व त्यासंबंधी शासनाला काही सवलत देता येईल काय याचा विचार केला जाईल. असा निर्णय आजच्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप.

(चर्चा पुढे सुरु)

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांनी या सभागृहातील जे 6 सन्माननीय सदस्य 31 मे, 2006 रोजी आणि 21 जून , 2006 रोजी निवृत्त होत आहेत यांना सदिच्छापूर्ण निरोप देण्याचा आणि त्यांनी पुन्हा या ठिकाणी यावे यासंदर्भात शुभेच्छा देण्याचा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यासंदर्भात बोलण्यासाठी मी उभा आहे. या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांचे प्रसन्न असे व्यक्तिमत्व आहे. सर्वांशी मैत्रीपूर्ण व्यवहार हा त्यांचा एक मोठा गुण या चार वर्षाच्या काळामध्ये मला दिसून आला. एक बहुश्रूत असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. बी.एस्सी. ऑनर्स झालेला उच्चशिक्षित, तरुण, तडफदार, सामाजिक जाणीव असलेले आणि विशेषत: मागासवर्गीयांच्या प्रश्नांच्या संदर्भात रस्त्यावर असो किंवा या सदनामध्ये असो, अत्यंत पोटतिडिकीने आपली भूमिका मांडणारे असे त्यांचे नेतृत्व आहे. मागासवर्गीयांच्या कोणत्याही अधिकारांना नाकारणाऱ्या पक्षामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे कसे राहिले हे समजत नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...

पण त्यामध्ये राहून देखील -म्हणजे पाण्यात राहून मगरीशी वैर पत्करणे - मागासवर्गीयांसाठी काम करणारे असे हे व्यक्तिमत्व. मागासवर्गीयांच्या आणि विशेषत: कोळी समाजाच्या, आदिवासी समाजाच्या हक्कासाठी सातत्याने लढा देणारे असे हे आमचे मित्र. हे उद्यमशील असून सहकार क्षेत्रामध्ये त्याचा सहभाग आहे. कोळी समाजाचे, आदिवासी समाजाचे विविध प्रश्न ते सातत्याने सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. ते उत्कृष्ट खो-खो पटू आहेत. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनामध्ये खो-खो टीमचे कप्टन पदही त्यांनी भूषविलेले आहे. धार्मिक कार्यामध्येही त्यांचा सहभाग आहे. कार्ल्याच्या एकविरा देवी संस्थानाचे ते संचालक आहेत. साधुसंताप्रती त्यांची श्रध्दा आहे. पीडित जनतेला ते सातत्याने मदत करीत असतात. गुजराथच्या भूकंपाच्या वेळी आणि 26 जुलैला आलेल्या महाप्रलयाच्या वेळी त्यांनी मदतीचे अतिशय चांगले काम केलेले आहे. विद्यार्थी चळवळी पासून सामाजिक अधिष्ठान ठेवून राजकीय जीवनामध्ये काम करणारे हे व्यक्तिमत्व. त्यांनी तीन वेळा ठाणे महानगरपालिकेचे महापौर पद भूषविले. मराठी ही त्यांची मातृभाषा असूनही त्यांचे हिंदी, इंग्रजी, उर्दू आणि गुजराथी या भाषंवर देखील उत्तम प्रभुत्व आहे. असे हे आमचे मित्र दिनांक 31 मे रोजी निवृत्त होत आहेत. त्यांनी पुन्हा या सभागृहामध्ये यावे अशी कळकळीची अपेक्षा आहे.

निवृत्त होणारे दुसरे सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता, हे या सभागृहाचे अत्यंत मान्यवर असे सदस्य. सभागृहाच्या कामकाजात भाग घेत असताना त्यांनी सभागृहाची प्रतिष्ठा वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. अमरावती स्थानिक प्राधिकरी संस्था या मतदारसंघातून ते याठिकाणी निवडून आले. अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्थांमध्ये त्यांनी फार महत्वाचे काम केलेले आहे. त्यांनी देखील या सभागृहामध्ये पुन्हा यावे अशा मी त्यांना शुभेच्छा देतो.

आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. रामदास तडस हे देखील निवृत्त होत आहेत. श्री.रामदास तडस हे अत्यंत क्रीडाप्रेमी. कुस्ती हा त्यांचा आवडता खेळ. महाविद्यालयीन जीवनामध्ये नागपूर विद्यापीठाचे त्यांनी कुस्ती क्रीडाप्रकारात प्रतिनिधीत्व केले. नागपूर विद्यापीठाचा "कलर होल्डर" हा सन्मान देखील त्यांना प्राप्त झाला. इतकेच नाही तर कुस्तीचे अनेक फड त्यांनी जिंकले. "विदर्भ केसेरी" हा पुरस्कार त्यांना प्राप्त होऊन त्यांचा गौरव झाला. त्यांनी अनेक व्यायामशाळा आणि क्रीडा संस्था उभारल्या. कला, क्रीडा, नाट्य आदी क्षेत्रामध्ये तरुण युवक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

युवतींना वाव मिळावा म्हणून त्यांनी अनेक समारंभ घडवून आणले आणि त्या समारंभांना मी देखील उपस्थित होतो. मागासवर्गासाठी आणि विशेषत: तेली समाजासाठी त्यांनी अत्यंत तळमळीने काम केले. देहू रोड येथील सदुंबरे या श्री जगनाडे महाराजांच्या जन्मभूमीमध्ये त्यांनी तेली समाजाचा पहिला राज्यस्तरीय मेळावा आयोजित केला. त्यानंतर त्यांनी नारगापूर येथे राष्ट्रीयस्तरावर तेली समाजाचा मेळावा आयोजित केला आणि त्याला चांगले यश मिळाले. संपूर्ण देशामध्ये त्यांचा गौरव झ ाला. समाजातील तळागाळातील, कष्टकरी जनतेसाठी तळमळीने काम करणारे आमचे मित्र निवृत्त होत आहेत. त्यांनी पुनश्च येथे यावे. त्यांना निश्चितच संधी मिळेल. मी त्यांना शुभेच्छा देतो.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, डॉ. वसंतराव पवार आणि श्री. सुरेश देशमुख यांना थोडया वर्षांचा कालावधी या सदनामध्ये मिळाला. डॉ. पवार हे पेशाने डॉक्टर आहेत परंतु त्यांनी सामाजिक,शैक्षणिक,वैद्यकीय अशा विविध क्षेत्रामध्ये अत्यंत मौलिक असे काम केले आहे. किती क्षेत्रामध्ये माणसाने मास्टर व्हावे असे सांगावयाचे झाले तर डॉ.पवार यांचे नांव घ्यावे लागेल. इं..... डॉ. वसंतराव पवार यांचे कर्तृत्व पाहिल्यावर असे म्हणावेसे वाटते की, इं.... अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तीमत्व आहे. डॉ. पवार हे एका मोठया शैक्षणिक संस्थेमध्ये काम करीत आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रातील इंडियन मेडिकल कौन्सिलचा बी.सी.रॉय पुरस्कार त्यांना मिळाला आहे. नाशिक भूषण पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. शैक्षणिक,कृषी आणि वैद्यकीय क्षेत्रामध्ये त्यांनी अत्यंत महत्वाचे असे योगदान दिलेले आहे. त्यांनी सभागृहामध्ये परत यावे अशा प्रकारच्या शुभेच्छा मी त्यांना या निमित्ताने देतो.

सभापती महोदय, आमचे दुसरे एक मित्र श्री. दिलीप देशमुख हे देखील सदनातून निवृत्त होत आहेत. या राज्याचे ते माजी अर्थराज्यमंत्री आहेत. सहकार क्षेत्रामध्ये आणि सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. केवळ माननीय मुख्यमंत्र्यांचे बंधू म्हणून नाही तर त्यांनी विविध क्षेत्रामध्ये जी कर्तबगारी गाजविली मग ते सहकार क्षेत्र असेल किंवा कृषी क्षेत्र असेल किंवा शैक्षणिक क्षेत्र असेल यामध्ये त्यांनी जे प्रचंड योगदान दिले त्यामुळेच त्यांना याठिकाणी काम करण्याची संधी मिळाली. त्यांनाही मी सदनामध्ये परत येण्यासाठी शुभेच्छा देतो. त्यांना सदनामध्ये परत येऊन महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न सोडविण्याचे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, आमचे दुसरे एक मित्र श्री. सुरेशदादा देशमुख हे देखील निवृत्त होत आहेत. परभणी नगरपरिषदेच्या अध्यक्षापासून ते सहकार क्षेत्रापर्यंत आणि बँकींग क्षेत्रापर्यंत सर्वच क्षेत्रातील हे भारदस्त असे व्यक्तीमत्व आहे. सर्वश्री अनंत तरे, भाई जगदीश गुप्ता, रामदास तडस, डॉ.वसंतराव पवार, सुरेश देशमुख आणि दिलीप देशमुख हे सर्व सदस्य जरी निवृत्त होत असले तरी त्यांना परत सभागृहात यावे आणि सभागृहाची शान वाढवून राज्यातील गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी निश्चितपणाने योगदान द्यावे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि निवृत्त होणाऱ्या सर्व माननीय सदस्यांनी सदनामध्ये पुन्हा परत यावे अशा प्रकारच्या शुभेच्छा देऊन माझे दोन शब्द संपवितो.

------ 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड,रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आणि माझे पाच सहकारी या सदनातील 6 वर्षाच्या कालखंड पूर्ण करीत असून सर्व माननीय सदस्यांना आम्हांला निरोप देऊन शुभेच्छा दिलेल्या आहेत. आई एकवीरा देवीच्या आशिर्वादाने आणि आई-वडिल तसेच माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे व माननीय श्री. उध्वव ठाकरे यांच्या यांच्या आशिर्वादाने तसेच माननीय श्री. मनोहर जोशी, श्री. मधुकर सरपोतदार, श्री. सुधीर जोशी, श्री. दिवाकर रावते, श्री.लिलाधर डाके, श्री. रामदास कदम, श्री. प्रमोद नवलकरास तसेच श्री. गोपीनाथ मुंडे आणि इतर नातेवाईक यांच्या माध्यमातून आणि त्यांच्या आशिर्वादाने मला याठिकाणी काम करण्याची संधी मिळाली. खूप मेहनती असलेल्या कोळी समाजाच्या कुटुंबाती मी गरीब कार्यकर्ता. घरात कोणतेही राजकीय पाठबळ नसताना आणि घरातील कोणीही ग्रामपंचायत सदस्य नसताना सुध्दा ठाण्यासारख्या वैभवशाली शहराचे महापौर पद तीन वेळा भूषविण्याचा मान माझ्या पक्षाने मला दिला आणि त्यानंतर या उच्च सदनामध्ये येण्याचा योग आला. ठाण्याचे महापौर पद सोडल्यानंतर रायगडसारख्या लोकसभा मतदार संघातून मी तीन वेळा लढलो.

....भारवि

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे...

सन 1996 आणि 1998 मध्ये मी माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर.अंतुले आणि श्री.दत्ता पाटील यांच्या विरोधात लोकसभेची निवडणूक लढविली. या निवडणुकीमध्ये मला विजयासाठी दोन हजार मते कमी मिळाल्यामुळे विजयी होऊ शकलो नाही. त्यामुळेच मला या सदनामध्ये येण्याची संधी मिळाली. आजच्या प्रसंगी मला माजी सदस्य कै.अरुण मेहता आणि श्री.व्यंकप्पा पत्की यांची आठवण होते. कै.अरुण मेहता या सदनाचे सदस्य असताना नियमाप्रमाणे सभगृहाचे कामकाज झाले असे विचार मतभेद बाजूला सारून मांडत असत. मला माझे पहिले भाषण आठवते. मी ज्यावेळी पहिल्यांदाच सभागृहात आलो त्यावेळी पु.ल.देशपांडे यांना श्रध्दांजलीचा कार्यक्रम सभागृहाच्या पटलावर होता. त्यावेळच्या माझ्या भाषणाचे कौतुक श्री.दिवाकर रावते, श्रीमती नीला देसाई यांनी केले होते. त्यावेळी असे म्हणालो होतो की, माननीय शिवसेना प्रमुखांच्या आशीर्वादाने या सदनामध्ये आलो हे मी माझे भाग्य समजत समजतो. पण पु.लं.सारख्या महान साहित्यिकाला श्रध्दांजली वाहणे हे मी माझे भाग्य समजत नाही. हे वाक्य माझ्या कायम स्मरणात राहिले आहे. दुसऱ्या दिवशी मी मा.श्री.बाळासाहेबांना फोन करून माझे भाषण झाल्याचे सांगितले. पण आदल्या रात्रीच मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांना फोन गेला होता. त्या दिवसांपासून सदनामध्ये बोलताना कुठेही चुकीचे बोलणार नाही याची मी काळजी घेण्याचा प्रयत्न केला. पक्षाच्या शिस्तीला शोभेल असे बोलण्याचा प्रयत्न केला. मी आज मनापासून सन्माननीय प्रा.ना.स.फरांदे, मा.श्री.विलासराव देशमुख, मा.श्री.आर.आर.पाटील, माजी मुख्यमंत्री मा.श्री.सुशीलकुमार शिंदे यांना धन्यवाद देतो. या सदनामध्ये काम करीत असताना या सर्वांनी मला नियमाच्या पलिकडे जाऊन मदत केलेली आहे. मा.श्री.रावते हे ठाण्याचे पालकमंत्री होते. त्यावेळी ठाण्यातील साईराज इमारत कोसळण्याची दुर्घटना घडली. या घटनेत 19 लोक मृत्युमुखी पडलीत. या इमारतीतील अन्य माणसांचे प्राण वाचविण्यासाठी त्या इमारतीच्या बाजूच्या सहा इमारती पाडायला लागल्या. मी सदनामध्ये येईपर्यंत हे सर्व लोक रस्त्यावर आले होते. त्यांना कुठल्याही प्रकारे न्याय मिळत नव्हता. तेव्हा मी सदर प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केल्यानंतर या सहा इमारतीतील लोकांचे शासनाच्या माध्यमातून पुनर्वसन करण्यात आले. ठाण्यातील हिंद कंटेनर कंपनी 16 वर्ष बंद होती. या कंपनीच्या जागेवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे.,.

इमारत बांधून तेथे लोक रहायला आलेत, पण या कंपनीच्या कामगारांना देणी देण्यात आली नव्हती. हा प्रश्न सदनामध्ये उपस्थित केल्यानंतर सदर कंपनीतील 106 कामगारांना 75 लाखांची देणी देण्यात आली.माननीय मंत्री श्री.वसंत पुर्के, मा.विरोधी पक्ष नेता श्री.पांडुरंग फुंडकर, मा.श्री.मधुकर सरपोतदार, मा.श्री.गुरूनाथ कुलकर्णी, मा.प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आम्हा सहा सदस्यांबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, जो गौरव केला आहे, त्याबद्दल मी ऋण व्यक्त करतो. या सभागृहात मी परत येणार किंवा नाही हे मला माहित नाही. पण येथे ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्यांचा आधार घेऊन यापुढेही मी जनतेची सेवा करण्याचा प्रयत्न करीन. मी सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांना पत्रकार व इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांनी प्रसिध्दी दिल्याबद्दल त्यांचे तसेच, विधिमंडळाचे अधिकारी,कर्मचारी यांचे देखील आभार मानतो. या सर्वाभौम सभागृहाचे माननीय सभापती यांच्याकडे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी हट्ट धरल्यानंतर त्याप्रती त्यांनी जे सहकार्य केले आहे, त्याबद्दल मी आभार आणि ऋण व्यक्त करतो आणि इथेच थांबतो. धन्यवाद.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आज या ठिकाणी सहा सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम होत आहे, त्यात माझाही समावेश आहे. माझ्या इतर मित्रांच्या वतीने आपल्या सर्वांचे ऋण व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, पार्लमेंट मध्ये गेल्यानंतर छोटया सभागृहात येण्याची कोणाची इच्छा नसते, असा लोकांचा समज आहे. परंतु तसा समज माझा नाही. मी स्वत:हून या सभागृहामध्ये आलेलो आहे. दिल्लीला संसदेमध्ये जाण्याऐवजी मुंबईत विधानमंडळात सदस्य म्हणून काम करावे या सद्हेतूने मी या सभागृहात "नाईट-वॉचमन" म्हणून आलो आहे. आपल्या अपेक्षा आहे की, मी सेंच्युरी मारावी. जर सर्वांचीच तशी इच्छा असेल तर निश्चित सेंच्युरीही मारता येईल.

सभापती महोदय, सर्वप्रथम मी आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देतो. आपल्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मला मिळाली. वास्तविक पाहता प्रत्येक सभागृहाचे वेगळे वैशिष्टय असते. त्यानुसार याही सभागृहाचे वेगळे वैशिष्टय आहे. या सभागृहामध्ये निरनिराळया विषयांवर, विधेयकांवर अतिशय चांगल्या स्तरावर आणि अर्थपूर्ण चर्चा होते. मला सुध्दा अशा चर्चेमध्ये सहभागी होता आले, त्याबद्दल मी स्वत:ला धन्य समजतो. पीठासीन अधिकारी म्हणून माननीय शिवाजीराव देशमुखसाहेब, उपसभापती माननीय श्री.वसंतराव डावखरे, तसेच तालिका सभापती यांनी जे मार्गदर्शन आणि सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील, विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना मी मन:पूर्वक धन्यवाद देऊ इच्छितो. त्याच प्रमाणे माजी विरोधी पक्षनेते सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या प्रती सुध्दा मी ऋण व्यक्त करतो. माझे सहकारी श्री.प्रतापराव सोनवणे यांनी केलेल्या सूचनांचा उल्लेख मला या ठिकाणी करणे आवश्यक आहे. त्यांनी मला या सभागृहाच्या कामकाजाबद्दल चांगल्याप्रकारे मार्गदर्शन केले. या सभागृहात आल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांची कार्यशैली मला जवळून बघता आली. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार....

नवलकर यांच्या अनुभवाचे बोल सुध्दा या ठिकाणी ऐकावयास मिळाले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यासारख्या नेत्याची जवळून ओळख झाली हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांचेही मी आभार मानतो.

महोदय, या सभागृहात आणि पक्षामध्ये काम करण्याची संधी आमचे राष्ट्रीय नेते माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेबांच्या आशिर्वादाने मला मिळाली. त्यामुळे त्यांचेही मी आभार मानतो. आमच्या पक्षाचे प्रथम पक्षाध्यक्ष आणि नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री श्री.छगन भुजबळ, दुसरे पक्षाध्यक्ष श्री.आर.आर.पाटील आणि विद्यमान पक्षाध्यक्ष श्री.अरुण गुजराथी यांचाही मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे या सभागृहात येण्याची संधी मला मिळाली. आमच्या पक्षाचे गटनेते श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचेही मार्गदर्शन लाभले. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य सर्वश्री गोविंदराव आदिक, उल्हास पवार आणि प्रा.जोगेंद्र कवाडे यांचा देखील जवळून परिचय झाला आणि या सभागृहाच्या कामकाजामध्ये चांगल्या प्रकारचा सहभाग घेता आला.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

सभापती महोदय, शासकीय अधिकारी श्री. कळसेसाहेब आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे सुध्दा मला खूप चांगले मार्गदर्शन मिळाले, त्याबद्दल त्यांनाही मी धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेब, माननीय मंत्री प्रा. वसंत पुरके साहेब, माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील साहेब यांचे देखील मन:पूर्वक आभार मानतो. आपल्या सर्वांच्या शुभेच्छा असतील तर निश्चितच मला या सभागृहात परत येण्याची संधी मिळून समाजाची सेवा करता येईल. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला येथे बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. त्याचप्रमाणे राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री व आमचे नेते श्री. विलासराव देशमुख साहेब, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब, सन्माननीय सदस्य श्री. गोंविदराव आदिक साहेब तसेच इतर सन्माननीय ज्येष्ठ सहकारी यांचे देखील आभार मानतो. ज्यांच्यामुळे मला या सभागृहात येण्यास संधी मिळाली त्या आदरणीय श्री. विलासराव देशमुख साहेबांचे मी शतश: आभार मानतो. त्याचप्रमाणे माननीय श्री. पवार साहेब, माननीय श्री. रेंगे-पाटील साहेब, माननीय श्री. बोर्डीकर साहेब तसेच माननीय श्री. सुरेश जेथलिया साहेब यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे देखील आभार मानतो. नेतृत्व पाठीशी असल्यास सभागृहात यायला वेळ लागत नाही यावर माझा दृढ विश्वास आहे. मी पुन: एकदा आदरणीय मुख्यमंत्री साहेबांचे आभार व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास तडस (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माझ्या 12 वर्षांच्या कालखंडात मला विधान परिषदेच्या सभागृहात काम करताना बरेचसे शिकावयास मिळाले. त्याचप्रमाणे आपणाकडून, माजी सभापती माननीय टिळकसाहेबांकडून तसेच माननीय फरांदे साहेबांकडून देखील मला मार्गदर्शन मिळाले. आमचे नेते श्री. शरद पवार साहेब यांनी देखील मला या सभागृहात दुसऱ्यांदा येण्याची संधी दिली, त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. त्याचप्रमाणे माननीय खासदार श्री. दत्ताजी मेघे, माननीय श्री. आर.आर.पाटील, माननीय श्री. अजित पवार यांच्यामुळे देखील मला या सभागृहात येण्याचे भाग्य मिळाले, त्यांचे देखील मी शतश: आभार मानतो. सभापती महोदय, माझ्या सर्व सहकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रश्न या सभागृहात चांगल्या प्रकारे सोडविले. मला या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते व मधुकर सरपोतदार यांचे देखील सहकार्य मिळाले.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास तडस ...

या ठिकाणी खेळाडूला न्याय मिळण्यासाठी सभागृहाच्या माध्यमातून अनेक प्रश्न मांडण्यात आलेले आहेत. माझी एकच इच्छा अशी आहे की, ज्या प्रमाणे कुस्तीगाराला पंजाब, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व कर्नाटक या राज्यामध्ये गुणवत्तेनुसार प्रमोशन मिळते. त्या कुस्तीगारांना नॅशनल लेव्हल व आशियायी स्पर्धेमध्ये खेळण्यासाठी प्रवेश देण्यात येते, अशा खेळाडूना डायरेक्ट निरिक्षकाची किंवा डीवायएसपीची नोकरी देण्यात येते. त्याचप्रमाणे या महाराष्ट्रामध्ये खेळाडूला न्याय द्यावा. महाराष्ट्रामध्ये कुस्तीगार हा एक चांगळा खेळ आहे. परंतु तो खेळ आता नामशेष होत चाललेला आहे. म्हणून या निमित्ताने माझी अशी विनंती आहे की, खेळाडूच्या माध्यमातून अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यांची सुध्दा तड लावण्यात यावी. या ठिकाणी माननीय श्री. आर.आर.पाटील, उपमुख्यमंत्री व माननीय प्रा.वसंत पुरके, शिक्षण मंत्री, विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्मानीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य प्रा, जोगेंद्र कवाडे यांनी आमच्या विषयी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांच्याशी मी सहमत आहे. आपल्या सर्वांची सदिच्छा असेल तर मी पुन्हा या सभागृहामध्ये येईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे दोन शब्द संपवितो.

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव डावखरे (उपसभापती) : सभापती महोदय, आज विधान परिषद सभागृहातील 6 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे, डॉ. वसंतराव पवार, श्री. दिलीपराव देशमुख, श्री.सुरेशदादा देशमुख, श्री. रामदास तडस व श्री. जगदीश गुप्ता या सर्व सदस्यांनी आपल्या राजकीय जीवनामध्ये सामाजिक कार्य केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे हे ठाणे महानगरपालिकेचे तीन वेळा महापौर होते. त्यांनी महापौर म्हणून काम करतांना ठाण्यामध्ये आपल्या कामाचा ठसा उमटविलेला आहे. ते ज्यावेळी महापौर होते त्यावेळी मी ठाणे महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम पाहत होतो. श्री. अनंत तरे यांचा राजकीय प्रवास निश्चितपणे उल्लेखनीय असा आहे. त्यांनी पक्षीय पातळीवरुन सुध्दा झपाटयाने ठाण्यामध्ये कामे केलेली आहेत. त्यांचे सर्व राजकीय पक्षाचे मित्रमंडळी आहेत, श्री. अनंत तरे हे एक उमदे व्यक्तीमत्व आहे, ज्याप्रमाणे त्यांनी महापौर म्हणून 3 टर्म पूर्ण केल्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे त्याचप्रमाणे ते येथे सुध्दा तीन वेळा निवडून येतील अशी मला खात्री आहे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता, श्री. रामदास तडस, डॉ. वसंतराव पवार, श्री. सुरेशदादा देशमुख व श्री. दिलीपराव देशमुख हे सन्मानीय सदस्य निवृत्त होत आहेत, सन्माननीय श्री. दिलीपराव देशमुख यांनी अर्थ राज्यमंत्री म्हणून प्रभावीपणे काम केलेले आहे. त्यांचे राजकीय वैभव फार मोठे आहे, एका गौरवशाली घराण्यामध्ये ते जन्माला आलेले आहेत. त्यांनी एक आदर्श आपल्यासमोर ठेवलेला आहे. मी सगळया निवृत्त होणाऱ्या सदस्यांना त्यांच्या भावी जीवनासाठी शुभेच्छा देतो व माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी याठिकाणी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा प्रस्ताव मांडला व त्या प्रस्तावाला माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पाठिंबा दिला. त्या सर्व सहा माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या अनुषंगाने मी याठिकाणी माझे विचार मांडतो. या सदनामधून निवृत्त होणारे माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे, जगदीश गुप्ता, रामदास तडस, वसंतराव पवार, दिलीप देशमुख व सुरेश देशमुख यांनी या सदनाच्या माध्यमातून अत्यंत पोटतिडिकीने जनसामान्यांचे अनेक प्रश्न मांडले आहेत. अशाप्रकारे या सदनाच्या माध्यमातून जनसामान्यांची सातत्याने सेवा करणारे हे सर्व कार्यकर्ते आहेत. यामध्ये माननीय सदस्य श्री. अनंत तरे हा अत्यंत उमदा, दिलदार आणि जिद्दीचा तरुण नेता या दृष्टीने आपण त्यांचे वर्णन केले तर ते वावगे होणार नाही. मी ठाणे जिल्हयाचा पालक मंत्री होतो त्यावेळी ठाणे महानगरपालिकेचे तीन वेळा महापौर म्हणून मी त्यांना पाहिले आहे. सतत कार्यामध्ये व्यस्त असणारे आणि त्याचबरोबर सतत हसतमुख असणारे असे हे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या राजकीय संघटनेकडून त्यांच्या अष्टपैलू कार्याची योग्य नोंद घेऊन यापुढील काळात त्यांच्या उज्वल भवितव्याला संधी मिळेल याची मला खात्री वाटते.

त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता हे सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून आले. मधल्या काळात त्यांनी राज्यमंत्री म्हणून काम केले आहे . अमरावती जिल्हयामध्ये त्यांनी आपल्या कार्याचे अत्यंत चांगल्या पध्दतीचे जाळे विणले. अशापध्दतीचे ते नेते आहेत. माननीय सदस्य श्री. रामदास तडस हे खऱ्या अर्थाने खिलाडू वृत्तीचे, ध्येयवादी व जबरदस्त चिंतन करणारे आणि प्रत्येक समस्येवर मात करणारे अशापध्दतीने धडपडणारे व्यक्तिमत्व आहे. ते मितभाषी असल्यामुळे या सदनाच्या माध्यमातून त्यांना आपल्या प्रश्नाची माहिती घ्यावयाची ठरविली तर आज प्रश्न विचारणारे अनेक माननीय सदस्य आघाडीवर आहेत त्यामध्ये त्यांचा क्रमांक पुष्कळ वरचा लागेल असे मला स्वत:ला वाटते. विशेषत: त्यांनी याठिकाणी व्यक्त केलेले विचार आहेत, त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री सभागृहामध्ये आहेत. त्यांनी असे सांगितले की, पंजाब, हरयाणा व अन्य राज्यांप्रमाणे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, जागतिक पातळीवरील खेळाडूंना देशामधील पोलीस किंवा एस.आर.पी. सारख्या विभागामध्ये इन्सपेक्टर, डी.वाय.एस.पी. सारखे पद देऊन आपण त्यांचा गौरव करावा. अशा अष्टपैलू खेळाडूंना या देशाच्या माध्यमातून जबरदस्त मोठी संधी दिली तर आपल्याला क्रीडा क्षेत्रामध्ये अत्यंत नामवंत खेळाडू तयार करता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती...

अशाप्रकारची सूचना त्यांनी मनापासून केली आहे. म्हणून माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, यादृष्टीने राज्याने काही निर्णय घेतला असल्याचे मी एक महिन्यापूर्वी ऐकले आहे.माननीय मुख्यमंत्री महोदय, हरयाणा, पंजाबमध्ये असे अनेक लोक आहेत जे डी.एस.पी., डी.आय.जी. आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील क्रीडापटू होते त्यांना त्या त्यावेळी संधी मिळाली. आणि महाराष्ट्राची सुध्दा याबाबतीत एक परंपरा आहे.त्यामुळे माननीय सदस्य श्री. रामदास तडस यांनी व्यक्त केलेल्या भावनेचा मी सुध्दा गौरवाने उल्लेख करतो.

माननीय सदस्य श्री. वसंत पवार हे उत्तर महाराष्ट्रातील अत्यंत अष्टपैलू नेतृत्व म्हटले तर ते एक निष्णात डॉक्टर आहेत. त्याचबरोबर त्यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य बघितले तर राज्यामध्ये दोन मान्यवर शिक्षण संस्था आहेत त्यापैकी नाशिकच्या शिक्षण संस्थेचे सरचिटणीस म्हणून ते काम करतात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती (पुढे सुरु...

या सद□च्या माध्यमातू□अ□□ प्रश□सातत्या□सोडवि□याचा त्यांचा प्रयत□असतो.

स□मा□□य सदस्य श्री.दिलीप देशमु□ हे लातूर जिल्हापरिषदेचे अध्य□, लातूर जिल्हा मध्यवर्ती सह□री बँ□चे अध्य□, राज्य सह□री बँ□चे संचाल□, त्या□□र अर्थ विभा□□चे राज्य मंत्री म्ह□□त्यां□ □म □लेले आहे. त्यांचे अत्यंत पर□ड विचाराचे □तृत्व आहे.

त्या□□र स□मा□□य सदस्य श्री.सुरेश देशमु□ हे परभ□ □□रपलि□चे अध्य□ म्ह□□ त्यां□ अ□□ वर्षे □म □लेले आहे. विधा□□परिषदेचे सदस्य म्ह□□ □म □रत असता□ अत्यंत अल्प □ळ □म □र□याची त्यां□ संधी मिळालेली आहे. या □ळात त्यांची □म □र□याची सातत्या□ धडपड □लेली आहे. या सर्व सहाही सह□च्यां□ मी शुभेच्छा देतो. त्यांच्या भावी आयुष्यामध्ये आ□□ □म □र□याची त्यां□ सधी मिळेल, अशी अपे□ व्यक्त □रु□माझे भाष□ पुरे □रतो.

आता मी सभा□□हाचे □म□ज स□मा□□य सदस्यांचे फोटो □ढ□यासाठी 30 मि□□टां□रिता स्था□□त □रतो.

(सभा□□हाची बैठ□ 4 वाजू□ 7 मि□□टां□, 30 मि□□टां□रिता स्था□□त झाले.)

या□□र श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या, तत्कालीन माननीय गृह राज्यमंत्री (ग्रामीण), यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून द्यावा.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

पृ.शी./मु.शी.: माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अंतिम अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. नतिकोद्दिन खतिब (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अंतिम अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावा.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध विधेयक

मु.शी.: सन 2003चे वि.पि.वि.क्र. 15 - शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध विधेयक या विधानपरिषदेने पारित केलेल्या विधेयकात विधानसभेने केलेल्या सुधारणांना सहमती देण्याबद्दलची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व तत्संबंधीचा प्रस्ताव.

उपसभापती : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो संदेश वाचून दाखवतील.

सचिव : मला आपणास असे कळविण्याचा निदेश आहे की, महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी पारित केलेले विधानपरिषद विधेयक क्रमांक 15 - महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध विधेयक, 2003 यास विधानसभेने सुचविलेल्या सुधारणांसहित दिनांक 20 एप्रिल, 2006 रोजी पारित केले आहे. सुधारणांची यादी सदस्यांना वितरित करण्यात आली आहे. या सुधारणांना विधानसभेने विधानपरिषदेची सहमती मागितली आहे.

खंड 6. - पृष्ठ क्रमांक 5 वर -

(अ) ओळ क्रमांक 12 मध्ये,

"सर्व अधिकारी " या मजकुरानंतर "आणि गट 'ब' मधील सर्व अधिकारी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) ओळ क्रमांक 17 मध्ये,

"गट 'ब' मधील सर्व अधिकारी" या मजकुराऐवजी "गट 'क' मधील सर्व कर्मचारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सचिव...)

(क) ओळ क्रमांक 18 मध्ये,

" 'क' आणि " हा मजकूर वगळण्यात येईल.

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान परिषदेने पारित केलेले सन 2003चे वि.प.वि.क्रमांक 15 - शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक यात विधानसभेने सुचविलेल्या पुढील सुधारणा विचारात घ्याव्यात असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

खंड 6. - पृष्ठ क्रमांक 5 वर -

(अ) ओळ क्रमांक 12 मध्ये,

"सर्व अधिकारी " या मजकुरानंतर "आणि गट 'ब' मधील सर्व अधिकारी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) ओळ क्रमांक 17 मध्ये,

"गट 'ब' मधील सर्व अधिकारी" या मजकुराऐवजी "गट 'क' मधील सर्व कर्मचारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(क) ओळ क्रमांक 18 मध्ये,

" 'क' आणि " हा मजकूर वगळण्यात येईल.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेने संमत केलेले सन 2003 चे वि.प.वि. क्रमांक 15, शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्यें पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक यात विधानसभेने सुचविलेल्या सुधरणांना सहमती द्यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेण्याबाबत</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. एक-दोन तासानंतर हे अधिवेशन संस्थगित होणार आहे. या संपूर्ण अधिवेशनामध्ये विरोधी पक्षाच्या वतीने अनुशेषाच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन झालेले असून तत्संबधी ॲडव्होकेट जनरल यांचे मत घ्यावे अशी मागणी केलेली होती. शासनाने देखील ॲडव्होकेट जनरल यांचे मत सभागृहापुढे ठेवण्याचे कबूल केले होते. आता संध्याकाळचे पावणेपाच वाजत आहेत. अजून पर्यन्त ॲडव्होकेट जनरल यांचे मत आलेले नाही.

उपसभापती : सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी यासंबंधी निवेदन करावे अशी सूचना मी शासनास करीत आहे.

श्री. आर.आर.पाटील : ठीक आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>शेतक-यांच्या आत्महत्येबाबत</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 1) श्री. सुखदेव गोपीनाथ राठोड, राहाणार वडवणी, ता. जि. बीड, 2) श्री. गोविंद केशवराव नेहारे, राहाणार, गिडला, ता. कळंब, जि.यवतमाळ, 3) श्री. हनुमंता तुकाराम शिंदे, राहाणार कुपरी, ता.जि. वाशिम आणि 4) श्री.गुलाबराव किसनराव चंद्रवंशी, राहाणार देवजना, ता. जि. हिंगोली या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

सभापती महोदय, यासंदर्भात दोन मिनिटे बोलण्यासाठी मी आपली परवानगी मागतो. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलेले आहे.

.....नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ श्री. शिगम नंतर 16:45

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात विरोधी पक्षाकडून जेव्हा जेव्हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आणि त्यावर चर्चा झाली त्यावेळी शासनाकडून आत्महत्या केलेल्या भागातील शेतकऱ्यांना काही ठोस अशी मदत मिळेल आणि सहानुभूति मिळेल असे वाटले होते. पण याबाबतीत केलेल्या निवेदनावरुन तसे काही दिसून आले नाही.म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत सतत निषेध करण्यापेक्षा दिनांक 27 फेब्रुवारीपासून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नांवे सभागृहात वाचून दाखविण्याची अनुमती मी मागितली. माननीय सभापतींनी मला अनुमती दिली त्याबद्दल मी माननीय सभापतींना धन्यवाद देतो. केवळ माननीय सभापतींच्या मान्यतेमुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नांवे विधिमंडळाच्या रेकॉर्डवर येऊन त्यांना वेगळया अर्थाने आदरांजली वाहण्यात आली आहे. 27 फेब्रुवारीपासून आजपर्यंत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या 350 आहे. अधिवेशनाच्या कालावधीत 66 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. याची नोंद शासनाकडून घेतली जात नाही हे पाहून मत अत्यंत व्यतीत होते. माननीय मुख्यमंत्र्यांचे मी अभिनंदन करणार नाही पण त्यांना धन्यवाद देईन. शेतकऱ्यांना 6 टक्के व्याजाने कर्ज देण्याची घोषणा त्यांनी केली आहे. तसेच शेतकऱ्याने पूर्ण व्याज भरले तर 2 टक्के व्याज माफ करुन 4 टक्के व्याजाचा दर केला जाईल. केंद्र सरकारचे 5 टक्के दराने 3 लाखापर्यंत कर्ज दिले जाणार आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्याच्या उत्पादनाला भाव देण्यासाठी केंद्राकडे शिफारस केलेली आहे. कापसाच्या संदर्भात हमीभावाची घोषणा झाली असती तर त्याचे स्वागत झाले असते. काही नाही तर त्यातल्या त्यात येणाऱ्या हंगामासाठी 6 टक्के व्याजाचा दर आणि वीज बिलात माफी देण्याची घोषणा केली त्याबद्दल शासनाला मनापासून धन्यवाद देतो. अधिवेशन कालावधीत 66 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. लोकांचा शासनावरील विश्वास उडणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी. नवीन उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना दिलासा देण्याची जी संधी मला उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई मोटार वाहन कर(दुसरी सुधारणा)विधेयक.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 50 - मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 50 - मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकाच्या बाबतीत चर्चा झाली होती. सध्याची जी कराची मर्यादा आहे ती 1994 पासून वाढविण्यात आली नव्हती. ती वाढविण्यासाठी हे बिल मांडण्यात आले आहे. कराची कमाल मर्यादा जास्तीज तास्त मर्यादित ठेवून पुढील कालावधीत कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येणार नाही. ऑटो रिक्शाच्या बाबतीत 5 वर्षे कोणत्याही प्रकारची कर वाढ केली जाणार नाही. परिवहन विभागाच्या माध्यमातून 1350 कोटी रुपयांचा महसूल गोळा केला जातो त्यापैकी 62 टक्के रक्कम विकास कामांवर खर्च केली जाते. माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक मंजूर करण्यात यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 50 - संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

उपसभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 50 - संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 17 बाबात.

उपसभापती : माननीय सभापतींच्यचा दालनात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 17 - मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

.....

यानंतर श्री.भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नागपूर प्रदेशात झालेली गैरपध्दतीने नोकर भरती.

मु.शी.: महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नागपूर प्रदेशात झालेली गैरपध्दतीने नोकर भरतीबाबत सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर यांनी दिलेली नियम 93 सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्य मंत्री) : माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स.यांनी "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नागपूर प्रदेशात झालेली गैरपध्दतीने नोकर भरती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL NO. XIII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT,1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT,1948.)

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-13, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-13, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

महोदय, महाराष्ट्रात महानगरपालिकेच्या संदर्भातील मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 असे तीन कायदे आहेत.

या विधेयकाला एनेब्लिन क्लॉज तिन्ही महानगरपालिकांमधून दिले आहे. त्यामुळे या ठिकाणी हे विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : महोदय, ज्यावेळी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये या विषयाला धरुन चर्चा उपस्थित झाली होती. त्यावेळी ट्रक टर्मिनस असावे अशा प्रकारचा उल्लेख यामध्ये आहे. त्यावेळी एन.डी. झोनमधील ज्या टाऊन-शिप आहेत, त्यांना सुध्दा रेड कार्पेट ट्रीटमेंट मिळेल अशी चर्चा त्या ठिकाणी होती. प्रकल्पासाठी एमएमआरडीए ची आवश्यकत आहे. परंतु त्या नावाखाली या बाबी आपण टाऊन-शिप बिल्डर्स झोनसाठी लागू करणार असाल तर मुंबई महानगरपालिकेचे मोठे उत्पन्न बुडेल. हे बिल्डरच्या हितासाठी आहे आहे असे मला वाटते. त्यामुळे या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा असे मला वाटते.

श्री.राजेश टोपे : टाऊन-शिप च्या संदर्भात या विधेयकाचा संबंध नाही.

उपसभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 (दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक-13 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-13 संमत झाले आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO.LIII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT,1923)

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 53, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 53, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

राज्यामधील केबल दूरचित्रवाणी सेवेतील करमणूक शुल्क वाढ या विधेयकामध्ये सुचविली आहे. माननीय वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांनी राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात जे कर वाढविले, त्यामध्ये केबल दूरचित्रवाणी सेवेवरील करमणूक शुल्कही वाढविण्याचा निर्णय घेतला. ही वाढ 50 टक्के सुचविली आहे. सन 1992 नंतर हे कर वाढलेले होते. पूर्वीचे दर कमी केल्यानंतर, ते दर सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये 30 रुपये, "अ", "ब", "क" नगरपालिकांमध्ये 20 रुपये व उर्वरित क्षेत्रांमध्ये 10 रुपये असे होते. सुरुवातीला हे दर 90-60-30 असे होते. परंतु केंद्र सरकारच्या दूरसंचार नियामक प्राधिकरणाने यासंबंधी निर्णय घेऊन डी.टी.एच. च्या दराएवढेच दूरचित्रवाणीची दर ठेवावेत, अशाप्रकारचे आदेश दिल्यानंतर आपण हे दर केले. पूर्वी 30-20-10 अशा असणाऱ्या दरांमध्ये 50 टक्क्यांनी वाढ केलेली आहे. केबल दूरचित्रवाणी च्या व्यवस्थेमध्ये एकूण 24 लाख कनेक्शन्स आहेत. राज्याची लोकसंख्या जवळपास 10 कोटी आहे, परंतु फक्त 24 लाखांचीच कनेक्शन्स आहेत, ही संख्या कमी आहे. याचा अर्थ, बऱ्याचशा ठिकाणी कनेक्शन घेतले जाते, त्याचा वापर होतो, परंतु सरकारला कर

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

मिळत नाही. पाच हजार कनेक्शन्स असतील तर अडीच हजार कनेक्शन्स दाखविण्यात येतात. मोठ्या प्रमाणामध्ये कराची चोरी केली जाते, कर बुडविले जातात. या विषयामुळे शहरामध्ये गँगवॉरही वाढलेले आहे.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे..

राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे, केबल व दूरचित्रवाणी यांच्या माध्यमातून जी कनेक्शन दिली जातात, त्या सर्व कनेक्शनच्या माध्यमातून कर गोळा व्हावा यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये 50 लाख रुपयांचा निधी राखून ठेवला आहे. आणि प्रत्येक घरोघरी, डोअर टू डोअर जाऊन कनेक्शनची तपासणी करण्यात येणार आहे. हा सर्व्हे करण्यासाठी 50 लाख रुपयांचा निधी राखून ठेवण्यात आलेला आहे. त्वरीत मुंबई पासून बोरीवली, अंधेरी, कांदिवली पर्यंत महसूल विभागाकडून सर्व्हे करण्यात येईल. सध्या करमणूक कराचे उत्पन्न कमी मिळत आहे, ते उत्पन्न वाढावे यासाठी हे विधेयक आणण्यात आलेले आहे. 24 लाख कनेक्शनमधून आज 60 कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न मिळत आहे. आता यामध्ये 50 टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे त्यातून 30 ते 40 कोटी रुपये वाढीव मिळतील असे मला वाटते. या पेक्षाही जास्त रक्कम यातून मिळाली पाहिजे या दृष्टीकोनातून नवीन सिस्टीम करमणूक कराच्या वसूलीसाठी करण्यात येत आहे. या राज्यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या इंडस्ट्री येत असतांना 21 व्या शतकामध्ये नवीन सिस्टीम डेव्हलप करतांना, पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन उत्पादन वाढवावे असा सरकारचा विचार आहे. त्या दृष्टीने या क्षेत्रात नवीन गँगस्टर व चोरी थांबवावी व राज्याचे उत्पन्न वाढवावे अशी अपेक्षा आहे, या विधेयकाला सभागृहाने पाठींबा द्यावा अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक.

मु.शी.: सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 10 महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधान परिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा, विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती.

सभापती : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

संदेश

सचिव : महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 21 एप्रिल, 2006 रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधान परिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम 129 व 198 (2) अन्वये पाठविण्याचा मला निदेश दिला आहे.

प्रस्ताव

सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 10 महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, 2006 विधान परिषदेची संमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 21 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेर पर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री): सभापती महोदय, दिनांक 21 एप्रिल, 2006 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

"सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 10 महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, 2006 विधानपरिषदेची संमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 21 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेर पर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. सरफरे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील : महोदय, दोन्ही सभागृहाच्या सदस्यांच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

श्रीमती सुधा जोशी, वि.प.स.

श्री. संजय दत्त, वि.प.स.

श्री. कमलकिशोर कदम, वि.प.स.

श्री. जितेंद्र आव्हाड, वि.प.स.

श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.

श्री. मधुकर सरपोतदार, वि.प.स.

प्रा. बी. टी. देशमुख, वि.प.स.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सदस्यांची नावे कुणी निश्चित केली?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, नावे निश्चित करण्यापूर्वी त्यांच्या गटनेत्यांबरोबर चर्चा करण्यात आलेली आहे. विधानसभेचे गटनेते माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी सुचविल्याप्रमाणे नावे निश्चित करण्यात आली आहेत. तरीसुध्दा माननीय सदस्यांचा आग्रह असेल तर यामध्ये आपण बदल करु शकतो. त्यामध्ये काही अडचण नाही. मागील समितीमध्ये जे माननीय सदस्य होते त्यांनाच पुन्हा घेण्यात आले असून फक्त माननीय सदस्य श्री. वसंत पवार हे निवृत्त होत असल्यामुळे त्यांच्याऐवजी.....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमची नेहमी तक्रार असते की, विधानसभागृहामध्ये जे ठरते ते इथे दाखविले जाते. तर मग हे सभागृह कशासाठी आहे? आपण त्यांना परवानगी देता कामा नये. या सभागृहातील माननीय सदस्यांची नावे त्यांनी ठरवावयाची आणि आम्ही फक्त हात लाऊन "मम" म्हणावयाचे हे योग्य नाही. ही बाब प्रत्येक वेळी आम्हाला आपल्या निदर्शनास आणावी लागत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी याची नोंद घ्यावी, आणि यापुढील क्ाळात त्या त्या पक्षाच्या गटनेत्यांबरोबर चर्चा करुन नावे निश्चित करण्यात यावीत.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई करमणूक शुल्क विधेयक

L.A.BILL No.LIII OF 2006

A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923

(चर्चा पुढे चालू)

श्री. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई करमणूक शुल्क विधेयक क्रमांक 53 मध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यात आले आहे. त्याबाबत मी थोडक्यात आणि महत्वपूर्ण माहिती सभागृहाला देऊ इच्छितो. मुंबईमध्ये केबलचा धंदा सुरु झाला. कोणत्याही वित्तीय संस्थेची मदत न घेता, कोणत्याही बँकेचे अर्थसहाय्य न घेता किंवा कुणाचीही मदत न घेता हा केबलचा व्यवसाय मुंबईतल्या घरा-घरापर्यंत पोहोचला. आणि म्हणून या व्यवसायाकडे जीवनावश्यक वस्तू किंवा मनोरंजनाचे एक महत्वाचे साधन म्हणून बघितले जाते. या केबलच्या माध्यमातून ज्ञान, माहिती, शिक्षण, संस्कार अशा वेगवेगळया गोष्टींचा प्रसार होतो. त्यामुळे आज ही एक जीवनावश्यक वस्तू बनलेली आहे. आज करमणूक कर महाराष्ट्र शासन त्या केबल ग्राहकांकडून वसूल करीत आहे. असे असतांना या कराच्या बदल्यात त्या ग्राहकांना काय मिळत आहे हे देखील राज्य शासनाने तेवढेच बघण्याची गरज आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (पुढे सुरु...

या धंद्याला उद्योगाचा दर्जा नसल्यामुळे आज महानगरपालिकांमध्ये किंवा खेडोपाडी याचे कोणतेही एम.आर.पी. रेट नाहीत, यामधील कोणताही दर निश्चित केला गेलेला नाही. 150 रुपयापासून ते 345 रुपयापर्यन्त वेगवेगळया ठिकाणचे वेगवेगळे दर आहेत. हे पैसे केबल ऑपरेटर ग्राहकाकडून एकत्र घेतो. त्यामध्ये असा वेगळा करमणूक कर, वेगळा सर्व्हीस टॅक्स ते घेत नाहीत. हे दोन्ही कर एकत्रपणे घेतले जातात. या धंद्यामधील स्पर्धा कित्येक वर्षे चालली. केबल चालकाला या धंद्यामध्ये जे दर मिळायला पाहिजे होते, ते अपेक्षित दर मिळालेले नाहीत. म्हणून करमणुकीचा जो कर आहे हा जेव्हा वाढविला जातो तेव्हा त्याच्या मागची पार्श्वभूमी पहाणे तेवढेच गरजेचे आहे. हा कर 1992 ला सुरुवातीला लावून कर वसूल करण्यास सुरुवात झाली,नंतर हळुहळू त्या पध्दतीमध्ये वाढ होत गेली. त्यावेळेला देखील आजचा जो मुद्दा आहे, तोच मुद्दा त्यावेळेला देखील होता. कोणत्याही परिस्थितीमध्ये ग्राहकांची अचूक संख्या किती आहे ही शासनाला कळत नाही. मी या मताशी पूर्ण सहमत आहे की, शासनाचा महसूल हा मिळालाच पाहिजे. आज 7 कोटीचा महसूल मिळतो तो आणखी वाढायला पाहिजे, याच्याशी मी पूर्ण सहमत आहे. हा महसूल जेव्हा शासन वसूल करते, त्यावेळेला त्याच्या बदल्यात लोकांना दिलासा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. केबल ही ग्राहकाची आज गरज आहे. याचा दर कमीत कमी ठेवण्यासाठी शासनाने देखील तेवढेच प्रयत्नशील असले पाहिजे. गेले कित्येक वर्षे या एका गोष्टीसाठी ग्राहकांच्यावतीने मी झगडतो आहे. परंतु ज्या गोष्टी करायला पाहिजे होत्या, त्या गोष्टी अजूनपर्यन्त होत नाहीत. केबलची जी किंमत आहे ती आजपर्यन्त कंट्रोलमध्ये येत नाही, याचे कारण पे चॅनल्स हे आहे. हे पे चॅनल्सचे रेट कोणी कंट्रोल करु शकले नाही. हे माहीत आहे की, हे राज्य शासनाच्या हातामध्ये नाही तर ते केंद्र सरकारच्या हातामध्ये आहे. परंतु परदेशी गुंतवणुकीतून मोठे चॅनल्सवाले काम करतात, करोडो, अब्जावधी रुपयांची जाहिरात ते आज बाहेर घेऊन जातात.एकीकडे जाहिरातीतून उत्पन्न घेतात, दुसऱ्या बाजूने ग्राहकांकडून पैसे घेतात, अशाप्रकारे दोन्ही बाजूचा मलिदा हे पे चॅलन्सवाले खातात. आज ट्राय सारखी रेग्युलेटरी ऑथॉरिटी आणली गेली तरी देखील पे चॅलन्सना कंट्रोल करु शकलेला नाही. ट्रायने केबल ऑपरेटर्सचे दर निश्चित केलेले आहेत, फ्री टू वे चॅनलसाठी 72 रुपये असा दर निश्चित केलेला आहे. परंतु जो पर्यन्त पे चॅनल्स कंट्रोल होत नाहीत, त्यांचे दर नक्की होत नाहीत, तोपर्यन्त काही होत नाही. त्यासाठी कोणतीही रेग्युलेटर ऑथरटी काम करीत नाही किंवा तिच्या हाताच्या बाहेरची गोष्ट आहे. हे दर कोणत्याही परिस्थितीमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

ॲड.अनिल परब (पुढे सुरु....

सर्वसामान्य ग्राहकांना पडवडण्यासारखे नाहीत. म्हणून शासन एका बाजूला करमणूक कर वसूल करते, परंतु दुसऱ्या बाजूने कशा पध्दतीने लोकांना कमीत कमी दरामध्ये केबल कनेक्शन मिळेल हे पहात नाही. हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही तर ज्ञानाचे देखील साधन आहे, माहिती मिळविण्याचे एक साधन आहे. वेगवेगळया साधनाने या केबलकडे लोक पहातात. म्हणून शासनाने वेगळा दृष्टीकोन घेऊन लोकांना कमीत कमी पैशामध्ये जास्तीत जास्त ज्ञान कसे मिळेल, यासाठी मदत करणे गरजेचे आहे. सर्वप्रथम याला उद्योगाचा दर्जा देणे गरजेचे आहे. आज केबल ऑपरेटरला या धंद्यामध्ये कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. एका बाजूने त्यांच्याकडून पैसे घ्यायचे आणि दुसऱ्या बाजूने त्यांना कोणत्याही प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध करुन द्यायच्या नाहीत. यामध्ये होणाऱ्या मारामाऱ्यामध्ये केबल ऑपरेटरला संरक्षण नाही, या त्यांच्या कोणत्याही गोष्टीकडे शासनाचे लक्ष नाही. मी या मताशी सहमत आहे की, शासनाला या मधून जास्तीत जास्त पैसे मिळालेच पाहिजेत. परंतु शासनाचे दुटप्पी धोरण कसे आहे, हे मी दाखवून देऊ इच्छितो. डी.टी.एच. सारखे नवीन येणारे तंत्रज्ञान हे श्रीमंतांसाठी म्हणून ओळखले जाते, श्रीमंतांचे चैनीचे साधन म्हणून डी.टी.एच.कडे पाहिले जाते. त्या डी.टी.एच.चे करमणुकीचे कर सुरुवातीला 90 रुपये होते. आज बाजारामध्ये डी.टी.एच.च्या सेटपअप बॉक्सची किंमत 4 हजार आणि बाकीच्या गोष्टी धरल्या तर 8 ते 9 हजार रुपये किंमत आहे आणि त्याचे मासिक भाडे 400 ते 450 रुपये येते. म्हणजे श्रीमंताचे ते साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते. शासन महसूलाची भाषा करते, परंतु याचा सुरुवातीलाच करमणुकीचा दर 90 रुपये होता, तो श्रीमांताच्या खिशातून कमी करुन 30 रुपयावर आणलेला आहे. सर्वसामान्य गरीब ग्राहक जो केबल पहातो, त्याचा 30 रुपये कर होता तो 45 रुपये केला. म्हणजे एका बाजूला डी.टी.एच. तंत्रज्ञान लोकांच्या घरात पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे काय ? अशाप्रकारचा वेगळा विचार या निमित्ताने समोर येतो. म्हणजे डी.टी.एच.चे दर कमी करायचे आणि केबलचे दर वाढवायचे असा प्रकार चाललेला आहे. या केबलच्या धंद्यामध्ये पर कनेक्शन 330 रुपये पे चॅलन्ससाठी द्यावे लागतात. अधिक 70 रुपये केबल ऑपरेटरचे धरले आणि 45 रुपये करमणूक कर धरला तर 450 रुपये आजच्या तारखेला नेट द्यावे लागतात.

यानंतर श्री.बरवड.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड. अनिल परब....

आज केबलचे दर 150 ते 375 पर्यंतच्या मर्यादेत आहे. केबल ऑपरेटर्स ग्राहकांची संख्या पूर्णपणे दाखवण्यास तयार आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, एकदा आमचे दर निश्चित करा. आम्हाला एमआरपी निश्चित करुन द्यावा. आज एका इमारतीमध्ये केबलचा दर 150 रुपये आहे तर दुसऱ्या इमारतीमध्ये केबलचा दर 300 रुपये आहे. केबल ऑपरेटर म्हणतात की, आम्हाला दर निश्चित करुन द्या. आम्हाला स्वत:वर चोर किंवा करचुकवेगिरी करणारे असा शिक्का मारुन घ्यावयाचा नाही. मी बॉम्बे इंटरटेनमेंट ड्युटी ॲक्ट, 1923 मधील सर्व तरतुदी पाहिलेल्या आहेत. आधी केबल ऑपरेटर सर्व लोकांकडून वसुली करीत होते. पूर्वी रेडिओ होते आणि रेडिओवर करमणूक कर होता. रेडिओचा करमणूक कर पोस्ट ऑफीसमध्ये जाऊन भरावा लागत असे. त्याबाबत लायसन्स दिले जात होते आणि पोस्टामध्ये जाऊन करमणूक कर भरल्यावर स्टॅम्प मारला जात असे. आता केबलधारकांची संख्या 24 लाख असल्याचे सांगण्यात येते. ही संख्या कमी आहे. यामध्ये एक गोष्ट सांगू इच्छितो की, आपण केबल ऑपरेटरवर विश्वास ठेऊ नका. आपण आज 50 लाख रुपये तरतूद ठेऊन त्यांचे सर्वेक्षण चालू केले आहे. त्यापेक्षा शासकीय यंत्रणेकडून लोकांच्या घरी जाऊन पैसे वसूल करावेत. तुमचे सर्व पैसे वसूल होतील. यामध्ये असे लिहिले आहे की, "To pay tax is the duty of the proprietor". सुरुवातीला ज्यावेळी विधेयक आणले त्यावेळी त्यांना टॅक्स लावला तो बरोबर होता. कारण त्यावेळी छोटे छोटे केबल ऑपरेटर्स आपल्या घरातून केबल चालवत होते. पूर्वी व्हीसीआरवर चित्रपट दाखवले जात असत. त्यानंतर सीएनएन या वहिनीवरुन पहिल्यांदा लोकांनी युध्द पाहिल्यानंतर केबल काय असते हे लोकांना समजले. त्यानंतर एक, दोन, तीन असे करता करता आज मुंबईमध्ये वेगवेगळ्या फ्रिक्वेंसीवर चालणारे 123 चॅनेल्स आहेत. यामध्ये वेगवेगळे तंत्रज्ञान आलेले आहे. हे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. यामध्ये डीटीएच, सेटअप बॉक्स तंत्रज्ञान अशा गोष्टी आलेल्या आहेत. शासनाला सगळीकडून पैसे वसूल करण्याचे ऑप्शन्स आहेत. यामध्ये केबलचालकांवर दबाव आणावयाचा आणि मल्टी सिस्टीम ऑपरेटर्सना मोकळे सोडावयाचे असे स्पष्ट दिसते. जे गरीब केबल ऑपरेटर्स आहेत, गरीब ग्राहक आहेत त्यांना मनोरंजनापासून दूर करावयाचे अशी विचित्र गोष्ट यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .....

दिसते. यामध्ये कलेक्शनचे अधिकार प्रोप्रायटरला दिलेले आहेत. यामध्ये प्रोप्रायटर कोण आहेत ? पूर्वी केबल ऑपरेटर हा धंदा आपल्या घरातून करावयाचे. आता मल्टी सिस्टीम ऑपरेटर हा धंदा करतात. मग पैसे कोणी गोळा करावयाचे ? केबल ऑपरेटर्स हे आता सर्व्हिस प्रोव्हायडर्स नाहीत. ते फक्त दुसऱ्या कोणाची तरी सर्व्हिस घेऊन मध्यस्थासारखे केबलचे कलेक्शन एजंट म्हणून काम करतात. असे जर असेल तर त्याला केबलचा रेव्हेन्यू गोळा करण्याचा अधिकार आहे. केबलमध्ये शासनाचा संबंध फक्त करमणूक करापुरता मर्यादित आहे. केबलच्या बाबतीत शासनाचा दुसरा काही संबंध येत नाही. म्हणून ही जी यंत्रणा आहे ती केबल ऑपरेटर्सपासून दूर करावी आणि शासनाने स्वत:चा महसूल जिल्हाधिकाऱ्यांच्या यंत्रणेमार्फत गोळा करावा. आता आपण जी आकडेवारी सांगितली त्यापेक्षा कित्येक पटीने शासनाला महसूल मिळेल. या केबल ऑपरेटर्सना प्रेशरमध्ये ठेऊन दुसऱ्या बाजूला डीटीएच चे पैसे कमी केले. डीटीएचच्या बाबतीत 90 रुपये होते ते कमी करुन 30 रुपयांवर आणले आणि केबलचे 30 रुपये होते त्याऐवजी 45 रुपये केले. ही तफावत कशासाठी केली ? हे आजपर्यंत समजलेले नाही. या बिलाच्या उद्देश व कारणामध्ये ही गोष्ट सांगितलेली नाही. हे कशासाठी केले गेले आहे ? करचुकवेगिरीच्या अनुषंगाने हे बिल आणले आहे असे म्हटले आहे. करचुकवेगिरी होता कामा नये. शासनाचा महसूल वाढला पाहिजे. परंतु हे करीत असताना केबल धंद्याला उद्योगाचा दर्जा देखील दिला गेला पाहिजे. त्यांना सर्व सोयीसुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, यामध्ये गँगवॉर आलेला आहे. मागच्यावेळी सुध्दा मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगितले होते की, अशा प्रकारच्या लोकांना शासनाने शोधून काढावे. जे चांगले लोक हा धंदा करु इच्छितात त्यांना धंदा करु द्या. जे गँगवारवाले असतील, वाईट लोक असतील, दादागिरी करुन हा धंदा करणारे लोक असतील, जे कायदा व सुव्यवस्था बिघविणारे लोक असतील अशा लोकांचा रिपोर्ट तयार करा.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड.अनिल परब...)

जे छोटे छोटे केबल ऑपरेटर्स आहेत, जे लोकांना चांगली सेवा देऊ इच्छित आहेत त्यांना त्यांचा व्यवसाय करण्याची संधी द्यावी. माझ्या माहिती प्रमाणे मुंबईमध्ये केबलचे दर सर्वात स्वस्त आहेत. हे दर यापेक्षाही आणखी स्वस्त होऊ शकतील. त्यासाठी केन्द्रावर दबाव आणण्याची गरज आहे. पण या गोष्टीकडे कोणीही गांभीर्याने पाहात नाही. केवळ करमणूक कर वाढवून हा प्रश्न सुटणार नाही. हा करमणूक कर वाढविल्यामुळे केबल ऑपरेटर्सचे नुकसान होणार नाही. यामुळे सर्वसामान्य लोकांचे नुकसान होणार आहे. लोकांना जास्तीचे पैसे भरावे लागणार आहेत. या मुंबईमधील लोकांचे आधीच महागाईने कंबरडे मोडलेले आहे. मुंबईमध्ये काम करणारा माणूस जेव्हा थकूनभागून आपल्या घरी जातो त्यावेळी त्याची पत्नी त्याला केबलचे बील दाखवते आणि मग त्याचा चेहरामोहरा बदलून जातो. सभापती महोदय, कोणी वेगळा करमणूक कर देत नाही. डिसेंबर 2004च्या निकषा नुसार टीआरअेआयने केबलच्या दरामध्ये वाढ केली. त्यावेळी स्पर्धा चालू होती. त्यावेळी केबल ऑपरेटर कोणी 30 रु, कोणी 50रु. कोणी 150 रु., कोणी 200 रु. तर कोणी 300 रु. दर लावीत होता. त्यावेळचे दर वाढविण्यात आले. जो केबल ऑपरेटर 30 रु. दर आकारीत होता त्याला तेवढीच वाढ मिळाली. हे 30+70+50 असे जे मोठे गणित मांडलेले आहे त्यामुळे केबल ऑपरेटरचे उत्पन्न कमी झालेले आहे. परिणामी हा व्यवसाय पूर्णपणे संकटामध्ये सापडलेला आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, महसूल वाढविण्यासाठी असणा-या यंत्रणेपासून केबल ऑपरेटर्सना वेगळे करावे. जर हे पैसे केबल ऑपरेटर्स्ने वसूल करुन दिले तर त्याला कमिशन म्हणून काही रक्कम देणार आहात काय ? अन्य क्षेत्रामध्ये वसुली करणा-यांना कमिशन दिले जाते. उदा. एलआयसी एजण्टस्ना वसुलीच्या बाबतीत कमिशन दिले जाते. तशा प्रकारचे कमिशन केबल ऑपरेटर्स्ना वसुलीच्या बाबतीत दिले जाणार आहे काय ? सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या केबलच्या व्यवसायाला उद्योगाचा दर्जा देऊन केबल ऑपरेटर्स् आणि ग्राहक यांना संरक्षण द्यावे. जोपर्यन्त या व्यवसायाला उद्योगाचा दर्जा मिळत नाही तोपर्यन्त केबल ऑपरेटर्सना कोणतेही संरक्षण मिळणार नाही. मी माननीय मंत्री महोदयांना या निमित्ताने अशी विनंती करतो की, महसूल वाढविण्याच्या बाबतीत आम्ही तुमच्या बरोबर आहोत. परंतु त्यांनी हे वाढविलेले दर कमी करावेत आणि या केबल व्यवसायाला उद्योगाचा दर्जा द्यावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड, तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्रासधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक 2006 यासंबंधी मी केवळ दोन-तीन सूचना करणार आहे. केबलद्वारे दाखविण्यात येणा-या मराठी वाहिन्यांच्या संदर्भात मी या सदनामध्ये मागे औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला होता. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: मुंबईमध्ये केबलद्वारे "सह्याद्री, ई.टी.व्ही, झी मराठी, सहारा समय-मराठी" ह्या मराठी वाहिन्या दाखविल्या जातात. परंतु ह्या मराठी वाहिन्या इतक्या अस्पष्ट दिसतात की, त्या वाहिन्यांवरील मराठी कार्यक्रम पाहाणे अशक्य होते. कर्नाटक राज्यामध्ये ज्याप्रमाणे मराठी भाषेचा द्वेष केला जातो त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्येही ह्या मराठी वाहिन्यांबाबत द्वेष केला जातो की काय अशी शंका निर्माण होते. सभापती महोदय, आपल्या विधान भवन इमारतीमध्ये असलेल्या टी.व्ही.वर देखील "सह्याद्री" वाहिनीवरील कार्यक्रम नीट दिसत नाहीत. तेव्हा केबल धारकांनी मराठीच्या सर्व वाहिन्या केबल ग्राहकांना सुस्पष्टपणे दाखविल्या पाहिजेत अशा प्रकारची सूचना मी या निमित्ताने करीत आहे. धन्यवाद.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सदनामध्ये शासनाने जे बिल आणले आहे त्याबातीत मी फक्त सूचना करणार आहे. अनेक ठिकाणी आपल्याला असे दिसून येते की केबल धारक आणि मालक यांची मोनोपली आहे. दुसऱ्या केबल धारकाला त्याठिकाणी धंदा करु दिला जात नाही. केबल ऑपरेटर दादागिरीच्या पध्दतीने काम करतात आणि केबलवरुन इतर वाहिन्या न दाखविता आपल्या स्वत:च्या वाहिनीचे प्रसारण सादर करतात. झी टीव्ही, इ टीव्ही, स्टार टीव्ही यांचे प्रसारण बंद करुन स्वत:चे प्रसारण दाखविण्याचा प्रयत्न होत असतो. एकतर्फी प्रसारण केले जाते ते रोखले पाहिजे. केबल धारकाला टॅक्स बसणार नाही. टॅक्स भरतो आपण आणि प्रसारण केबल मालकाच्या दादागिरीवर चालते. इतर चॅनल्स बंद केली जातात आणि आपल्याला एखादी बातमी दाखवायची असेल तर केबल मालकाची दादागिरी चालते. ही दादागिरी रोखण्यासाठी कडक कायदा करण्यात यावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेब, माननीय सदस्य ॲड. अनिल परब आणि माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी विधेयक क्रमांक 53 वर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. ॲड.अनिल परब यांनी जो करमणूक कर लावलेला आहे तो जास्त लावलेला आहे आणि तो कमी करावा अशी मागणी केली. त्याचप्रमाणे गरीब ग्राहक आणि केबल ऑपरेटर्स म्हणून दर कमी करावेत असे सांगितले. त्याचप्रमाणे केबल ऑपरेटर्सना उद्योगाचा दर्जा द्यावा अशीही मागणी केलेली आहे. सभापती महोदय, सुरुवातीला या विधेयकावर बोलताना मी माहिती दिली होती की थेट घरपोच प्रसारण सेवेची (डीटीएच) दिनांक 1.5.2000 पासून करमणुक शुल्क आकारणी झाली. सुरुवातील या करमणुक शुल्काची आकारणी 90रु.,60रु.,आणि 30 रु. अशी होती. थेट घरपोच प्रसारण सेवेचे कनेक्शन आणि केबल कनेक्शन जोडणी आकारणी याबाबत दूर संचार नियामक प्राधिकरणाने राज्य सरकारला कळविले. त्यामुळे हे दर होते ते कमी केले. 30 रु.,20 रु. आणि 10 रु. असे केलेले होते. आता ही सूचना आल्यानंतर राज्य शासनाने हे दर एकच असले पाहिजेत आणि दोघांमध्ये फरक असता कामा नये म्हणून 45 रु., 30 रु आणि 15 रु. अशी वाढ केली. म्हणजे 50 टक्के वाढ केल्यानंतर दोघांचे दर एकच झाले फरक राहिला नाही. केबल ऑपरेटरांच्या काही तक्रारी असू शकतात आणि समस्या असू शकतात त्या जाणून घेतल्या जातील आणि त्या कार्यान्वित करण्याचा राज्य शासन नक्की प्रयत्न करील. सभापती महोदय, जे काही केबल ऑपरेटर्स असतात त्यांच्याकडून कर वसूल करीत असताना कनेक्शनची जी संख्या दाखविली जाते ती कमी दाखविली जाते. याची कारणे अनेक असू शकतात. यासंदर्भातील अपील पाहता आणि त्यानंतर केलेली पाहणी लक्षात घेतल्यानंतर सगळयाच केबल ऑपरेटर्सच्या बाबतीत असे दिसते की 5000 कनेक्शन असतील तर ती दाखविताना 2000 किंवा 2500 दाखवितात.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

दोन हजार ग्राहक असतील तर पाचशे ग्राहक दाखविले जातात. ते असे का दाखवितात हा त्यांचा प्रश्न आहे. पण इथे जो कर बुडतो त्याचा प्रश्न आहे. आज महाराष्ट्राला एंटरटेंमेंट आणि सर्व्हीस सेक्टर या दोन क्षेत्रातून कर मिळू शकतो. इलेक्ट्रॉनिक्स,गारमेंट, सूत गिरणी, इत्यादी जे उद्योग आहेत, ते कोलमडले आहेत. या उद्योगातून आपल्याला 10 ते 12 टक्के कर देखील मिळत नाही. असे उद्योग आज राज्याच्या बाहेर चालले आहेत. सर्वसामान्य नागरिकांना अडचण न होता मनोरंजन आणि सर्व्हीस सेक्टरमध्ये कर बसविण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. दहा रुपयावरून पंधरा रुपये, वीस रुपयावरून तीस रुपये आणि तीस रुपयावरून पंचेसाळीस रुपये अशा पध्दतीने दरवाढ सुचविण्यात आली आहे. पूर्वी कराच्या माध्यमातून 60 कोटी रुपये मिळत होते. ते आता या नवीन करांमुळे 40 कोटी रुपये मिळणार आहेत, तर केबल व्यावसायिकांकडून 100 कोटी रुपये मिळणार आहेत. आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या सभागृहात नेहमी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा उल्लेख करण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत असे आम्हाला देखील वाटते. शेतकऱ्यांची आर्थिकस्थिती सुधारण्यासाठी वेगवेगळया विकासाच्या योजना करणे गरजेचे आहे. अशा योजनांसाठी निधी हा लागतोच. तो कराच्या स्वरूपात गोळा करावा लागतो. या कराच्या माध्यमातून आपल्याला 40 कोटी रुपये मिळणार असलेत तरी थेंबे थेंबे तळे साचे प्रमाणे आपल्या राज्याच्या तिजोरीत निधीची भर पडणार आहे. यात दोष असेल तर आमची सिस्टीम बदलण्याची तयारी आहे. आज राज्यातील केबल ऑपरेटर कर भरत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आपल्या राज्याची लोकसंख्या 10 कोटी असून 1कोटी 70 लाख 80 हजार केबल ग्राहक असले पाहिजेत असा आमचा अंदाज आहे. पण केबल ऑपरेटर ग्राहकांची संख्या खोटी दाखवितात. तेव्हा किती ग्राहक आहेत, ते शोधण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. आपल्याला जर सिस्टीममध्ये सुधारणा व्हावयास पाहिजे, यातील समस्या दूर झाली पाहिजे असे वाटत असेल तर मला केव्हाही येऊन भेटून निवेदन द्यावे. या सिस्टीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने निश्चित प्रयत्न केले जातील.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केबल ऑपरेटरांची मोनोपॉली आहे असे सांगितले आहे. यासंबंधीच्या नियमामध्ये देखील लवकरात लवकर सुधारणा करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी मराठी वाहिन्यांवरील कार्यक्रम सुस्पष्टपणे दाखविले जात नाहीत, ते सुस्पष्ट दाखविण्यासंबंधीची सूचना केली आहे. मराठी वाहिन्यांवर अन्याय होऊ नये म्हणून केबल ऑपरेटरला जबाबदार धरले जाईल अशा प्रकारचा सूचना देण्यात येतील. राज्याच्या दृष्टीने हे अतिशय चांगले बिल आहे. ते सभागृहाने संमत करावे अशी मी विनंती करीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यता आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.नारायण राणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 53 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 53 संमत झाले आहे.

....

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्यावरील कर (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL No.LIV OF 2006

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENT ACT, 1975)

श्री.जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-54, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, 1975 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-54, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, 1975 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

महोदय, ज्यांचे उत्पन्न प्रतिमाह 800 रुपये होते त्यांना 1989 ते 1997 अशी 9 वर्षे एक्झेम्शन दिले होते. हीच मर्यादा 2000 रुपयापर्यंत 1997 मध्ये वाढविण्यात आली. ही मर्यादा 9-10 वर्षांपासून तशीच आहे. परंतु दिनांक 1 एप्रिल, 2006 पासून ती मर्यादा 2500 रुपयांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे.

महोदय, राज्यातील डॉक्टर, तांत्रिक सल्लागार, विमा एजंट, कॉन्ट्रॅक्टर, इस्टेट एजंट, कंपनी संचालक, व्यावसायिक सल्लागार, वास्तुशास्त्रज्ञ, कंपनी संचालक, व्यापारी, इ. च्या उत्पादनावर वेगवेगळया दराने कर आकारण्यात येत होते. बऱ्याच वेळा आपले उत्पन्न कमी असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत होता. ते जे उत्पन्न दाखवीत होते त्या उत्पन्नाच्या पुराव्यांना आमच्या अधिकाऱ्यांना मान्य करणे बंधनकारक होते. कमी उत्पन्न दाखविण्याचा या क्षेत्रामध्ये कल होता. त्यामुळे ही रक्कम 2500 रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. विधी सल्लागार, डॉक्टर, तांत्रिक सल्लागार, अडते इ. यांना पहिल्या दोन वर्षांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

व्यवसायाकरिता कर माफ असे. परंतु ती मर्यादा या विधेयकान्वये एका वर्षावर आली आहे. त्यामुळे यातून 50 कोटी रुपये उपलब्ध होतील असे मला वाटते. त्यामुळे माझी सदनाला विनंती आहे की, हे विधेयक मान्य करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 (अनुसूची) विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक-54 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक-54 संमत झाले आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

पृ.शी. : विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO.LI OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976)

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 51, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 51, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला या संदर्भाने आपणास काही सांगावयाचे आहे. हिंदु धर्मामध्ये कायद्याने एकच विवाह होतो. परंतु काही दिवसांपूर्वी आम्ही या संदर्भात एक प्रश्न उपस्थित केला होता. सभापती महोदय, पेण येथील गडभ नावाचा एका तरुण विजेचा शॉक लागून मरण पावला. या संदर्भात त्याला मदत म्हणून शासनातर्फे दोन लाख रुपये मंजूर झाले. परंतु त्याच्या पत्नीला वर्षभर ही मदत मिळू शकली नाही. तेव्हा या संदर्भात मी अलिबाग येथील डी.पी.डी.सी. च्या बैठकीत तेथील अधिकाऱ्यांना तसेच जिल्हाधिकाऱ्यांना विचारले असता कोणीही या संदर्भात सांगावयास तयार नव्हते. परंतु नंतर माझ्या चेंबरमध्ये येऊन त्यांनी सांगितले की, या माणसाची अजून एक पत्नी आहे आणि तिनेसुध्दा मदत मिळावी म्हणून अर्ज केला आहे. आता आम्ही काय करायचे, हा प्रश्न आमच्यासमोर आहे. शासन नियमाप्रमाणे, आम्ही फक्त कायद्याने विवाह केलेल्या पत्नीलाच मदत करु शकतो. सभापती महोदय, नंतर या संदर्भात सहानुभूतिपूर्वक निर्णय घेण्यात येऊन दोन्ही पत्नींना एक-एक लाख रुपये देण्यात आले. तरी, कदाचित अशाप्रकारचा मुद्दा जर येथे उपस्थित झाला तर काय करावे ? या संदर्भात शासनाने खुलासा करावा.

सभापती : या संदर्भात नोंद घेण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा निरोप समारंभ हे विधेयक सभागृहात मांडण्याअगोदर झाला आहे. द्विभार्या कायद्याला विरोध करणे, त्याबद्दल शंका व्यक्त करणे आणि भविष्यकाळातील आपली व्यवस्था करणे, या विषयी त्यांच्या संदर्भात सहानुभूती आहे. पण ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण कोणाचाही मृत्यू झाला की, एक लाख रुपये देतो. त्यांच्या प्रयत्नाने, त्या मृत झालेल्या व्यक्तीला दोन लाख मिळाले आणि त्याच्या दोन्ही पत्नींना एक-एक लाख रुपये देण्यात आले. सभापती महोदय, आता आपली एकच पेन्शन आहे. आता या प्रकरणी जर दोन पत्नी असतील तर आपण दोन पेन्शन देणार का ?

श्री. जयंत पाटील : या संदर्भात " द्यावे " अशी आपली सूचना आहे की, " देणार का ? " असा प्रश्न आहे. या संदर्भात मी असे सांगू इच्छितो की, " देणार का ? " याला उत्तर द्यायला वेळ लागेल आणि " द्यावे " अशी सूचना असेल तर ती इनकार्पोरेट करता येईल.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला तर असे वाटायला लागले आहे की, " दोन पत्नी " या विषयावर आता अभ्यासवर्गाची आवश्यकता आहे. सभापती महोदय, या विधेयकाचे मी स्वागत करते. काही वेळा कायदा अंमलबजावणीच्या सर्व बाजू पाहिल्या गेल्या नसतील तर त्यामध्ये नंतर दुरुस्त्या करणे आवश्यक असते.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MAP/ प्रथम श्री. कांबळे.. 17:50

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, कायद्याच्या अनुषंगाने नामनिर्देशन करण्याची सोय आहे, कुटुंबाच्या वारसास विधवा किंवा विदूर असेल तर पुढील निवृत्ती वेतन कोणाला द्यावे याबाबत ज्यांची वारसदार म्हणून नोंद केलेली आहे त्यांना ते निवृत्ती वेतन मिळेल. विधेयकाच्या पान क्रमांक 3 वरील (ग) मध्ये असे म्हटलेले आहे की, "राज्य विधानमंडळाच्या सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्यूच्या पश्चात मृत सदस्याचे अज्ञान अपत्य हयात असेल तर, अशा अज्ञान अपत्याला विहित करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, दिनांक 1 जानेवारी 2006 पासून, सदस्याच्या विधवेला किंवा विधुराला जेवढे निवृत्तीवेतन देय होते तेवढे निवृत्तीवेन देण्यात येईल." अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही आज 6 विधेयके पास केली आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी सहकार्य केल्याबद्दल मी धन्यवाद देतो. ठीक आहे, आता मी विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 51 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 51 संमत झाले आहे.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे नियम 93 च्या सूचना मी स्वीकारलेल्या नाहीत. आता नियम 93 च्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी.

पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेश टोपे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " बीड जिल्हयातील चौसाळा येथील एका महिलेला विवस्त्र करुन तिची धिंड काढल्याबाबत " या विषयावरील श्री. जयंत प्र. पाटील व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी केलेल्या निवेदनाच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापण्यात यावी)

यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी माननीय वित्तमंत्री यांचे निवेदन

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंबंधी आपण निदेश दिल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : सोबत जोडलेले निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल□वेधी सूच□ा

पृ. शी. : मद्यधुंद अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी बोगस पोलिसाच्या गणेवशामध्ये करण्यात आलेला गैरप्रकार

मु. शी :मद्यधुंद अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी बोगस पोलिसाच्या गणेवशामध्ये करण्यात आलेला गैरप्रकार यासंबंधी स□मा□□ीय सदस्य सर्वश्री. विलास अवचट, प्रमोद नवलकर यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : अध्य□ महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वजा□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय उप मुख्यमंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ □रावे, अशी वि□ती □रतो.

"दिनांक 31 डिसेंबर, 2005 रोजी नववर्षाच्या स्वागतासाठी रुपम स्टोर्सचे मालक श्री. विरेन शाह यांनी माधूरी अपार्टमेंट, वरळी, मुंबई येथे आयोजित केलेल्या पार्टीमध्ये त्यांच्या मित्राने पोलिस नसतानाही बोगस पोलिस म्हणून खाकी गणवेशात सार्वजनिक ठिकाणी उपस्थित राहून मद्यधुंद अवस्थेत गैरप्रकार केल्याबाबतची घटना दिनांक 17 जानेवारी, 2006 रोजीच्या दरम्यान उघडकीस येणे, याबाबत आमदार श्री. प्रमोद नवलकर यांनी वरळी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करुनपही संबंधितांवर अद्यापही कारवाई न होणे, या प्रकरणी पोलिसांचे संबंधित रुपम स्टोर्सचे मालक यांचेशी असलेले संबंध, लोकप्रतिनिधीनी केलेल्या गंभीर तक्रारीवर देखील पोलिसांकडून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत होत असलेला विलंब व टाळाटाळ, यामुळे शासकीय यंत्रणेचा गैरवापर करण्याच्या वाढीस लागलेल्या अपप्रवृत्ती, तसेचा याबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेले संशयाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, परिणामी पोलिसांची जनमानसातील बिघडत असलेली प्रतिमा, तसेच त्यांच्या कर्तव्य दक्षतेबद्यल निर्माण झालेला प्रश्न, याबाबत शासनाने संबंधितांवरस केलेली कारवाई व प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील (गृहमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, गेल्या आठवडयात या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी आपणाकडे एक सी.डी. दिली होती. आणि त्या सी.डी. मध्ये काय आहे याबाबत त्यांनी सभागृहामध्ये माहिती सांगितली होती. माझा याबाबत एकच प्रश्न असा आहे की, ज्या सोसायटीच्या बाबतीत आक्षेप घेण्यात आला होता त्या सोसायटीमध्ये श्री. हर्षद शहा आणि श्री. डी. वाय. पाटील यांच्यासारखे दिग्गज राहात आहेत. तेथील एकेका सदनिकेची किंमत 20 ते 25 कोटी रुपये इतकी आहे. 31 डिसेंबरच्या मध्यरात्री नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी "नो टू ड्रग्ज" नावाचा एक कार्यक्रम जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आला होता. वास्तविक पहाता त्या इमारतीमध्ये राहणाऱ्या सुसंस्कृत, सुशिक्षित लोकांची नावे मी घेतली आहेत, अशा मंडळींनी अशाप्रकारच्या जनजागृतीचा कार्यक्रम करण्याचे प्रयोजन काय होते? हे मी समजू शकत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, खरोखर त्या ठिकाणी पोलिसांनी तपास केला काय? सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवकर यांनी घेतलेला आक्षेप पहाता या निवेदनामध्ये विसंगती दिसते. त्यामुळे निश्चितपणे पोलिसांनी दिलेला अहवाल आम्हाला अमान्य आहे. त्यासंबंधी शासनाने निवेदन करावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये सर्वच गोष्टींचा उल्लेख केला आहे. 31 डिसेंबर रोजी मनोरंजनासाठी त्याठिकाणी एक पार्टी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी "से नो टु ड्रग्ज" नावाच्या कार्यक्रमाचे फलक, पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात आले होते. त्यावेळी रिमिक्स म्हणून पोलिसांच्या वेशामध्ये एक पोलीस पार्टीमध्ये येतो व तेथील लोकांची त्याने झडती घेतल्याचे नाटक करतो. आणि त्यावेळी असे घोषित केले जाते की, कुणीही जवळ ड्रग्ज बाळगले तर पोलीस त्याची झडती घेऊ शकतात. या संदर्भात अशाप्रकारे पोलिसांचा गणवेश घालणे म्हणजे इंडियन पिनल कोड 117 प्रमाणे गुन्हा ठरतो कां याबाबत वकिलांचा सल्ला घेण्यात येत असून तशाप्रकारचा अभिप्राय वकिलांनी दिल्यानंतर गुन्हा नोंद करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत पदोन्नती देण्यासंबंधी केलेली शिफारस

मु. शी : इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत पदोन्नती देण्यासंबंधी केलेली शिफारस यासंबंधी स□मा□□ीय सदस्य सर्वश्री. सुधाकर गणगणे, रमेश निकोसे, वसंतराव खोटरे, पांडुरंग फुंडकर, संजय दत्त, जयंत पाटील, रामदास तडस, जितेंद्र आव्हाड, नतिकोद्दीन खतिब, डॉ. एम. ए. अझिज, प्रा. फौजीया खान, श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद, वि.प.स.यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : अध्य□ महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□वये पुढील तातडीच्या व सार्वज□□ महत्वाच्या बाबी□ डे स□मा□□ीय मुख्य मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ □रावे, अशी वि□ती □रतो.

" राज्यात इतर मागासवर्गीय प्रवर्गातील शासकीय कर्मचारी व अधिकारी यांची शासकीय सेवेत एकोणीस टक्के संख्या असून त्यांना इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या आधारे शासकीय सेवेत घेण्यात येणे, मात्र त्यांना उक्त प्रवर्गाच्या आधारे शासकीय नोकरीत पदोन्नती देण्यात न येणे, शासनाने दिनांक 25 मे, 2004 रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार इतर मागासवर्गीय प्रवर्गास पदोन्नतीसाठी जाणीवपूर्वक वगळण्यात आल्यानंतर यासंदर्भात सभागृहात अनेकदा चर्चा होवून उक्त चर्चेच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार या बाबीवर उपसमिती नियुक्त होवून सदर उपसमितीने एकोणीस टक्के इतर मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत पदोन्नती देण्याची शिफारस करुन देखील सदर शिफारशीचा शासनाने अद्यापही विचार न करणे, याबाबत शासनाने इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची केलेली उपेक्षा व त्यामुळे या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांत निर्माण झालेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची भुमिका."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या □वेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी हे □वेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : □वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे □वेद□ छापावे.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, राज्यातील जवळ जवळ 5 लाख ओ.बी.सी. कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा प्रश्न गेल्या दोन वर्षापासून सातत्याने प्रलंबित आहे. मंत्रिमहोदयांनी केलेल्या निवेदनामध्ये मंत्रिमंडळाने नेमलेल्या उपसमितीने यासंदर्भात शिफारस केल्याचे म्हटले आहे. ही शिफारस होऊन दोन महिने झाले तरी अजून त्यासंबंधी निर्णय होत नाही. या संबंधी निर्णय होण्यास आणखी किती कालावधी लागणार आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, दोन महिन्यात निर्णय घेतला जाईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, शिफारस होऊन दोन महिने होऊन गेले. तेव्हा कमीत कमी एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्हयातील पडीक जमिनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याबाबत प्रलंबित असलेले प्रस्ताव

मु. शी : ठाणे जिल्हयातील पडीक जमिनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याबाबत प्रलंबित असलेले प्रस्ताव यासंबंधी स□मा□□ीय सदस्य श्री. रमेश निकोसे, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, जितेंद्र आव्हाड, दिवाकर रावते,श्रीकांत जोशी, वि.प.स. यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वजा□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय मुख्यमंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ □रावे, अशी वि□ती □रतो.

" मुंबई हे उद्योगधंद्याच्या दृष्टीने अग्रेसर असून या महानगरात उद्योगधंद्यासाठी जमीन शिल्लक राहिलेली नसल्याची वस्तुस्थिती, मुंबई शहरात देशाच्या कानाकोपऱ्यातून रोज हजारो लोक उद्योग धंद्यासाठी येणे, मात्र या शहरातील कारखाने व मिलच्या जमीनी विकल्यामुळे दिवसेंदिवस उद्योगधंदे बंद होत असल्याचे आढळून येणे, यामुळे सुशिक्षित बेरोजगार यांचेवर कोसळलेली बेकारीची कुऱ्हाड, यामुळे दिवसेंदिवस वाढत असलेली बेकारी, ठाणे जिल्हा, वसई-बिरे-बापने व विरार या ठिकाणी असलेल्या ७० हेक्टर पहाडी, पडीक व पठारी जमीनीवर कोणतेही पीक होणार नसल्याचे दिसून येणे, या जमीनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याकरीता स्थानिक जमीन मालकांनी संचालक नगर रचना पुणे यांचेकडे अर्ज करणे, मात्र सदर अर्जावर शिफारस करुन सदर प्रस्ताव नगरविकास मंत्री यांचेकडे पाठविणे, मात्र सदर प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे आढळून येणे, सदर जमीनीवर नविन उद्योगधंदे सुरु करण्यास परवानगी दिल्यास राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊन बेकारी कमी होण्यास मदत होईल, याबाबत शासनाने ठाणे जिल्हा वसई,बिरे-बापणे व विरार येथील ७० हेक्टर पडीक, पहाडी व पठारी जमीनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याची परवानगी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ठा□जिल्हा, वसई-बिरे-बापने व विरार या ठिकाणच्या पडीक जमिनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याची परवानगी देण्याबाबत

मु.शी. : ठा□जिल्हा, वसई-बिरे-बापने व विरार या ठिकाणच्या पडीक जमिनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याची परवानगी देण्याबाबत श्री.रमेश निकोसे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, जितेंद्र आव्हाड, दिवाकर रावते, श्रीकांत जोशी वि.प.स. यां□ दिलेली ल□वेधी सूच□.

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई हे उद्योगधंद्याच्या दृष्टीने अग्रेसर असून या महानगरात उद्योगधंद्यासाठी जमीन शिल्लक राहिलेली नसल्याची वस्तुस्थिती, मुंबई शहरात देशाच्या कानाकोपऱ्यातून रोज हजारो लोक उद्योग धंद्यासाठी येणे, मात्र या शहरातील कारखाने व मिलच्या जमीनी विकल्यामुळे दिवसेंदिवस उद्योगधंदे बंद होत असल्याचे आढळून येणे, यामुळे सुशिक्षित बेरोजगार यांचेवर कोसळलेली बेकारीची कुऱ्हाड, यामुळे दिवसेंदिवस वाढत असलेली बेकारी, ठाणे जिल्हा, वसई-बिरे-बापने व विरार या ठिकाणी असलेल्या 70 हेक्टर पहाडी, पडीक व पठारी जमीनीवर कोणतेही पीक होणार नसल्याचे दिसून येणे, या जमीनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याकरीता स्थानिक जमीन मालकांनी संचालक नगर रचना पुणे यांचेकडे अर्ज करणे, मात्र सदर अर्जावर शिफारस करुन सदर प्रस्ताव नगरविकास मंत्री यांचेकडे पाठविणे, मात्र सदर प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे आढळून येणे, सदर जमीनीवर नविन उद्योगधंदे सुरु करण्यास परवानगी दिल्यास राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊन बेकारी कमी होण्यास मदत होईल, याबाबत शासनाने ठाणे जिल्हा वसई,बिरे-बापणे व विरार येथील 70 हेक्टर पडीक, पहाडी व पठारी जमीनीवर नवीन उद्योगधंदे सुरु करण्याची परवानगी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ DD/ MHM/ KGS/ MAP/

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाचया प्रती माननीय सदसयांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ DD/ MHM/ KGS/ MAP/

श्री.रमेश [illegible]से : सभापती महोदय, मुंबईमधील [illegible]र[illegible]आ[illegible] उद्यो[illegible] बंद पडलेले आहेत. ठा[illegible] जिल्ह्यातील वसई आ[illegible] विरार या ठि[illegible] शेत[illegible]यांची पडी[illegible] जमी[illegible] आहे. उद्यो[illegible] सुरु [illegible]रावेत म्हू[illegible] स्था[illegible] जमी[illegible] माल[illegible] संचाल[illegible] [illegible]र रच[illegible], पु[illegible] यांच्या[illegible]डे अर्ज [illegible]लेले आहेत. या संदर्भतील परवा[illegible] [illegible]ती दिवसात दे[illegible]यात येईल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, वसई विरार रिझ[illegible]न डेव्हलपमेंट प्लॅ[illegible] मंजूर झाल्या[illegible]र त्या अनुषंगाने इंडस्ट्रीयल झो[illegible]या [illegible]य घे[illegible]यात येईल.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ DD/ MHM/ KGS/ MAP/

पृ. शी. : ठाणे महापालिकेतील मागासवर्गीय अधिकारी-कर्मचाऱ्यांवर प्रशासनाकडून होत असलेला अन्याय.

मु. शी : ठाणे महापालिकेतील मागासवर्गीय अधिकारी-कर्मचाऱ्यांवर प्रशासनाकडून होत असलेला अन्याय,यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, जगन्नाथ शेवाळे, लक्ष्मण जगताप, प्रा.फौजिया खान, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सदाशिवराव पोळ, राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जितेंद्र आव्हाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे महापालिकेतील मागासवर्गीय धिकारी/कर्मचाऱ्यांवर प्रशासनाकडून अद्यापही होत असलेले अन्याय, अत्याचार, आस्थापना/कार्मिक विभागाकडून घेण्यात येत असलेली दडपशाहीची भुमिका, जवळच्या अधिकारी/कर्मऱ्यांची सोयीच्या ठिकाणी करण्यात येत असलेल्या नियुक्त्या, महापालिकेच्या शिक्षण विभागातील माध्यमिक शिक्षिका सौ.दत्तु भगत या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासन घेत असलेली अन्यायी भुमिका, बालवाडी विभागामध्ये सन 1980 पासून कार्यरत असलेल्या प्रथम महापौर पुरस्कार विजेत्या शिक्षिका सौ.भगत यांनी बी.एड. ही शैक्षणिक उच्च अर्हता धारण केल्यानंतर त्यांची सेवा माध्यमिक विभागाकडे सन 2001 मध्ये वर्ग करुनही माध्यमिक विभागाकडील सोयीसुविधा पुर्वलक्षीप्रमाणे देण्यास होत असलेली दिरंगाई, माध्यमिक विभागाकडे सुमारे पाच वर्षापासून काम करीत असतांना व सदर कालावधीत माध्यमिक विभागाकडे शिक्षकांची केलेली भरती, खुल्या वर्गात जागा शिल्लक असतांना सदर जागेवर मागावसर्गीयाची नियुक्ती करता येत असतांनाही मागासवर्गीय संवर्गातून सौ.भगत ह्या अतिरिक्त शिक्षिका होत असल्याचा कार्मिक विभागाने फेब्रुवारी, 2006 मध्ये दिलेला धक्कादायक निर्णय, त्यांनी न मागता दिलेल्या वेतनश्रेणीचा फरक वसुल केला जाणे, याप्रकरणी महापालिका प्रशासनाच्या निदर्शास वेळोवेळी आणून दिलेली धक्कादायक बाब, याप्रकरणी त्वरीत कारवाई व्हावी यासाठी सौ.भगत तसेच महापालिका मागासवर्गीय कर्मचारी संघटनेने जानेवारी/फेब्रुवारी, 2006 रोजी तसेच अनेकदा निवेदनाद्वारे मागणी करुनही सौ.भगत यांना न्याय देण्यास होत असलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड (पुढे सुरु....

दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी महापालिकेतील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षकांची बेकायदेशीररित्या केलेल्या भरतीमुळे अनेक शिक्षक अतिरिक्त झाल्याप्रकरणी सखोल चौकशी होऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे, सौ.भगत या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर होत असलेला अन्याय दूर होणेसाठी शासनाने हस्तक्षेप करुन त्वरीत कार्यात्मक कार्यवाही करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठा□ महा□□□रपालि□मधील बालवाडी विभा□मध्ये 1980 पासू□ □र्यरत असलेल्या सौ.भ□म यां□ बी.एड. ही शै□णिक उच्च अर्हता धार□ □ल्या□र त्यांची सेवा माध्यमि□ विभागा□डे 1981 मध्ये व□ □रु□ही त्यां□ सोयी-सुविधा उपलब्ध □रु□ देण्याची महा□□□रपालि□ची जबाबदारी आहे. सौ.भगत या पाच वर्षे शि□□ म्हू□□ □म □रीत आहेत. □वळ अ□सूचित जातीची जा□ शिल्ल□ □ही, म्हू□ त्यां□ घे□यात येत □ही. त्या ठि□□ त्या पाच वर्षे □म □रीत आहे. एस.टी.मध्ये □ा □ुल्या प्रव□मध्ये जा□ शिल्ल□ असतील तर त्यामध्ये त्यां□ घे□यात यावे, यासंबंधा□ शास□□ स्पष्ट उत्तर द्यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, त्या ठि□□ अ□सूचित जातीच्या जास्तीच्या जा□ भरलेल्या आहेत. एस.टी.मध्ये दो□ जा□ शिल्ल□ आहेत. सौ.भ□म यां□ शि□□ची पात्रता पू□ □लेली आहे. ज्यावेळेस अ□सूचित जातीच्या जा□ भरावयाच्या असतील त्यावेळेस त्यांच्याबाबतीत □श्चित प्र□रे □□य घे□यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ DD/ MHM/ KGS/ MAP/

पृ.शी. : नांदेडच्या पाटबंधारे नगरातील श्री.लक्ष्मणराव राजकोंडवार यांच्या निवासस्थानी बॉम्बस्फोट होऊन दोन युवकांचा झालेला मृत्यू.

मु.शी. : नांदेडच्या पाटबंधारे नगरातील श्री.लक्ष्मणराव राजकोंडवार यांच्या निवासस्थानी बॉम्बस्फोट होऊन दोन युवकांचा झालेला मृत्यू, याबाबत प्रा.फोजिया खान, सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, मुझफ्फर हुसेन, संजय दत्त, एम.ए.अझिज, राजेंद्र जैन, धोंडीराम राठोड, वसंतराव चव्हाण, नरेंद्र दीक्षित, नतिब,सुरेशदादा देशमुख, अब्दुल सत्तार अब्दुल खान, सर्वश्री वसंत पवार, रमेश गिरकसे, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.धनाजी साठे, श्रीमती सुधा जोशी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक 5 एप्रिल, 2006 रोजी नांदेडच्या पाटबंधारे नगरातील लक्ष्मणराव राजकोंडवार यांच्या निवासस्थानी बॉम्बस्फोट होवून त्यात दोन युवकांचा मृत्यू होणे, मृतांपैकी हिमांशु पांडे हा बॉम्ब निर्मितीचा मास्टर माईंड मानले जाणे या बॉम्ब स्फोटाचे धागेदोरे अद्याप तपास न लागलेल्या परभणी आणि पूर्णा येथे झालेल्या बॉम्ब स्फोटाशी जुळत असल्याचेही पोलीस तपासात आढळणे, सदरची घटना गंभीर असल्याचेही पोलीस तपासात आढळणे, सदरची घटना गंभीर असून या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची व दोषींवर कडक कार्यवाही करण्याची तातडीची निकड, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री,गृह) : सभापती महोदय, लखवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाचया प्रती माननीय सदसयांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ DD/ MHM/ KGS/ MAP/

प्रा. फौजिया खान : माननीय सभापति महोदय, यहां पर जो उत्तर प्राप्त हुआ है, उसमें बहुत विसंगति है. इसके पहले और दूसरे भाग को देखकर यह बात मालूम पड़ती है. यहां पर बहुत कन्फयूजन है. परभणी, जालना और दिल्ली की जामा मस्जिद में जो ब्लास्ट किए गए, उनके क्रिमिनल्स को अभी तक नहीं पकड़ा गया है. उनके क्रिमिनल्स अभी अन-डिटेक्टेड हैं. यह बहुत बड़े मॅग्नीटयूड का क्राइम है. इसका बहुत बड़ा नेटवर्क है. यहां पर बताया गया है कि ये फायर क्रेकर्स थे. यदि क्रेकर्स होते तो उसका साउंड रिपीट होता. उसके रेपर्स भी होते. उनको एक ही दिन में पी.सी.आर. मिल जाता है. राहूल पांडे पुसद में अरेस्ट किया गया. वह वहां पर क्यों भाग कर गया ? मेरा कहना है कि इसके इन्वेस्टीगेशन का स्कोप ब्रॉड करना पड़ेगा तो ही इस प्रश्न को न्याय मिल सकता है. मेरी मांग है कि इसका इन्वेस्टीगेशन सी.बी.आय. से कराया जाना चाहिए, क्योंकि इसका नेशन वाइड इम्पलीकेशन है. इस प्रश्न को गंभीरता से लिया जाना चाहिए. मेरा यह भी कहना है कि बजरंग दल और उसकी सिस्टर कन्सर्न्स को बॅन किया जाना चाहिए.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, राज्याच्या बाहेर याचे काही नेटवर्क आहे असे तपासामध्ये निष्पन्न झालेले नाही. पोलीस यासंदर्भात गांभीर्याने तपास करीत आहेत. मुख्य आरोपी अजूनही हॉस्पिटलमध्ये आहेत. त्यांची प्रकृती गंभीर आहे त्यामळे तपास कामामध्ये व्यत्यय येत आहे. तरी सुध्दा हा तपास पोलिसांनीच लावला हे लक्षात घेतले पाहिजे. स्फोट झाला त्यावेळी घराची इ-ाडती घेऊन बॉम्ब शोधून काढण्याचे काम पोलिसांनी केले. 15 लोकांना अटक केलेली आहे. त्या आरोपींची प्रकृती दुरुस्त होऊन ते हॉस्पिटलमधून बाहेर आल्यावर तपासाला सुरुवात करुन सर्व माहिती मिळवण्यात येईल. परभणी, जालना या ठिकाणी जे स्फोट झाले होते त्यांचा याच्याशी काही संबंध आहे काय ? हे तपासण्याचे काम चालू आहे. परभणीमध्ये झालेल्या स्फोटात आणि या ठिकाणी झालेल्या स्फोटात काही साम्य आहे. काही गोळ्या सारख्याच प्रकारच्या आढळून आल्या आहेत. कदाचित परभणीचा स्फोट सुध्दा यांनीच केलेला असू शकतो. याबाबतीत तपास सुरु आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : याची सीबीआय चौकशी झाली पाहिजे. या प्रकरणात आरोपींना संरक्षण देण्याचा प्रयत्न होत आहे.

सभापती : लक्षवेधी सूचनेवर मी एक-एक प्रश्न विचारण्यास परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. यानंतर पुढची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शहादा, जि. नंदुरबार येथील व्यापारी श्री. जैन यांना बोगस बियाणे प्रकरणी करण्यात आलेली अटक.

मु. शी. : शहारा, जि. नंदुरबार येथील व्यापारी श्री. जैन यांना बोगस बियाणे प्रकरणी करण्यात आलेली अटक यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, धनाजी साठे व रामदास तडस, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शहादा, जि. नंदुरबार येथील व्यापारी श्री. जैन यांचेविरुद्ध बोगस बियाणे प्रकरणी कुठलाही पुरावा नसताना दबावाखाली त्यांना दिनांक 12 मार्च, 2006 रोजी वा त्या दरम्यान अटक करण्यात येणे, यामुळे व्यापारी व शेतकरी यांचेमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा नंदुरबार जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. दिपक पाटील यांनी मध्यस्थी करण्याकरिता शहादा येथील पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री. बी.एस.बागुल यांच्याशी संपर्क साधला असता फौजदार बागुल यांनी पाटील यांच्याशी अरेरावीची भाषा वापरणे व त्यांचा अपमान करण्यात येणे, हे सर्व संभाषण तहसीलदार श्री. अभिजित भांडे यांनाही एका वेगळ्या मोबाईलद्वारे ऐकविण्यात येणे, लोकप्रतिनिधींना अरेरावीची भाषा वापरुन अपमानित केल्यामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेली संतापाची भावना, पोलीस उपनिरीक्षक यांच्या वागण्यावरुन शहराची शांतता धोक्यात येवून तणावाची परिस्थिती निर्माण होणे, त्यामुळे व्यापारी व शेतकरी यांचेमध्ये पोलीसांबाबत निर्माण झालेली संतापाची भावना, यामुळे संपूर्ण गाव बंद करण्यात येणे व संबंधित पोलीस निरीक्षकाला तात्काळ निलंबित करण्याबाबत व्यापारी व शेतकरी यांनी आंदोलन छेडण्याचा दिलेला इशारा, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, एखाद्या पोलीस उपनिरीक्षकाने लोकप्रतिनिधीचा अपमान किती करावयाचा यालाही काही मर्यादा असली पाहिजे. लोकप्रतिनिधींशी अरेरावीची भाषा करणाऱ्या या पोलीस उपनिरीक्षकाने एका तक्रारीच्या आधारावर एका व्यापाऱ्याला त्यांच्या पोलीस स्टेशनमध्ये आणले आणि त्या ठिकाणी त्याला पाच तास बसवले. 50 हजार रुपये द्या नाही तर तुम्हाला आत टाकतो अशा प्रकारची त्यांनी मागणी केली. नंदुरबार जिल्हापरिषदेचे उपाध्यक्ष तथा शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हे त्या व्यापाऱ्यासह पोलीस स्टेशनला गेल्यानंतर, तुम्ही लोकप्रतिनिधी कसे निवडून येता हे मला माहीत आहे, तुम्ही माझ्या बदलीव्यतिरिक्त काहीच करु शकत नाही असे ते म्हणाले. त्यांनी एवढी खालच्या स्तरावरची वागणूक दिली की, ते मी या ठिकाणी व्यक्त करु शकत नाही. तहसिलदारांनी जिल्हाधिकारी आणि एस.पी. यांच्याकडे रिपोर्ट पाठविला आहे. त्याला शासन तात्काळ निलंबित करणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, 17 शेतकऱ्यांनी तक्रार केली होती. त्यांना हरभऱ्याचे जे बियाणे दिले होते त्याला चार महिन्यानंतरही घाटे आले नाही. त्यामुळे व्यापाऱ्याने आमची फसवणूक केली अशी तक्रार 17 शेतकऱ्यांनी केली होती. शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. बियाणे विकण्याचा कोणताही परवाना या व्यापाऱ्याकडे नाही. आज व्यापाऱ्याने हात वर केलेले आहेत. ते हरभरे खाण्यासाठी नेले होते, ते बियाणे म्हणून विकले नव्हते असे त्यांनी सांगितले. जूनमध्ये पाऊस पडल्यानंतर शेतकरी ते खरेदी करतो त्यावेळी लग्नाचा सिझन नसतो. पावसाळ्यामध्ये बियाणे म्हणून पेरण्यासाठीच ते नेले होते. यामध्ये एका बाजूने शेतकऱ्यांची फसवणूक आहे. संबंधित दुकानदाराला बोलवल्यानंतर पोलिसांना त्यांचे काम करु द्यावयास पाहिजे. प्रत्येक ठिकाणी तपास कामासाठी का बोलविले ? अशी लोकप्रतिनिधी पोलिसांना विचारणा करावयास लागले तर हाही पोलिसांच्या कामामध्ये हस्तक्षेप ठरतो. तपास कामामध्ये असा हस्तक्षेप करता उपयोगाचे नाही. तरी सुध्दा एक लोकप्रतिनिधी आणि सन्माननीय सदस्य सांगत आहेत म्हणून या संपूर्ण घटनेचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बेकायदा रिक्षांचा मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली येथे झालेला सुळसुळाट.

मु. शी. : बेकायदा रिक्षांचा मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली येथे झालेला सुळसुळाट यासंबंधी श्री. अनंत तरे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाने जून, 1998 मध्ये रिक्षांना परवाने देणे बंद केले असतांनाही परमिटविना रिक्षा लायसन्स आणि बॅचविना चालक, कागदपत्रे नाही अशा बेकायदा रिक्षांचा मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली येथे झालेला सुळसुळाट, बेकायदा रिक्षांच्या प्रचंड संख्येमुळे त्यांची दादागिरीही प्रवाशांना मोठया प्रमाणावर सहन करावी लागणे, अवाजवी भाडे आकारणे, भाड्याला नकार देणे, प्रसंगी प्रवाशांना संघटितपणे मारहाण करणे असे प्रकार वारंवार घडणे, यामुळे अधिकृत रिक्षाचा त्यांच्या रोजगारावरही परिणाम होणे, अशा बेकायदा रिक्षांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. धर्मरावबाब आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, राज्य शासनाने जून, 1998 मध्ये रिक्षांना परवाने देणे बंद केले असतानाही परमिटविना रिक्षा लायसन्स आणि बॅचविना चालक, कागदपत्रे नाही अशा बेकायदा रिक्षा मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नांदेड आणि राज्यभर आहेत. माझ्या लक्षवेधी सूचनेच्या त्यासंदर्भातील उत्तर या निवेदनामध्ये देण्यात आलेले नाही. परमिटविना रिक्षा लायसन्स आणि बॅचविना चालक, कागदपत्रे नाहीत अशा ज्या रिक्षा महाराष्ट्रातील शहराशहरांमध्ये आहेत त्या रिक्षांवर कारवाई करणार काय ? हा प्रश्न आर.टी.ओ. चा आहे पण तो ट्राफीक पोलिसांकडे ढकललेला आहे. यामध्ये आर.टी.ओ. खात्याला कामाला लावणार काय ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सजेशन फॉर ॲक्शन. संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये विनापरवाना ज्या अवैध रिक्षा आणि टॅक्सीज असतील त्याबाबतीत संपूर्ण चौकशी करावी आणि अशा बोगस रिक्षा आणि टॅक्सीजच्या बाबतीत कारवाई करावी असे आर.टी.ओ.ला सांगण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची अपोलो टायर्स कंपनीने टायर्स विक्रीमध्ये केलेली फसवणूक

मृ.शी. : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची अपोलो टायर्स कंपनीने टायर्स विक्रीमध्ये केलेली फसवणूक यासंबंधी श्री. मधुकर चव्हाण व विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे समाजकल्याण परिवहन मंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अपोलो टायर्स या कंपनीकडून खरेदी केलेले टायर्स प्रती टायर 6000 किलोमीटर कमी चालणे, यामुळे सुमारे 1 कोटी 16 लाख 41 हजार रुपयांचे राज्य परिवहन महामंडळाचे नुकसान होणे, याबाबत महामंडळाचे प्रतिनिधी व अपोलो टायर्स कंपनीच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा होऊन 6 सप्टेंबर 2000 रोजी दिलेल्या पत्रानुसार 7.5 टक्के सूट देण्याचे कबूल करणे, राज्य परिवहन महामंडळाचे माजी व्यवस्थापकीय संचालक यांनी अपोलो टायर्स या कंपनीने दुय्यम दर्जाचे टायर्स देऊन महामंडळाची फसवणूक केल्याचे लक्षात आणून देणे, अपोलो टायर्सची दाव्यापोटी कपात केलेली रक्कम परत करण्यात येऊ नये यासाठी स्पष्टपणे आदेश देणे, असे असतानाही या माजी व्यवस्थापकीय संचालकानंतरच्या नवीन व्यवस्थापकीय संचालकांनी अभियांत्रिकी खात्यास अपोलो टायर्सचे पैसे परत करण्याबाबत टिप्पणी सादर करण्यास सांगणे, जून 2005 च्या निविदा व भांडाराच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर करुन घेऊन 1 कोटी चार लाख 77 हजार 116 रुपये रक्कम अपोलो टायर्स या कंपनीने महामंडळाची फसवणूक केलेली असतानासुध्दा त्यांना परत अपोलो टायर्स कंपनीच्या फायद्यासाठी महामंडळाने नुकसान करण्याचा संशयास्पद निर्णय घेणे, यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला शासनाबद्दलचा असंतोष व यावर शासनाची प्रतिक्रिया व शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम :(परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : हे अतिशय गंभीर प्रकारण आहे. शासनाचे हे आय.ए.एस. अधिकारी महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी जातात त्या त्या ठिकाणी ते शासनाचे नुकसान करतात. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने "अपोलो एक्सप्रेस टायर्स" अपोलो टायर्स कंपनीकडून खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु अपोलो टायर्स कंपनीने "अमर प्लस" या ब्रॅण्डचे टायर्स पुरविले. याबाबत तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.सतबीर सिंग यांनी सर्वसाधारणपणे 1 कोटी चार लाख 77 हजार 116 रुपये अपोलो टायर्स् कंपनीला देण्यात येऊ नयेत असे सांगितले. कंपनीने आपली चूक मान्य केली. तसेच 7.5 टक्के सूट देण्याचेही कंपनीने कबूल केले. परंतु नंतर श्री. खोब्रागडे, व्यवस्थापकीय संचालक यांनी 16 जूनला आदेश दिले. त्यानंतर 18 जूनला जबरदस्तीने प्रस्ताव करण्यात आला. या टायर्स खरेदी प्रकरणी 1 कोटी 4 लाख 77 हजार 116 रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे. तेव्हा या प्रकरणी चौकशी करुन तसेच संबंधितांना बडतर्फ करुन 15 दिवसात या संबंधीचा अहवाल सादर करण्यात येईल काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : जे सेक्रेटरी होते त्यांच्या अध्यक्षतेखाली हा ठराव झालेला आहे. या सर्व खरेदी व्यवहारामध्ये इतरही खरेदी झालेली आहे. ही खरेदी परस्पर केली जात असल्यामुळे त्याबाबतची माहिती शासनाला नसते. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी मार्फत चौकशी करण्यास सांगण्यात येईल.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, माळशिर, दक्षिण सोलापूर भागातील 15 अनुदानित शाळामध्ील पूरग्रस्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना अग्रिम वेतन न मिळणे

मु. शी : सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, माळशिर, दक्षिण सोलापूर भागातील 15 अनुदानित शाळामध्ील पूरग्रस्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना अग्रिम वेतन न मिळणे यासंबंधी श्री. रामनाथ मोते, डॉ. अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर व श्री. प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पूरग्रस्त शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना सहानुभूतिपोटी मदत करण्यासाठी तीन महिन्यांचे अग्रिम वेतन देण्याचा निर्णय घेणे, अग्रिम देण्याची सवलत/योजना अनुदानित संस्थामधील शिक्षक/शिक्षकेतरांना लागू असणे, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, माळशिरस, दक्षिण सोलापूर भागातील सुमारे 15 अनुदानित शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतरांचे अग्रिम देयक सुमारे रुपये 15,91,304 वेतन पथकाने जिल्हा कोषागार अधिकारी यांचेकडे दिनांक 27 डिसेंबर 2005 रोजी सादर करणे, वेतन पथकाच्या देयकावर जिल्हा कोषागार अधिकारी यांनी आक्षेप घेऊन देयक मुदत संपल्यानंतर दिनांक 2 जानेवारी 2006 रोजी परत करणे, वेतन पथकाने त्यानंतर दोन वेळा देयक सादर करणे व कोषागार कार्यालयाने पुन्हा परत पाठविणे, अन्य शाळांचे दिनांक 2 जानेवारी 2006 रोजी सादर झालेले 5,97,759 रुपयांचे देयक मंजूर करणे, देयक मंजूर करण्यासाठी कोषागार कार्यालयात पैशाची मागणी करणे, पूरग्रस्तांना अग्रिम न मिळणे, कोषागार अधिकारी, सोलापूर यांनी जाणीवपूर्वक देयक नामंजूर करणे, याबाबत शिक्षकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (अर्थ व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....7 ....

अशुद्धीकरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यातील 15 अनुदानित शाळांतील पूरग्रस्त शिक्षक/शिक्षकेतरांना अग्रिम वेतन मिळण्यासंबंधीचा प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. पूरग्रस्त शिक्षक/शिक्षकेतरांना तीन महिन्यांचे अग्रिम वेतन देण्यासंबंधीचा निर्णय शासनाने घेतलेला होता. त्या शिक्षकांनी त्या त्या शाळांमध्ये अग्रिम वेतन मिळण्यासंबंधी अर्ज कल्यानंतर त्या शाळांनी अग्रिम वेतनाची देयके तयार करुन ती दिनांक 28 डिसेंबर 2005ला ट्रेझरीला सादर केली. ट्रेझरीकडून सदरहू देयकाच्या संदर्भात आक्षेप घेण्यात आले. अग्रिम देण्याची मुदत 31 डिसेंबर 2005 पर्यन्त होती. या 15 शाळांतील पूरग्रस्त शिक्षकांची देयके ट्रेझरीने 2 जानेवारी 2006ला परत केली. परिणामी 15 शाळांतील पूरग्रस्त शिक्षकांना वेतन अग्रिम मूळ शकले नाही. परंतु त्यानंतर 2 जानेवारीला ज्या शाळांनी अशा प्रकारची देयके ट्रेझरीला सादर केली त्यांची देयके मात्र मंजूर करण्यात आली. 15 शाळांतील पूरग्रस्त शिक्षकांची देयक वेतन पथकाने ट्रेझेरीला तीन वेळा सादर केलेली असतानासुध्दा त्यांना अग्रिम वेतन मिळाले नाही. या 15 शाळांतील पूरग्रस्त शिक्षकांनी त्रुटींची पूर्तता केलेली आहे. शासनाने शासकी अधिकारी व कर्मचा-यांना सहानुभूतिपोटी मदत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तेव्हा या 15 शाळांतील शिक्षकांना तातडीने तीन महिन्याचे अग्रिम वेतन देण्यात येणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : हे देयके दिनांक 27 डिसेंबरला ट्रेझरीमध्ये सादर करण्यात आले. 28 डिसेंबर 2005 ला, हे देयक तहसिलदार यांनी पूरग्रस्त म्हणून अधिसूचित केलेल्या गावांच्या यादीसह जोडलेले नव्हते अशी त्रुटी काढण्यात आली व ते देयक परत घेऊन जाण्यासाठी बाहेर ठेवण्यात आले. देयकाची चौकशी करण्यास येणा-या कर्मचा-याने ते विधेयक 2 जानेवारील नेले. प्रदानाची मुदत 31 डिसेंबर पर्यन्त होती आणि ती मुदत संपलेली होती.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 18:15

श्री. जयंत पाटील ....

यासंदर्भात माननीय सदस्यांचा आग्रह आहे त्यानुसार 31.12.2005 पूर्वी ज्या शिक्षकांची बिले सबमिट झाली असतील आणि काही तांत्रिक कारणामुळे ती मंजूर झाली नसतील तर 31.12.2005 पूर्वी सबमिट झालेली बिले विशेष बाब म्हणून देण्यात येतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मातंग आयोगाची स्थापना करणे.

मु.शी.: मातंग आयोगाची स्थापना करणे या विषयाबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,प्रकाश शेंडगे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच मातंग समाजाचे प्रश्न हाताळण्यासाठी 3 वर्षापूर्वी शासनाने मातंग आयोगाची स्थापना करणे, राज्यातअसलेल्या 60 लाखाहून अधिक मातंग समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिक विकासाचा अभ्यास करण्यासाठी हा आयोग अस्तित्वात येणे, शासनाने या आयोगास पहिले एक वर्ष कार्यालय,पुरेसा निधी आणि साधने उपलब्ध करुन न देणे, परिणामी महाराष्ट्र शासनाच्या उदासिनतेमुळे या या आयोगोस कोणतेही काम न करताच या आयोगाची मुदत दिनांक 31 डिसेंबर 2005 रोजी संपुष्टात येणे,शासनाने निवृत्त न्यायमूर्तीच्या अध्यक्षतेखाली व तज्ज्ञ लोकांच्या सहाय्याने मातंग आयोगाची पुर्नस्थापना करावी अशा मागणीचे निवेदन भाजपा अनुसूचित जाती मोर्चाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री व सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे दिनांक 11 फेब्रुवारी 2006 रोजी देऊनही याकडे त्यांचे होणारे दुर्लक्ष, परिणामी मातंग समाजामध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सभापती महोदय, निवेदनामध्ये आपल्या अनुमतीने मी सुधारणा करु इच्छितो. निवेदनाच्या परि. 4 मध्ये "31 डिसेंबर 2005 रोजी मातंग आयोगाची मुदतवाढ संपुष्टात आली आहे व आयोगास पुन्हा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे " या मजकुराऐवजी " शासनाने आयोगास 31.3.2007 पर्यंत मुदतवाढ दिली आहे" असे वाचावे.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनावरील सुधारित उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार महाअभिवक्ता यांचे घेण्यात

<u>आलेले अभिमत</u>

श्री. जयंत पाटील (अर्थमंत्री) : सभापती महोदय, माननीय सभापती विधान परिषद यांनी दिनांक 21.3.2006 रोजी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने महाअभिवक्ता (A.G.) यांचे अभिमत घेण्यात आले आहे. महाअभिवक्ता यांनी असे अभिमत दिले आहे की, "वार्षिक योजनेसाठी ज्या पध्दतीने माननीय राज्यपाल यांची मान्यता घेण्यात येते त्याच पध्दतीने पुरवणी मागण्यासाठी सुध्दा माननीय राज्यपालांची मान्यता घेण्याची आवश्यकता आहे. तसेच पुनर्विनियोजन करताना विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 1994 च्या परिच्छेद 8(अ) प्रमाणे कार्यवाही करावी. या परिच्छेदान्वये निधीचे पुनर्विनियोजन त्याच वैधानिक मंडळाच्या क्षेत्रात करता येते".

माननीय राज्यपालांनी सन 2005-06 च्या पुरवणी मागण्यांना मान्यता देताना दिलेले निदेश विधी मंडळाला यापूर्वी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. राज्यपालांनी येथून पुढे पुरवणी मागण्या आमच्याकडे पाठवून अशी मान्यता घ्यावी असे निदेश दिलेले आहेत.

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनासंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक सात (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 243 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 243 ही निवेदने कृपया छापावी.)

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विशेष उल्लेखाच्या सूचना.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहात आम्ही मांडल्या होत्या त्याबाबत अजून शासनाकडून काहीही उत्तर आलेले नाही. आजही विशेष उल्लेखाच्या सूचना दिलेल्या आहेत.

सभापती : विशेष उल्लेखाच्या सूचना आज घेतल्या जाणार नाहीत. आतापर्यंत विशेष उल्लेखाच्या 134 सूचना मांडल्या होत्या. याबाबतीत त्या त्या विभागाने एक महिन्याच्या आत या सूचनांना उत्तरे देण्याबाबत सरकारला निदेश दिलेले आहेत. पुन्हा एकदा मी शासनाला सूचना देतो.

आज तीन अशासकीय ठराव आहेत ते पुढील अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात चर्चेच्या येण्याच्या दृष्टीने मी निर्णय घेईन.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अशासकीय ठराव हा महत्वाचा विषय आहे. दर आठवडयामध्ये चर्चेसाठी हा विषय येत असतो. अशासकीय कामकाजाला फक्त एक दिवसच मिळतो. अडीच तासामध्ये अशासकीय कामकाज संपवावे लागते. माझी आपल्याला विनंती आहे की, अशासकीय कामकाज हे ठरल्याप्रमाणे झाले पाहिजे.

सभापती : काल सभागृहाच्या कामकाजाबाबत आपण ज्या पध्दतीने चर्चा केली त्यानुसार सभागृहापुढील एकूणच कामकाज काटेकोरपणने होण्याची आवश्यकता आहे. पुढील अधिवेशनापासून याबाबतीत निश्चितपणाने काळजी घेतली जाईल.

सोमवार दिनांक 13 मार्च, 2006 ते शुक्रवार दिनांक 21 एप्रिल, 2006 या कालावधीत सभागृहाचे जे एकूण कामकाज झाले त्यासंबंधीचा त्रोटक अहवाल आता मी सादर करीत आहे.

नंतर भारवि

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सोमवार, दिनांक 13 मार्च ते शुक्रवार, दि. 21 एप्रिल, 2006

या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

सभापती :हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो. एकूण बैठकीची संख्या 23 आहे. एकूण काम आपण **154** तास आणि **45** मिनिटे इतके केले आहे. यामध्ये वाया गेलेला वेळ **4** तास आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज **150** तास 45 मिनिटे झालेले आहे. रोजचे सरासरी कामकाज **6 तास 35** मिनिटे झालेले आहे.

तारांकित प्रश्न :-

एकूण **4574** तारांकित प्रश्नांच्या सूचना आल्या. या पैकी कार्यवाहीसाठी **3714** तारांकित प्रश्न घेण्यात आले. **1173** प्रश्न स्वीकृत झाले व सभागृहात **154** तारांकित प्रश्नांना तोंडी उत्तरे देण्यात आली.

नियम 93 अन्वये सूचना :-

एकूण **133** सूचना प्राप्त झाल्या. यापैकी **99** सूचनांवर निवेदने करण्यात आली.

लक्षवेधी सूचना -

एकूण **1222** सूचना प्राप्त झाल्या. यापैकी **328** सूचना मान्य झाल्या व **85** सूचनांवर चर्चा करण्यात आली.

विशेष उल्लेख :-

एकूण **134** विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्यात आल्या.

शसकीय विधेयके :- एकूण **19** विधेयके संमत करण्यात आली.

अशासकीय ठराव :- एकूण 3 अशासकीय ठरावांवर चर्चा झाली.

अर्धातास चर्चा :-

एकूण **56** अर्धा तास चर्चेच्या सूचना आल्या. त्यापैकी **43** सूचना मान्य करण्यात आल्या व **11** सूचनांवर चर्चा करण्यात आली.

राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा -

एकूण 8 तास 28 मि. चर्चा झाली. चर्चेत 29 सदस्यांनी भाग घेतला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

पृ.शी. व मु.शी. : पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

सभापती : मी जाहिर करतो की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार,दिनांक 3 जुलै 2006 पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे अशी शिफरस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

सत्र-समाप्तीसंबंधीची घोषणा

पृ.शी. व मु.शी. : सत्र समाप्तीसंबंधीची घोषणा

सभापती : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा आदेश वाचून दाखवितो.

" भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174,खंड (2) उपखंड (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी डॉ.एस.एम.कृष्णा, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

(सायंकाळी 6.23 वाजता सत्र संस्थगित झाले.)

.....

अशुद्धीकरण प्रत / प्रसिद्धीसाठी नाही